१८५१
म. ग्रं. मं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १५५१



REFBK-0007562

...िनाथ तळवलकर

आनंद कार्यालय प्रकाशन

३७८१५
सं. २॥-
१६.२.६५
१५५०
निरोध

# कुमार मित्रांनो !

[ कुमारांस उद्देशून निरनिराळ्या
समारंभप्रसंगीं केलेलीं भाषणें ]

७५६२

गोपीनाथ तळवलकर

REFBK-0007562

किंमत २ रुपये

प्रकाशक
य. गो. जोशी, बी. ए. (ऑनर्स)
व्यवस्थापक, आनंद कार्यालय.
१०१५ सदाशिव, पुणे २

☆ ☆ ☆

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

☆ ☆ ☆

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए. ( ऑ. )
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणें २

# दोन शब्द :

३८८१५
१५५९

गेल्या बारा वर्षांत नागपूरपासून बेळगांवपर्यंत अनेक विद्यामंदिरांत मी व्याख्यानासाठीं गेलों. या व्याख्यानांतले कांहीं उत्कृष्ट विचार कुमारवर्गापुढें नित्य राहावे असें माझ्या कांहीं जाणकार मित्रांना वाटलें आणि मलाहि तें पटलें. म्हणूनच ' शाळेच्या चिमण्या जगांत ' दिलेलीं कांहीं व्याख्यानें यांत संग्रहित केलीं आहेत. यांत एक संकल्पित वक्तव्य आहे, एक चर्चाहि आहे. 'स्वयंसेवक संघटना ' हें व्याख्यान शालेय सृष्टींत दिलेलें नसलें तरी त्यांतले प्रकट केलेले विचार मुख्यतः कुमारवर्गासाठींच आहेत.

शाळेच्या श्रोत्यांपुढें व्याख्यान देणें फार अवघड असतें. वेगवेगळ्या इयत्तांतील मुलांचीं बौद्धिक वयें निरनिराळीं असतात. त्यांची सरासरी काढून सर्वांना आकर्षणीय असें प्रवचन करणें कठीण जातें. तथापि आठवणी, दृष्टांत, आख्यायिका, अवतरणें यांचा मसाला घालून वक्ता कळकळीनें व शक्य तेवढ्या सुबोध भाषेंत बोलला तर मुलें लक्षपूर्वक ऐकतात असा माझा अनुभव आहे.

शाळेंत झालेलीं माझीं बरींच व्याख्यानें मीं ' आनंदा ' च्या पुरवणींत वेळोवेळीं प्रसिद्ध केलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकांत त्यांतलीं कांहीं घेतांना प्रासंगिक उल्लेख गाळून व साफसफाई करून तीं मीं घेतलीं आहेत. यांत सुबोधतेइतकेंच साहित्यसौंदर्यहि आढळेल. प्रत्येक व्याख्यानांत घेतलेल्या विषयाची एकादी तरी नवी बाजू मुलांना दिसावी असा माझा प्रयत्न असतो. मुलांच्या विधायक प्रवृत्ति वाढीला लावणें हेंच शिक्षणाचें मुख्य ध्येय असलें पाहिजे. आजच्या जगांत प्रचलित असलेल्या विचारप्रवाहांचा मुलांच्या मनाला स्पर्श झाला पाहिजे, त्याप्रमाणें आपल्या प्राचीन संस्कृतींतलीं उच्च मूल्येंहि त्यांना कळलीं पाहिजेत. असें झालें तरच त्यांचें मन प्रगतिपर राहील. सत्य, सात्त्विकता आणि सौंदर्य यांचे संस्कार त्यांच्या अंतःकरणावर जितके दृढ होतील तितकें त्यांचें जीवन उन्नत होईल. याच दृष्टीनें मी आजवर उत्कट प्रयत्न करीत आलों आहें. तेंच माझें जीवनकार्य आहे.

कुठल्याहि शिक्षणसंस्थेंत भाषण करतांना समोर लहानसा कुमारवृंद दिसत असला तरी माझ्या अंतःचक्षूपुढें आजची व उद्यांची सर्व कुमारसृष्टीच नेहमीं

असते. त्यामुळें एकाद्या वर्गाच्या एकाद्या तुकडींत बोलतांनाहि सर्व कुमार-वर्गाला उद्देशूनच माझ्या विचार-कल्पना मी मांडीत असतों. शिक्षकवर्गानें सहकार्य करून माझें कार्य अधिक व्यापक व प्रभावी करावें अशी माझी विनंती आहे. पालकांनाहि माझें असेंच नम्रतापूर्वक आवाहन आहे.

हें पुस्तक निबंध–लेखनाचे अध्यापनास सहायक होईल. त्याप्रमाणें सामान्य नीतिशिक्षणालाहि त्याचा उपयोग होईल. निरनिराळ्या स्वयंसेवक संस्थांच्या अभ्यासमंडळांतहि हें पुस्तक बौद्धिक वर्गांना उपयुक्त ठरेल असा माझा विश्वास आहे. प्रत्येक व्याख्यान मुलांकडून वाचून घ्यावें; त्यांतलीं ध्येयें व कल्पना कोणत्या हें त्यांचें त्यांनाच प्रथम काढूं द्यावें; जरूर पडेल तेथें मार्ग-दर्शन करावें. व्याख्यानाचे शेवटीं दिलेले प्रश्न व पुरवणीवाचन यांच्या योगानें पुस्तकांतला आशय मनावर अधिक ठसेल.

व्याख्यानासाठीं ज्या अनेक स्थळीं मी गेलों तेथें थोरांनीं केलेलें माझें प्रेमळ आतिथ्य व मुलांनीं केलेलें उत्साहपूर्ण स्वागत केवळ अविस्मरणीय वाटतें. ‘आनंदां’ तील व्याख्यानें पुनर्मुद्रित करण्यास विश्वस्त मंडळींनीं परवानगी दिली; आनंद छापखान्याचे उत्साही मालक यशवंतराव जोशी यांनीं मोठ्या उत्साहानें आपली सूक्ष्म कलादृष्टि चालवून पुस्तक छापून दिलें; चि. आप्पासाहेब ठाकूर यांनीं तत्परतेनें पुस्तकाला कागद पुरविला. ही सर्वच आपली मंडळी. तेव्हां त्यांचे आभार मानणें फारसें उचित ठरणार नाहीं; म्हणून फक्त कृतज्ञतापूर्वक त्यांच्या साह्याचा निर्देश केला आहे. महाराष्ट्रांतील कुमारवर्ग या माझ्या पुस्तकाचें योग्य तें चीज करील ही आशा.

दि. २ । १० । ५१ गांधी जयंती<br>आनंदकार्यालय, पुणें २.

**गोपीनाथ तळवलकर**

* * *

माझे आप्तप्राय ज्येष्ठ स्नेही

**आचार्य प्रल्हाद केशव अत्रे**

आणि

**कै. प्राध्यापक श्रीपाद महादेव माटे**

यांना प्रेमादरपूर्वक समर्पण.

# अ नु क्र म

## विभाग पहिला


| | |
|---|---|
| १. " उषःकाल " | ९ |
| २. कवितेचा अभ्यास | १८ |
| ३. साहित्य आणि संस्कृति | २६ |
| ४. सामर्थ्यवान् वाङ्मय | ३३ |
| ५. " देवांच्या मदतीस चला तर ! " | ३९ |
| ६. उद्यांचे पत्रकार | ५३ |


## विभाग दुसरा


| | |
|---|---|
| ७. स्वयंसेवक संघटना | ६३ |
| ८. बालवीर सूत्रें | ७१ |
| ९. तीन मानसिक शक्ति | ७६ |
| १०. उद्यांचे नागरिक | ८१ |
| ११. जीवनांतील आनंद | ८६ |
| १२. जीवनाची तयारी | ९० |


## विभाग तिसरा


| | |
|---|---|
| १३. संगीत-साधना | ९७ |
| १४. वक्तृत्व | १०४ |
| १५. छंद | १११ |
| १६. वनमहोत्सव | ११७ |
| १७. अर्थ आणि व्यापार | १२३ |
| १८. अनन्त हस्तें कमलावरानें | १२९ |


****

# कुमार मित्रांनो

## विभाग पहिला

## अनुक्रम


"उषःकाल"

कवितेचा अभ्यास

साहित्य आणि संस्कृति

सामर्थ्यवान् वाङ्मय

"देवांच्या मदतीस चला तर!"

उद्यांचे पत्रकार

वर्ग स्थळप्रत.
अनुक्रम
क्रमांक ........ नों. दि. ........
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ७.५६२

# “उषःकाल”* 

आज मला तुम्हीं कांहीं कार्यक्रमानिमित्त या ठिकाणीं बोलावलें यामुळें मला किती आनंद झाला आहे हें सांगतां येत नाहीं! माझ्या लहानपणीं कविवर्य माधव काटदरे यांची ‘तळकोंकण’ ही कविता मीं वाचली होती. “सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें तळकोंकण,” असा तिचा आरंभ होता. या रमणीय कवितेंत वर्णिलेली अद्‌भुत सृष्टि मी वारंवार मनापुढें आणीत असें. नारळीपोफळी यांचीं बनें, गर्द अरण्यें, त्यांतून लीलेनें उड्या मारीत जाणारीं वानरें, मधूनच लागणाऱ्या खाड्या आणि त्यांत डोकावून पाहणारीं गिरिशिखरें इत्यादि रम्य सृष्टीचें मनोमय दर्शन मी अनेकदां घेत असें. आज ती सृष्टि मी प्रत्यक्ष पाहात आहें. म्हणूनच मला वाटणारें आश्चर्य व आनंद शब्दांनीं वर्णन करतां येणार नाहीं. ही जागाहि विद्येच्या विकासाला योग्य अशीच आहे. एका गर्द राईंत आपण जमलों आहोंत. सृष्टीच्या अशा प्रत्यक्ष सान्निध्यांतच शिक्षण घ्यावें असें कविसम्राट् टागोर सांगत, त्याची मला या ठिकाणीं आठवण होते. असें सृष्टीचें तुम्हांला सान्निध्य लाभलें याबद्दल तुमचा कुणालाहि हेवा वाटेल. या वातावरणाचा आपल्या शरीराच्या व मनाच्या वाढीकरतां पूर्ण उपयोग करून घ्या असें

---

* ज. ए. सोसायटी हायस्कूल, उरण येथें शालेय मासिकाचें प्रकाशन करतांना ता. २।१२।४९ रोजीं केलेलें भाषण.

मी प्रथम तुम्हांला आग्रहानें सांगतों. आपल्या राष्ट्राचे दोन महान् नेते पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमा मी आतां अनावृत केल्या. केवढे थोर आदर्श तुमच्यापुढें आहेत ! मागें एकदां संयुक्त प्रांतांतील दौरा आटोपून गांधीजी परत निघाले तेव्हां तरुणांनीं त्यांचेजवळ संदेश मागितला. गांधीजींनीं हंसून म्हटलें, "जवाहरलाल व्हा; याशिवाय तुमच्या प्रांताला मी दुसरा कोणता संदेश देणार ?" त्याच उद्गारांचें आज मला स्मरण होत आहे. आपल्या या जगविख्यात राष्ट्रनेत्याचें दररोजच्या जीवनांत सर्वांगीण अनुकरण करा. पंडितजींचें अनुकरण म्हणजे काय हें थोडक्यांत सांगतों.

## पूर्व-पश्चिमेचें प्रयाग

प्रांजलपणा, शौर्य व निर्भयता यांची उपासना; मेघाप्रमाणें जें सांठवलेलें असेल त्याचें जगाला दान; जनतेवर श्रद्धा—म्हणजेच जवाहरलालजींचें अनुकरण होय. पूर्व आणि पश्चिम या दोन्हींत जें जें उत्कृष्ट आहे त्याचें हें प्रयागतीर्थ आहे. म्हणून तुम्ही पंडितजींचा आदर्श ठेवा असें मी सांगतों. याचाच अर्थ भारतीय संस्कृति व नवी विद्या या दोहोंतहि तुम्ही पारंगत व्हा असें मला म्हणावयाचें आहे. पंडितजी म्हणजे मूर्तिमंत उत्साह, राष्ट्रप्रेम आणि दीर्घोद्योग. गुरुजनांचा मान ठेवायचा आणि आपलेंहि स्वतंत्रपण टिकवायचें असें अवघड व्रत त्यांनीं आचरलें आहे. 'सामान्य स्त्री-पुरुषांबद्दल पंडित नेहरूंना जो जिव्हाळा आहे त्यामुळेंच मी त्यांच्याकडे आकर्षित झालों.' असें विख्यात लेखक लास्की म्हणाले. असो. पंडितजींच्या गुणसंकीर्तनांत मी सांपडलों तर असाच कितीतरी काळ बोलत राहीन. म्हणून येथेंच मी आवरतें घेतों. आज दुसरें चित्र वल्लभभाईंचें आहे. सरदारांचा कणखर बाणा प्रसिद्ध आहे. एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, सरदारजी हे एका काळीं ऐषारामांत दंग असणारे विलासी गृहस्थ होते. 'अप-टु-डेट'

पोषाख, उंची खाद्य-पेयें आणि सामान्य माणसाबद्दल तुच्छता असें त्यांचें जीवन होतें. गांधीजी आफ्रिकेहून आले तेव्हां आपला तो जाडाभरडा काठेवाडी वेष घालून कोर्टांत वल्लभभाइकडे गेले असतां वल्लभभाई गांधीजींना म्हणाले, 'तुम्ही त्या भोळ्या आफ्रिकन लोकांनाच वळण लावा, इथें तुमचें कोणी ऐकणार नाहीं.' पण पुढें गांधीजींच्या अंगचें अलौकिक सामर्थ्य सरदारांना पटल्यावर त्यांनीं आपलें विलासी जीवन सोडून दिलें, लोकसेवेचा मार्ग पतकरला; आणि ते गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी बनले. जीवनांत असा उत्तम आणि आमूलाग्र बदल करण्यास मनुष्य खंबीर व दृढनिश्चयी असला पाहिजे! सरदार तसे आहेत. त्यांनीं शेतकऱ्यांना जागें केलें, लढाऊ बनविलें आणि ब्रिटिश साम्राज्यशाही खिळखिळी केली. अहमदाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष असतांना त्यांनीं लोकसेवेचीं अनेक कामें केलीं. हिंदुस्थानांतील जीर्ण संस्थानें नष्ट करून व हैद्राबादला शरण आणून त्यांनीं हा भारत देश एकसंघ व समर्थ बनविला आहे. खंबीरपणाचा हा बाणा तुम्ही सरदारांपासून शिका.

## भाषाज्ञान गतिमान् ठेवा

यानंतर राष्ट्रभाषेच्या परीक्षांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आतां प्रशस्तिपत्रें देण्यांत आलीं आहेत. राष्ट्रभाषेसंबंधीं चाललेलीं सर्व वादंगें आतां जवळ जवळ मिटलीं आहेत. त्यामुळें आतां राष्ट्रभाषेचा अभ्यास विशेष जोरानें होऊं लागेल ही खात्री वाटते. इंग्रजांनीं आपणांवर राज्य स्थापलें आणि आपलें स्वत्व नाहींसें करण्याचा सर्व बाजूंनीं कसून प्रयत्न केला. त्यांनीं आपला स्वतःचा वेष, आपली भाषा, आपली संस्कृति आम्हां हिंदी लोकांवर लादली. या परकी गोष्टींच्या ओझ्यामुळें आमचें राष्ट्रीयत्व चेंगरून-गुदमरून गेलें. गांधीजींनीं आपल्या

राष्ट्राला राष्ट्रपण आणण्यासाठीं ज्या अनेक गोष्टी केल्या त्यांत राष्ट्रभाषा ही प्रमुख होय. आपल्या देशबांधवांशीं आपण अंतःकरणें खोलून बोलायचें असेल तर आपली स्वतःची भाषा पाहिजे. परकी भाषेच्या सरावामुळें आपण स्वाभिमानाला व स्वत्वाला पारखे होत आहोंत ही जाणीव गांधीजींनीं उत्पन्न केली. आज राष्ट्रभाषेला स्वतंत्र प्रतिष्ठा आली आहे. राष्ट्रभाषा ही आपल्या देशबांधवांचीं अंतःकरणें एकमेकांपुढें खुलीं करणारी किल्ली आहे. ती आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचें प्रतिबिंब आहे. आतां स्वतंत्र हिंदुस्थानांत प्रांताप्रांतांमध्यें दळणवळण खूप वाढेल. तेव्हां विचारांची देवघेव करण्यास राष्ट्रभाषेचा फार उपयोग होणार आहे. राष्ट्रभाषेंत नुसती पदवी मिळवून स्वस्थ राहूं नका. ती डौलदार रीतीनें बोलतां येईल असा सराव करा. तीमधील अमोल वाङ्मय वाचा. त्यांतून आपल्या मातृभाषेला संपन्न करण्यासाठीं उत्तमोत्तम सामग्री आणा. राष्ट्रभाषेप्रमाणें संस्कृत व इंग्रजी याहि भाषांचा तुम्हीं सन्मान केला पाहिजे असें मी आग्रहानें सांगतों. वाहतें पाणी हें शुद्ध व सामर्थ्यवान् असतें. सतत वाचन, मनन, लेखन व संभाषण यांयोगें तुमचें भाषाज्ञान गतिमान् ठेवा म्हणजे तुम्ही भाषा-पंडित व्हाल.

ज्या मुख्य कामाकरितां मी आलों आहें तें काम म्हणजे 'उषःकाल' या तुमच्या मासिकाचें प्रकाशन. शाळेला छापील मासिक असणें खरोखर भूषणास्पद आहे. या मासिकांत आपल्या देशांतल्या ४–५ प्रमुख भाषांचा तुम्ही योग्य तो गौरव केला आहांत. हें साहित्य सिद्ध करण्यांत अनेकांचे चिमुकले हात लागले आहेत हें पाहून तर विशेष कौतुक वाटतें. साहित्याचे वेगवेगळे प्रकार शक्य तितक्या सुबक रीतीनें एकत्रित करण्याचा तुमचा प्रयत्न अभिनंदनीय आहे. हा तुमचा उत्साह असाच वाढत जावो असें मी मनःपूर्वक इच्छितों.

**समर्थ नांव**

" उषःकाल " हें आपल्या मासिकाचें नांव ठेवण्यांत तुम्हीं फार मोठें औचित्य दाखविलें आहे. तुमच्या जीवनाचा हा उषःकालच आहे. उषःकालीं पूर्व दिशेवर गुलाबी छटा येते, सृष्टि प्रसन्न दिसते, उत्साह चहूंकडे भरलेला असतो. तुमच्या प्रसन्न मुखावर हें सारें रमणीय वर्णन रंगविलेलें कुणालाही दिसेल. म्हणूनच तुमचें प्रतिबिंब ज्या मासिकांत उमटायचें त्याचें नांव ' उषःकाल ' असावें हें अगदीं योग्यच आहे.

पण आणखीहि एका दृष्टीनें ' उषःकाल ' या नांवाची समर्पकता मला वाटते. आपला देश आतां स्वतंत्र झाला आहे. पारतंत्र्याची रात्र संपून गेली आणि लोकसत्ताक स्वातंत्र्याचा सूर्य उदयास येत आहे. आणखी सुमारें दीड महिन्यानें म्हणजे ता. २६ जानेवारी १९५० रोजीं आपला देश संपूर्ण लोकसत्ताक व स्वतंत्र होईल. आपल्या लोकांनीं तयार केलेली राज्यघटना अंमलांत येईल. हा उषःकालच नाहीं का ? तुमच्या मासिकाचें नांव ज्यांनीं योजलें त्यांच्या कल्पकतेला मी धन्यवाद देतों.

' उषःकाल ' च्या कुमार लेखकांना आणि लेखिकांना अगदीं पहिला संदेश देईन तो असा कीं, सत्य हें जीवनाप्रमाणें वाङ्मयाचें अधिष्ठान ठेवा. पतंग आकाशांत खूप दूर जातो, पण त्याची दोरी माणसाच्या हातांत असते. कल्पकतेच्या आकाशांत तुमची प्रतिभेची वावडी हवी तेवढी वर चढूं द्या. मात्र तिचें सूत्र सत्याच्या हातांत राहूं द्या. म्हणजे वाऱ्याच्या झपाट्यांत किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं ती कुठेंतरी उडत जाऊन फाटणार नाहीं. हीच गोष्ट सोप्या भाषेंत सांगावयाची म्हणजे, खरें मनाला पटेल तेंच लिहा. उदात्त विचारांचें नुसतें अवसान आणून उपयोग नाहीं. एखाद्या प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळीं तुमची सफर गेली, जवळ असलेल्या घारापुरीच्या लेण्यांनाच तुम्ही गेला असें समजूं या.

या सफरीचें वर्णन लिहितांना घारापुरींतल्या त्रिमूर्तीचा अर्थ किंवा शिलाहारांची शिल्पकला यांवर कुणाकडून तरी माहिती जमवून तुम्हीं तारे तोडलेत तर तें तुमचें असें लिखाण खास होणार नाहीं. पण त्या लेण्यांना जातांना तुमच्या मनांत कोणते विचार उचंबळत होते, वाटेनें होडींत कुणीं काय गमती केल्या, नावाड्यांच्या कांहीं विचित्र शब्दांचें व त्यांच्या कौशल्याचें तुम्हांला कसें कुतूहल वाटलें, लेण्यांत व आसपास तुम्हीं कशी धूमधाम केली, हें तुम्हीं आपल्या भाषेंत सांगितलें तर तें खरें खरें वाङ्मय होईल. वाङ्मय सुंदर शब्दांत तर सांगितलें पाहिजेच पण तें सत्यहि असलें पाहिजे. सत्य आणि सौंदर्य या वाङ्मयरूपी नाण्याच्या दोन बाजू आहेत. सारख्याच आकाराच्या आणि सारख्याच महत्त्वाच्या. पण केवळ साहित्यांतच नव्हे तर जीवनांतहि असेंच आहे.

**ज्ञान हेंच सामर्थ्य**

अनुभव, निरीक्षण, वाचन इ. साधनांनीं सतत ज्ञान मिळवीत राहणें हा तुमच्या प्रतिभासाधनाचा महत्त्वाचा भाग असला पाहिजे. स्वातंत्र्य-प्राप्तीपूर्वीं शौर्य आणि त्याग या गोष्टींना आपल्या देशांत अतोनात महत्त्व होतें, अर्थात् त्यांचें महत्त्व आतां कमी झालें आहे असें मी म्हणत नाहीं. पण आतां त्यांच्या जोडीला ज्ञान आलें आहे. रशिया, अमेरिका, इंग्लंड अशा पुढारलेल्या, ज्ञानसंपन्न राष्ट्रांच्या मालिकेंत आपण येऊन बसलों आहोंत. आतां केवळ आम्हीं पर्वताएवढा त्याग केला आहे, एवढी लायकी पुरेशी ठरणार नाहीं. सृष्टीच्या आणि मनाच्या अंतरंगांत जाऊन आपण अनंत गूढ तत्त्वांचें व नियमांचें ज्ञान पैदा केलें पाहिजे. इतिहास काय, अर्थशास्त्र काय, सर्वांत स्वतंत्रपणें विहार करून संशोधन केलें पाहिजे. तुम्हांला ज्या जीवनाच्या शाखेवर लिहायचें असेल, ज्या क्षेत्रांत पराक्रम करायचा असेल तेथील सर्व ज्ञानसंपदा तुम्हीं हस्तगत केली पाहिजे. डॉक्टरीच्या धंद्याविषयीं नाटक लिहितांना बर्नार्ड शॉसारखे

नाटककार त्या विद्येची सांगोपांग शास्त्रीय माहिती मिळवितात; निरनिराळे अहवाल वाचतात, त्या धंद्यावर कुणीं कांहीं जें जें उत्तम लिहिलें असेल त्याचा अभ्यास करतात. आपल्याकडील प्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांचेंच उदाहरण घ्या ना! 'रूपनगरची राजकन्या' किंवा 'वज्राघात' अशा कादंबऱ्या लिहिण्यापूर्वीं त्या त्या रियासतींचा केवढा अभ्यास हरिभाऊंनीं केला होता. माझ्या व्याख्यानाच्या आरंभीं ज्या कवींचा उल्लेख आला त्यांच्या उद्योगशीलतेचें वर्णन कुठवर करावें? 'घेरियाची लढाई' हें काव्य त्यांनीं लिहिलें त्यावेळीं त्यांनीं त्या विषयाची ऐतिहासिक सामग्री तर सर्व अभ्यासलीच, पण ज्या ठिकाणीं ही इतिहासप्रसिद्ध घटना झाली त्या तळकोंकणचा भाग पायीं हिंडून तेथील भूप्रदेश, वनश्री, लोककथा यांचेंहि अध्ययन केलें. आणि या सर्वांचा मोठा कौशल्यानें आपल्या काव्यांत उपयोग करून घेतला. एकच उल्लेख सांगतों. आपल्या बायकोच्या नादीं लागून प्रेमळ बहिणीच्या हातचे पोहे झिडकारणाऱ्या एका स्त्रीलंपट माणसाची लोककथा या बाजूस प्रसिद्ध आहे. त्यावरून 'तळकोंकण'च्या वर्णनांत माधव सांगतात :—

"सिताबाइच्या गोड हातचे पोहे जे काननीं ।
रागानें दे बाइलवेडा कवडा भिरकाउनी ॥
रोपें त्यांचीं बनुनि पसरलीं हासत चोहींकडे ।
अजुनि पहा ना मंडित त्यांनीं कोंकणचे हे सडे ॥"

किती रमणीय वर्णन आहे! किती हृदयस्पर्शी उल्लेख आहे! ज्ञान जितकें खोल असेल तितकें वाङ्मय सकस होतें, कायम टिकणारें निपजतें. आज आमच्या वाङ्मयाला भाषेचें सौष्ठव आलें आहे. पण ज्ञानाची खोली तितकीशी आलेली दिसत नाहीं. मित्रांनो! ही उणीव तुम्ही आपल्या तपश्चर्येनें भरून काढा.

## मनाचीं क्षितिजें विशाल करा

सत्य आणि ज्ञान यानंतर अनुक्रमानें शेवटचा पण महत्त्वानें पहिला एक गुण सांगावयाचा राहिला. तो असल्याशिवाय तुम्हांला केव्हांहि मोठें साहित्य निर्माण करतां यायचें नाहीं. किंबहुना कसलेंच थोर कार्य त्या गुणाच्या अभावीं तुम्ही करूं शकणार नाहीं. तो गुण म्हणजे हृदयाची विशालता. आपल्या स्वतःच्या जीवनांतून, हेव्यादाव्यांतून, सुखदुःखांतून आपणाला बाहेर काढून इतरांच्या जीवनाशीं समरस होण्यास तुम्हांला शिकलें पाहिजे. हिंदुस्थान आणि पाकिस्तान असे या भारताचे दोन तुकडे पडले म्हणून आपण दुःखानें व संतापानें जळत आहोंत. पण तुमच्या स्वतःच्या देशांत, प्रांतांत इतकेंच नव्हे तर गांवांत, सुद्धां किती वेगळे सुभे तुम्हीं निर्माण करून ठेवले आहेत ! मिठागरांत खपणारे गडी, तरी चालविणारे लोक, शेत कसणारे लोक, फार काय तुमच्या जातीपेक्षां थोड्या वेगळ्या जातीचे पण तुमच्याच दर्जाचे लोक यांच्यांत आणि तुमच्यांत कांहीं आहे का दळणवळण ? करतां कधीं या लोकांची चौकशी ? त्यांना एका लंगोटीवर कां राहावें लागतें, त्यांना शिकतां कां येत नाहीं याचा विचार केलांत कां तुम्हीं कधीं ? खास नाहीं केला. ठीक, पण आतां हा संकुचितपणा सोडा, आणि आपल्या हृदयाचें क्षितिज जेवढें वाढवितां येईल तेवढें वाढवा. तुमचें हृदय जेवढें व्यापक होईल तेवढें तुम्ही इतरांचें हृदय आपल्या वाङ्मयानें मोठें करूं शकाल. सहानुभूति, इतरांविषयीं गाढ सहानुभूति, हाच उत्तम वाङ्मयाचा महामंत्र होय. शबरीच्या भक्तिभावांवर लिहिणाऱ्या आद्यकवि वाल्मिकीपासून काबुलीवाल्याची हृदयंगम कथा लिहिणाऱ्या रवींद्रनाथांपर्यंत सर्वश्रेष्ठ साहित्यिक हे उदारात्मे होते. कुमार मित्रांनो ! सत्य, ज्ञान आणि सहानुभूति ही त्रयी म्हणजेच उत्कृष्ट वाङ्मयाचें रहस्य होय आणि उत्तम जीवनाचेंहि नेमकें तेंच रहस्य आहे; हा

समुद्रराज तुमच्या शेजारीं आहे. त्याचा विस्तार व खोली ही केवढी तुमची स्फूर्ति आहे! तुमचें वाङ्मय व जीवन ज्ञानानें खोल आणि सहानुभूतीनें विशाल पाहिजे. हाच या सागराचा संदेश आहे. तो तुम्हीं कृतींत उतरवा आणि आपल्या स्वतंत्र झालेल्या या पवित्र मायभूमीच्या वाङ्मयांत आणि जीवनांत सत्याचे, सौंदर्याचे आणि ज्ञानाचे हिमालय निर्माण करा, एवढेंच तुम्हांला कळकळीनें व आशीर्वादपूर्वक सांगणें आहे.

* * *

**प्रश्न**

१. पं. नेहरू आणि सरदार पटेल यांच्यांतले साम्य व भेद दाखवा.

२. राष्ट्रभाषेची महती व जरूरी कां आहे?

३. साहित्य सुंदर होण्यास कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते?

**अधिक वाचन**

'इंदिरेस पत्रें' (अनु. बोडस)

'आनंदभुवन' (गोपीनाथ तळवलकर)

'आपले नेहरू' (साने गुरुजी)

* * *

# क वि ते चा अ भ्या स २

आज तुम्ही महाविद्यालयाच्या उंबरठ्यावर आहां. अशा वेळीं जें शिकायचें तें तुम्हांला जन्मभर पुरेल असेंच असलें पाहिजे, नाहीं का? लहानपणीं आपण काव्याच्या केवळ नादाकडे लक्ष देतों. नाद म्हणजे चमत्कृतिजनक अशी शब्दरचना. ‘ गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या ’, ‘ साई गेली शेताभाता ’ इ० गाणीं केवळ आपणांला त्यांतल्या शब्दांच्या गमतीदार नादामुळें लहानपणीं आकर्षक वाटतात. पुढें आपण अर्थाकडे लक्ष देऊं लागतों. अर्थापेक्षां ध्वनि हा कवितेचा अधिक मोठा गुण आहे. प्रत्यक्ष दिसणाऱ्या अर्थाच्या पोटांत जो सूचित असा अधिक सुंदर अर्थ असतो त्याला ध्वनि म्हणतात. ‘ कोपरापर्यंत हातांतलें कंकण खालीं गेलें होतें.’ असें ‘ मेघदूतां ’तल्या यक्षाचें वर्णन आपण वाचतों, तेव्हां त्याची कृशता लक्षांत येते आणि त्याला आपल्या प्रियपत्नीच्या विरहानें किती दुःख झालें होतें याची हुबेहूब कल्पना येते. हें ध्वनीचें उत्तम उदाहरण आहे. उत्तम काव्यांत नाद, अर्थ आणि ध्वनि या तीनहि गुणांचा सुंदर संगम झालेला असतो.

कुशल कवि आपल्या कवितेंतले शब्द अर्थ व ध्वनि यांना समर्पक असेच घालतो. नुसत्या शब्दांच्या घडणीवरून कवितेंतल्या आशयाचें

---

* ता. ४–७–५१ रोजीं पुणें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शालान्त परीक्षेच्या विद्यार्थ्यांपुढें दिलेलें व्याख्यान.

अनुक्र. ३८८१
क्रमांक ......७५५५ नों. दि. ......

स्वरूप रसिकाला कळतें. काव्य उदात्त रसानें भरलेलें असेल तर शब्द-योजना प्रौढगंभीर असेल. क्रांति किंवा मृत्यूचें तांडव कवीला वर्णन करावयाचें असेल तर शब्द घवघवीत व खडकावर आदळणाऱ्या लाटांसारखे असतील. तुम्हांला जे रमणीय पद्यवेंचे आहेत त्यांतलीं एकदोन उदाहरणें घेऊनच हें सिद्ध करतां येईल.

> “ तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी
> झालों तरी गे ! तृषा मन्मनाचि कधींही कधींही न होणें कमी. ”
>
> ( माझ्या जन्मभूमीचें नांव–रे. टिळक. )

> “ ओढ सिंहासनें पाड तीं पालथीं । ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालतीं
> मुकुट रंकास दे करटि भूपांप्रती । झाड खट्खट् तुझें खड्ग क्षुद्रां ॥ ”
>
> ( रुद्रास आवाहन–तांबे )

यांतील शब्दांचा विलास लक्षांत घ्या. रे. टिळकांना मातृभूमीविषयींची भक्ति प्रगट करावयाची आहे. तिचें रूप व वैभव किती अफाट आहे, हें दाखवावयाचें आहे. तेव्हां मंदारमालेसारखें डौलदार व पल्लेदार वृत्त आणि घोसदार शब्द त्यांनीं योजले आहेत. ‘ कधींहीं कधींही ’ या द्विरुक्तीनें निश्चय व्यक्त झाला. तेंच तांब्यांच्या रुद्राची चाल पहा ! ‘ हत्ती ’, ‘ मत्त ’, ‘ खट्खट ’, ‘ खड्ग ’ इ. शब्दांच्या वर्दळीमुळें वीर-रसाचा किती सुंदर परिपोष झाला आहे ! जणूं एखादें घोडदळ बँडच्या तालावर चाललें आहे असें वाटतें ! रुद्राचें तांडवनृत्य व त्याची संहारक भूमिका शब्दांच्या नुसत्या नादानें कळून येते.

**कविता वाचन**

म्हणून कविता जाणून घेण्याची पहिली पायरी म्हणजे कवितावाचन ही होय. कवितावाचन म्हणजे गायन नव्हे आणि सध्यां जें क्षीण, कृत्रिम, नाजुक असें भेसळीचें काव्यगायन असतें तें तर मुळींच नव्हे. कविता वाचतांना अगदीं सूक्ष्म सूर तुम्हीं लावला तर चालेल. त्याची

गरज मात्र नाहीं. साथहि नकोच. फक्त कविता स्वच्छ, भावपूर्ण व लयबद्ध रीतीनें म्हणतां आली पाहिजे. 'रामरक्षे'सारखीं प्रसन्न स्तोत्रें पूर्वीं आपणांस लहानपणीं वडील माणसांच्या मुखांतून सहजासहजीं ऐकूं येत व पाठ होत. काव्याची लय व भाषेचें रचनासौंदर्य कळण्यासाठीं त्या संस्काराची फार गरज होती असें मला वाटतें. असो, आज आपणांस ज्या कविता शिकावयाच्या आहेत त्या अगोदर उत्तम वाचतां आल्या पाहिजेत.

या ठिकाणीं एका गैरसमजाचें निराकरण करणें जरूर आहे. कविता म्हणावयाच्या म्हणजे चालीवरच्याच कविता पाहिजेत, ओवी वगैरे प्रकार हे गद्यासारखेच होत असें पुष्कळांना वाटतें. मुक्तछंद म्हणजे तर कसलेंच बंधन नसलेलें लेखन असा दृढ समज आहे. केवळ रसिकच नव्हे तर अनेक कवीहि असेंच चुकीचें मत धरून बसले आहेत. मुक्तछंद म्हणजे कमींत कमी बंधनें असलेला छंद, एवढेंच. सूक्ष्म का होईना कांहींतरी बंधनें मुक्तछंदाला असतातच. तुमच्या पद्यवेच्यांतली 'येतें व्हा' ही पक्ष्यांवरील कविता वाचा. पांच किंवा सहा अशा शब्दांचीं आवर्तनें घेऊनच कवींनीं ती कविता लिहिली आहे. वर्ण्य देखाव्यांतील गति व उंची याप्रमाणेंच शब्दांचा आलेख व झोक आहे. प्रत्येक अक्षर दीर्घ उच्चारून लयींत ही कविता वाचलीत तर तुम्हांला तिचें सौंदर्य अगदीं पहिल्या परिचयालाच कळून येईल. 'स्फूर्ति' ही कविवर्य केशवसुतांची कविता याच रीतीनें तुमच्या हृदयाचा ठाव घेईल.

**कविता – चिंतन**

कवितावाचनानें कवितेची तोंडओळख होते आणि कविताचिंतनानें तिच्याशीं मैत्री जडते. कविताचिंतनांत अगदीं पहिल्यानें अन्वयार्थ पाहणें येतें. शब्द कसे कसे वापरले आहेत, त्यांचा निश्चित अर्थ कोणता, कवितेंत आलेले उल्लेख कशाचे आहेत हें सर्व कविताचिंतन होय. पण मला सांगावयाचें आहे तें यापेक्षां पुढचें आहे. कवि शब्दामध्यें स्वतःला

प्रतीत झालेले देखावे व प्रसंग वर्णन करीत असतो. बाह्य सृष्टीचीं चित्रें तो काढतो आणि कित्येकदां त्यांचा एखाद्या तत्त्वाशीं किंवा भावनेशीं तो सांधा जुळवून देतो. भक्त हा सर्व माणसांशीं समान भावनेनें कसें वागतो हें दाखवितांना ज्ञानेश्वरांनीं–

"माधुर्यें चंद्रिका। सरिसीं रायारंका॥"

असा दृष्टांत दिला आहे. चांदणें जसें राजवाड्यावर आणि उकिरड्यावर सारखेंच पडतें तशी भक्तांची वृत्ति असते. ज्ञानेश्वरांच्या या सुंदर दृष्टांताचें तुम्ही चिंतन करूं लागला तर तुम्हांला एखादी चांदणी रात्र दिसूं लागेल आणि त्या रात्रीं भोंवतालच्या देखाव्यांतली सर्व उच्च नीच वस्तु चंद्रप्रकाशांत न्हालेली आहे असा देखावा दिसेल. चांदण्याचें हें समत्व आणि हें उदार मन आपण कुठें पाहिलें आहे का? निदान ऐकिलें तरी आहे का, याचा तुम्ही शोध घेऊं लागाल आणि मग तुम्हांला ठाऊक असलेल्या सत्प्रवृत्त माणसांचीं किंवा विभूतींचीं चरित्रें तुम्हांला आठवतील. चिंतनांत दृष्टांतांतला देखावा पुढें आला आणि त्याचा प्रतिपाद्य तत्त्वाशीं बेमालूम सांधा जुळला म्हणजे केवढा अवर्णनीय आनंद होतो!

"फेसाळत गाईल जिथें ओहळ गाणीं"

ही माधव जूलियन् यांनीं वर्णिलेली विजनांतली सृष्टि तुम्ही मनापुढें उभी केली म्हणजेच तुम्हांला 'तेथें चल राणी' या कवितेचें खरें माधुर्य कळेल. "काय हो चमत्कार!" हें सुरस खंडकाव्य तुम्हांला या वर्षीं आहे. त्यांत कविताचिंतनाची केवढी अलोट मौज तुम्हांला येईल.

"गोधूमवर्ण तीचा हरिणाच्या पाडसापरी डोळे
स्नेहाळ वदन नामी, प्रसन्न विधुबिंब जेविं वाटोळें
तो केशपाश काळा, भाळावरि लांब आडवें कुंकूं
जणुं म्हणती शब्द तिचे आम्ही कोकिलरवासहि जिंकूं."

किती साधें आणि सरस वर्णन आहे ! अशी एकादी ग्रामकन्या तुमच्या डोळ्यांपुढें सहज येईल आणि तिच्यावर अनुरक्त झालेला तो शिवबा इतक्या पहाटे मळ्यांत येऊन कसा बसत असेल याची कल्पनाहि येईल.

" झुंजुरकाच उठोनी सर्वांआधीं मळ्यांत आलेले
आशाळभूत शिवबा होते मोटेवरीच बसलेले
आलाप उंच त्यांचे येणारांच्या पडोनिया कानीं
आश्चर्य फार केलें रेंगळणाऱ्यांतल्या अनेकांनीं "

पहा बरें, किती सुंदर देखावा दिसतो तो ! झुंजुमुंजू झालेलें, हा तरुण प्रेमवीर मोटेवर बसून गाणें गात आहे आणि ' जाऊं आतां ' म्हणून कामावर येण्यासाठीं जीं माणसें टंगळमंगळ करीत आहेत त्यांना शिवबाच्या येण्याचें आश्चर्य वाटत आहे. ' आशाळभूत ' या शब्दानें शिवबांनीं इतक्या पहाटें कां येणें केलें याचा उलगडा होतो. त्यांच्या चेहऱ्यावरील उत्सुकतेप्रमाणेंच आनंदहि तुम्हांला दिसूं शकेल. कारण माणूस खुषींत असला म्हणजेच ताना मारतो कीं नाहीं ! अशा रीतीनें वरील ओळींतला देखावा जितका स्पष्ट आपल्या मनःचक्षूंपुढें आणाल तितकें काव्याच्या सौंदर्यांत तुम्हांला खोल जातां येईल.

**कवितेची अनुभूति**

आतां शेवटची एक पायरी राहिली. वाचन आणि चिंतन यानंतर कवितेची अनुभूति घेण्यास तुम्हीं शिकलें पाहिजे. आपल्या मनांत भावनांचा पूर जितक्या उंचीवर आला तितक्या उंचीवर तो रसिकाच्या मनांत चढला पाहिजे हें कवीचें उद्दिष्ट असतें. त्याला जें सौंदर्य किंवा जी कल्पना जितक्या उत्कटत्वानें प्रतीत होईल तितकीच ती रसिकांना झाली पाहिजे हेंच त्याच्या काव्यरचनेचें खरें यश होय. आणि तुम्हां रसिकांना तोच खरा आनंद होय. कवितेंतल्या रसांत स्वतःचें मन

विरघळविणें हाच खरा काव्यानंद. हें सूत्र मला जरा विशद करावें लागेल.

आपण ‘ तेथें चल राणी ’ ही कविता घेऊं. यांतला प्रेमिक जगाच्या दांभिकपणाला कंटाळलेला आहे. आपल्या प्रेयसीला घेऊन दूर विजनांत जावें आणि तेथें स्वतःची अशी एक सृष्टि निर्माण करून राहावें असें त्याला वाटत असतें. केवळ शब्दार्थ तुम्हांला समजला किंवा या गीतांतले देखावे तुम्हीं मनानें पाहूं शकला म्हणजे संपलें नाहीं. तेवढ्यानें कांहीं तुम्हांला या हृदयंगम कवितेच्या गाभ्यापर्यंत जातां येणार नाहीं. या कवितेंत जी एक उदासरम्य विरक्तीची भावना आहे तिचा तुम्हीं अनुभव घेतला तरच या कवितेचें स्वारस्य कळेल. भोंवतालच्या गजबजलेल्या वातावरणाचा वीट कधीं आला आहे का तुम्हांला ? तो आला असेल आणि मित्रांनीं केलेल्या वंचनेचें शल्य तुम्हांला बोचत असेल तर कुठें-तरी दूर एकांतांत जावें असें तुम्हांलाहि वाटणें शक्य आहे. या वैतागाचा थोडा जरी अंश कवितेशीं समरस होतांना तुमच्या अंतकरणांत असेल तर तुम्हांला हें भावगीत वेड लावून सोडील, तुमची कल्पना—नौका त्याच्या प्रवाहांत धीरे धीरे वहात जाईल. एका अपूर्व आनंदाच्या सागरांत येऊन पोंचल्याचा तुम्हांला प्रत्यय येईल.

## अनुभूतीचा ब्रह्मानंद

जगांत सारेच अनुभव एका माणसाला येणें शक्य नसतें. पण कवीनें एकादा अनुभव किंवा भावचित्र तन्मयतेनें रंगविलें असेल तर त्यांत समरस होणें कुणालाहि शक्य असतें. आपल्या तशा घर्तीच्या लहानशा अनुभवावरूनहि काव्यांतील महान् अनुभूति आटोक्यांत येऊं शकते. तुम्हीं कधीं आपल्या प्रेमळ कुटुंबियांपासून दूर राहिला असाल आणि घरीं केव्हां परत जातों या जाणिवेनें जर तुम्हांला कधीं काळीं हैराण केलें असेल तर “ सागरा, प्राण तळमळला ” ही वीर सावरकरांची

कविता तुम्हांला विशेष हृद्य वाटेल. कांहीं अनुभव तुम्हीं स्वतः घेतले नसले तरी तुमच्या इष्टमित्रांना किंवा आप्तांना त्यांतून जातांना तुम्हीं पाहिलें असेल तर आपल्या अंतःकरणाचीं क्षितिजें वाढवून तुम्ही तेथवर पोंचूं शकाल. स्वतःचा, दुसऱ्याचा किंवा कल्पनेंतील अनुभव घेऊन काव्यविषयांत तुम्ही आपले प्रतिबिंब पाहूं लागाल तेव्हांच तुम्हांला काव्याचें खरें रसग्रहण करतां येईल. वाचनानें तोंडओळख, चिंतनानें मैत्री, आणि अनुभूतीनें ब्रह्मानंद मिळविणें हें कवितेच्या अभ्यासाचें तिहेरी सूत्र आहे. या सूत्रानें तुम्हांला कुठल्याहि सुंदर कवितेचें रसग्रहण करतां येईल.

कविता ही जगांतली एक अद्भुत गोष्ट आहे. ' उत्तम कविता असली म्हणजे तिच्यापुढें राज्याची काय किंमत आहे ? ' ( **सुकविता यद्यस्ति राज्येन किम्** ) असें भर्तृहरीनें का उगाच म्हटलें आहे ! इंग्लिश सेनापति वूल्फ एक महान् विजय मिळविल्यानंतर एका टेकडीवर पडला होता ग्रेच्या एका विलापिकेचें मनांत तो पाठांतर करीत होता. तो म्हणाला, " The paths of glory lead but to the grave असली ओळ लिहिणें, हें अनेक विजयांपेक्षां कितीतरी अधिक मोलाचें आहे. " असा आहे कवितेचा महिमा. कविता म्हणजे कांहीं स्वप्नाळू जीवांचें किंवा सुखवस्तू लोकांचें एक चैनीचें साधन आहे, यासारखा भयंकर गैरसमज दुसरा कोणचाच नसेल ! आपल्या मनाची संवेदनशक्ति वाढविणें, जगांतील गूढ सौंदर्याचा साक्षात्कार घडविण्याचें सामर्थ्य बुद्धीला आणून देणें आणि सर्व प्राणिमात्रांतील चैतन्याशीं एकरूप होण्याचा योग साधून देणें एवढें सर्व माणसाला कवितेनेंच शक्य होतें. तुम्ही व्यापारी असा, कारकून असा किंवा सैनिक असा, काव्यग्रंथानें तुमच्या जीवनांत शांति व सौंदर्य यांचे मळे खास बहरतील. जीवन-संग्रामांतला शीण विसरण्यासाठींच नव्हे तर तो संग्राम नेटानें लढण्यास

हुरूप यावा म्हणूनहि काव्याचा अभ्यास अवश्य आहे. तो पद्धतशीर करून तुम्ही आपलें जीवन सुसंस्कृत व संपन्न कराल अशी मी आशा करतों.

☆ ☆ ☆

**प्रश्न**

१. कवितेच्या अभ्यासाचें विहेरी सूत्र कोणतें ?

२. तुमच्या पद्यवेंच्यांतली तुमची सर्वांत आवडती कविता कोणती ?

३. तिचें रसग्रहण करा.

## अधिक वाचन

'तारका' ( सं. वि. स. खांडेकर )

'वासंती' ( सं. सुखटणकर )

☆ ☆ ☆

# सा हि त्य आ णि सं स्कृ ति ३

आज या संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारतांना होणारा आनंद मला झांकून ठेवतां येत नाहीं. कोल्हापूरमार्गें येतांना लागलेल्या निसर्ग-सौंदर्यानें अंतःकरणांत निर्माण केलेल्या प्रसन्नतेच्या लहरी अजून ओसरलेल्या नाहींत. लहान लहान सोंगट्यांसारखे डोंगर, मधूनच भेटणाऱ्या नद्या, हिरवेगार पानमळे आणि या सर्वांतून जागोजाग दिसणारीं इतिहासाचीं स्मारकें असा देखावा फार आल्हादकारक वाटला. निपाणी हें गांव महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या प्रीतिसंगमावर आहे. येथें कानडी व मराठी या दोन्ही वाङ्मयांची देवघेव होण्यास उत्तम संधि आहे. तुम्ही मराठी कुमारांनीं कानडी वाङ्मय, लोकगीतें, स्त्रीगीतें अभ्यासावींत. त्यांचीं रूपांतरें करून किंवा त्यांच्यावरून कल्पना घेऊन मराठी वाङ्मय समृद्ध करावें. पूज्य साने गुरुजींच्या आंतरभारतीचें कार्य याहून दुसरें कोणतें असणार? आपल्या भारतांत १३–१४ भाषा आहेत. त्यांच्या बाह्य स्वरूपांत आणि लालित्यांत वेगळेंपण असलें तरी त्याची अंतरंगांतली भारतीय संस्कृति एकच आहे. हें ओळखून मातृभाषा, राष्ट्रभाषा व प्रांतिक भाषा यांचा अभ्यास तुम्हीं केला पाहिजे. नारळाचें कवच, आंतील खोबरें आणि त्यांमधील

---

दक्षिण–महाराष्ट्र-कुमार-साहित्य संमेलनाचें अध्यक्षीय भाषण दि. १।५।५१, निपाणी.

३८८७५ २५५५

गोड पाणी हीं एकमेकांच्या आश्रयानें राहतात ना, त्याचप्रमाणें आपल्या प्रांताची, भारताची आणि अखिल मानवांची तीनहि प्रकारची संस्कृति एकमेकींच्या आश्रयावर अवलंबून असते. ही एकात्मता एकदां पटली म्हणजे भांडणाचें कारणच उरत नाहीं. वरच्या पिढींतील माणसांच्या सद्‌गुणांचा वारसा तुम्ही घ्या, पण वाद आणि मत्सर हे त्यांचे त्यांच्यापाशींच राहूं द्या. आपल्या स्वतंत्र व नवीन भारताची निर्मिति विशाल पायावर केली पाहिजे. तेथें कसलाच संकुचितपणा उपयोगी नाहीं.

## कुमारांचें वाङ्मय

कुमार-साहित्य हें दोन प्रकारचें असूं शकेल. कुमारांनीं लिहिलेलें आणि कुमारांसाठीं रचलेलें. प्रौढ वाङ्मयाचे तंतोतंत अनुकरण करून कुमारवाङ्मय लिहितां येणार नाहीं. कुमारवाङ्मयांत कुमारांच्या अडचणी आशा, आकांक्षा, स्वप्नें सर्व प्रतिबिंबित झालीं पाहिजेत. कुमारांनीं आपलें साहित्य जर प्रांजळपणें लिहिलें तरच त्याचें स्वरूप अशा प्रकारचें असूं शकेल. उदाहरणच घेऊन सांगतों. कुमार वयांत उत्साह ओसंडत असतो; आत्मसमर्पणाची, पूजनाची भावनाहि उत्कट असते. एकादा राष्ट्रीय महोत्सव निघाला तर त्यांत आपणहि कांहीं भाग घ्यावा असें कुमारांना वाटत असतें. समजा, तुमच्या गांवांतील वनमहोत्सव अथवा स्वातंत्र्यदिन यावर तुम्ही एक सुंदर ललित निबंध लिहिला आणि या राष्ट्रीय उत्सवांत पुरेसा भाग घ्यायला न मिळाल्यामुळें लागलेली हुरहूर तुम्हीं त्यांत तळमळीनें व्यक्त केलीत तर तो निबंध सरस ठरेलच, शिवाय प्रौढांना उदयोन्मुख पिढीच्या भावना कळण्यास त्यायोगें मदत होईल. काव्य काय, नाट्यछटा काय किंवा गुजगोष्टी काय, तुमच्या उत्साही मनाचें जर त्यांत सत्य प्रतिबिंब असेल तरच त्याला सौष्ठव येतें आणि इतरांनाहि त्याचा प्रत्यक्ष उपयोग होतो.

साहित्य-निर्मितीसाठीं अवश्य असलेली प्रतिभा कुमार-कालांतच फुलते. ज्ञानेश्वर महाराजांचें एकमेव व अलौकिक उदाहरण सोडलें तरी कित्येक प्रतिभासंपन्न साहित्यसेवकांचीं उत्कृष्ट वाङ्मयपुष्पें त्यांच्या कुमारवयांतच बहरलीं असें दिसून येईल. म्हणून कुमारवयांत साहित्य-साधना जरूर करावी असेंच मी सांगेन. मात्र शरीरमनाची सर्वांगीण वाढ, व्यवसायासाठीं उपयोगी पडणारें शिक्षण आणि प्रत्यक्ष जीवनाचें ज्ञान यांची हयगय होतां कामा नये. तशी हयगय झाली तर तुमचें पुढील जीवन कष्टमय तर होईलच, पण तुमच्या वाङ्मयालाहि सकसपणा येणार नाहीं.

प्रौढांनीं कुमारांसाठीं लिहिलेलें वाङ्मय आपण कुमार-साहित्यच म्हणतों. या साहित्याचें स्वरूप जरा निराळें असणार हें उघड आहे. प्रौढांनीं भाषा तर सोपी वापरावीच पण कल्पना-विचारांची गुंतागुंत अशा वाङ्मयांत फारशी करूं नये. सत्त्वगुणाला प्राधान्य मिळेल अशाच वाङ्मयाची कुमारांना जरूर आहे. कुमारांना मार्गदर्शन करतांना त्यांच्या अंतरंगांत शिरणें अवश्य असतें. तेथें बुद्धि आणि ज्ञान उपयोगी पडत नाहीं, त्यासाठीं प्रेम व कौतुक यांचीच गरज असते. मुलांचें मनोगत एखाद्या पंडिताला कळणार नाहीं पण त्या मुलाची माता तें सहज ओळखूं शकेल. प्रौढ साहित्यिकांनीं कुमार-वाङ्मय लिहितांना अशी मातेची भूमिका घेतली पाहिजे.

**वाङमयाचें तंत्र**

तुम्हा कुमार साहित्यिकांना तंत्राच्या दृष्टीनें पुष्कळ सांगावेंसें वाटतें. पण आज तेवढा अवकाश नाहीं. तंत्राची गुलामगिरी उपयोगी नाहीं त्याप्रमाणें तंत्राविषयीं बेफिकीर राहूनहि चालणार नाहीं. शुद्ध राग गातां आले म्हणजे मग निरनिराळ्या रागांचें मिश्रण बेमालूम व सुंदर करतां येतें. सुराचा कच्चा आणि अर्धशिक्षित गायक हें अवघड काम

कसें करूं शकणार ? म्हणून अगोदर शुद्ध व सरस लिहायला शिकणें हें तुमचें कर्तव्य ठरतें. तें साध्य झालें म्हणजे मग हव्य तशा करामती तुम्हांला करून दाखवितां येतील. कुमारलेखक काव्य, कथा, नाट्यछटा, निबंध इ. वाङ्मयप्रकारांपैकीं कोणता प्रकार आपण निवडावा याविषयीं गोंधळून जातात. होय ना ? या गोंधळांतून बाहेर पडायचें कसें त्याची युक्ति मी तुम्हांला सांगतों. एकादा चित्ताला चटका लावणारा प्रसंग तुम्हीं पाहिला म्हणजे साहजिकच तुम्हांला शब्दरूपानें तो चित्रित करावासा वाटतो. प्रत्येक माणसाचे गुणधर्म निराळे, त्याप्रमाणें त्याच्या भावना-विचारांचें उत्तम तऱ्हेनें प्रकट व्हायचें रूपहि वेगळेंच असतें. आतां आपल्या मनांत ज्या भावना हेलावल्या त्या काव्यांत खुलतील कीं कथेंत शोभतील, निबंधांत उठून दिसतील कीं नाट्यछटेंत उत्तम वठतील असा मनाला संभ्रम होतो. अशा वेळीं तो प्रसंग वा ती भावना निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांत लिहून पाहावी. यांतून कोणत्या प्रकारांत ती सरस ठरली हें तुम्हांला सहज कळेल आणि आपलें मत तुम्हांला जाणत्या रसिक आप्तांना व गुरुजनांना विचारून पक्कें करतां येईल.

—आणि मग अमुक एक वाङ्मयप्रकार आपल्या भावना रंगविण्याच्या दृष्टीनें आपणांला साधतो असें ठरलें कीं, त्याचा अभ्यास तुम्हीं विशेष नेटानें केला पाहिजे. अशी कल्पना करा कीं, तुम्हांला लघुकथा हा प्रकार आवडतो व साधतोहि, मग त्यावरच तुम्हीं सर्व लक्ष केंद्रित केलें पाहिजे. जुन्या नव्या चटकदार कथांचा बारीक अभ्यास केला पाहिजे. लघुकथेच्या तंत्रावर जे कुणी कांहीं लिहिलें असेल तें वाचून समजावून घेतलें पाहिजे. सुदैवानें कुणी उत्तम कथालेखक तुमच्या परिचयाचा झाला तर त्याच्या उत्तम कथांचे उगम व विकास त्याच्याकडून तुम्हीं काढून घ्यावेत. मनांत एकादा कथाविषय घोळवून

त्याची शब्दांमध्यें जास्तींत जास्त खुलावट कशी करतां येईल याचें चिंतन केलें पाहिजे. वाङ्मयाच्या तंत्राचा अभ्यास तो हाच होय.

## संस्कृति आणि साहित्य

पण हा सर्व वाङ्मयाच्या शरीराचा विचार झाला. तुम्हांला तुमच्या साहित्याचा आत्मा सुंदर व अमर करावयाचा असेल तर तुमची संस्कृति उच्च झाली पाहिजे. संस्कृति आणि साहित्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मनुष्याच्या जीवनांतलें नवनीत म्हणजे संस्कृति. हा शब्द अवघड वाटला तरी त्याचा अर्थ फार सोपा आहे. राग आला असतां जो बाहेर दिसूं देत नाहीं त्याला आपण सुसंस्कृत म्हणतों. प्रवासांत, कुटुंबांत इतरांच्या सोयी अगोदर पाहील त्याला सुसंस्कृत ही पदवी मिळते. आपल्या मनावर संयम आणि इतरांच्या सुखदुःखाची जाणीव असा साधा संस्कृति या शब्दाचा अर्थ आहे. अशी संस्कृति कमावलेली असली म्हणजे माणसाच्या शब्दांत, हालचालींत, इतकेंच काय दृष्टींतहि सौंदर्य येतें. त्याचे शिष्टाचार नैसर्गिक व डौलदार वाटतात. सर्वांना तो आपला सोयरा वाटूं लागतो. कुमार साहित्यिकांनीं संस्कृतीची ही थोरवी लक्षांत घेऊन तशी साधना केली पाहिजे.

अर्थात् अशी संस्कृति श्रद्धेशिवाय येत नाहीं. कांहीं मुलें अतिशय हुशार असतात, मेहनती असतात. कांहींतरी नवें करून दाखविण्याची ईर्षाहि त्यांना असते. परंतु ज्या त्या गोष्टीकडे हेटाळणीच्या दृष्टीनें पाहण्याची घातुक खोड त्यांना लागते. त्यांना माणसांत चांगुलपणा दिसत नाहीं. ज्या त्या गोष्टीची विकृत बाजू पाहणें म्हणजे बुद्धिचातुर्य असें त्यांना वाटतें. अशा रूक्ष वृत्तीच्या वाळवंटांत श्रद्धेचा झरा आटून गेल्याशिवाय राहात नाहीं. मग त्यांच्या हातून रमणीय वाङ्मय कसलें निर्माण होणार? तुम्ही कुमारांनीं ह्या वाळवंटांत न सांपडण्याची शिकस्त केली पाहिजे.

३७६२५ क्रमांक ....७५५५

## साहित्याची थोरवी

तुम्हांला साहित्याची गोडी एवढ्या लहान वयांतच लागली हें मोटें भाग्यच म्हटलें पाहिजे. जगांतल्या सौंदर्याचा गाभाच तुम्हीं गांठला आहे. साहित्यासारखें जगांत काय आहे ? पांच हजार वर्षांपूर्वींचीं मंदिरें; राजवाडे, रत्नें, भूषणें आज कुठें दिसत नाहींत. पण त्यावेळचें अमर काव्य रामायण, आज लक्षावधि लोक वाचीत आहेत. एक खून केला कीं रांजणांत एक खडा टाकायचा असें वाल्या कोळी करीत असे. ते त्याचे खड्यांनीं भरलेले रांजण आज उरले नाहींत, पण वाल्याचा वाल्मीकि झाल्यावर त्यानें जें रामायण रचलें तें मात्र शिल्लक आहे. व्यक्तीच्या काय किंवा राष्ट्राच्या काय, जीवनांत सर्व बऱ्यावाईट गोष्टी जाऊन उत्तम वाङ्मय तेवढें शिल्लक राहतें. महाकवि कालिदासाचें पहिलें रंगेल आयुष्य आहे का कोणाच्या लक्षांत ? पण ' शाकुंतल ' मात्र अजून लोकांना रिझवीत आहे. हेंच गोविंदाग्रजांच्या सुंदर शब्दांत सांगायचें म्हणजे—

' खुनी खड्यांनीं भरले रांजण वाल्याचे फुटले सारे
उरलें रामायण तें नटवी श्रीरामा निज आधारें '

काळाच्या आणि विस्मृतीच्या तडाख्यांतून टिकून राहणारें असें जें अमर साहित्य आहे त्याची मनोभावें उपासना करा. तशीच प्रतिसृष्टि निर्माण करण्याची हिंमत बाळगा.

## हा पूर ओसरूं नये

कुमार मित्रांनो, सद्भावना व उत्साह यांचा पूर नेहमींच येतो. पण तो साटवून धरला म्हणजेच त्यांतून सामर्थ्य पैदा होतें आणि तें नेहमीं आपल्याला चांगल्या कामाकरितां वापरतां येतें. या कुमार साहित्यसंमेलनासाठीं तुम्ही अनेक कार्यकर्ते एकत्र जमलांत, परस्परांचे मतभेद विसरून सहकार्य केलेंत आणि या

भागांतील लोकांची सहानुभूति व सहकार्य मिळविलेंत. आतां तुम्हीं मिळविलेला हा अनुभव व हें सहकार्य कायम ठेवा. दोन दिवसांचा सोहळा संपला कीं, ज्यानें त्यानें आपापल्या कामांत गर्क व्हावें आणि समारंभांत केलेले संकल्प व योजना विसरून जाव्यात हें योग्य नव्हे. आतां तुमची जबाबदारी संपली नसून सुरू झाली आहे. साहित्याचें हें वातावरण कायम राखण्याचा प्रयत्न करा. आपल्या मनांत उत्पन्न झालेल्या भावनांना उद्गार देणें आणि उत्तमोत्तम कलाकृतींचा परिचय करून घेणें असें दुहेरी कार्य तुम्हीं केलें पाहिजे. चर्चा, अभ्यास-मंडळें, व्याख्यानें इ. सतत घडवून आणून आपल्या सुप्त प्रतिभेला तुम्हीं नेहमीं जागृत ठेवलें पाहिजे. साहित्य हें शंकराप्रमाणें आहे. म्हणजे तें कल्याण करणारें ( शम्=कल्याण ) तर आहेच, पण एकदां प्रसन्न झालें म्हणजे तुम्हांला हवें तें देईल. जगावर हुकमत चालविण्याची सत्ता तें तुम्हांला बहाल करील. पण शंकराला प्रसन्न करून घेण्यासाठीं केवढी उग्र तपश्चर्या करावी लागते हें तुम्हांला ठाऊक आहे ना ? ती करण्याची तुम्ही तयारी करा एवढाच प्रेमाचा संदेश तुम्हांला देत आहें. जयहिंद !

* * *

**प्रश्न**

१. कुमार–साहित्याचे प्रकार कोणते ?
२. आपणांस कोणता वाङ्मयप्रकार येतो हें कसें ठरवाल ?
३. सुसंस्कृत कुणास म्हणावें ?

**अधिक वाचन**

पूज्य साने गुरुजींचें कु. सा. संमेलनाचें अध्यक्षीय भाषण.
‘ कुमारांचा सोबती ’ ( ले. निसुरे )

* * *

# सामर्थ्यवान् वाङ्मय 

तुम्हीं आज कुठल्याहि विषयावर बोलण्याची मुभा मला दिली आहे आणि माझ्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा केली आहे. वाङ्मयाचा अभ्यास या विषयावर मी आज सांगणार आहें. लहानपणीं मराठी वाचनमालेंत 'चैनीची चट' या नांवाची एक गोष्ट आम्हांला होती. एक रानटी राजा होता. त्याची राहणी अगदीं साधी असे. तो सकस, साधें, पौष्टिक असें अन्न खाई. शरीरश्रमांची महती त्याला ठाऊक होती. निद्रा काय अथवा विलास काय, सर्वच गोष्टींत तो पराकाष्ठेचा संयमी होता. त्यामुळें त्याचें मन व शरीर खंबीर झालें होतें. शारीरिक दगदगीचीं कामें तो धिमेपणानें करी आणि मोठाल्या संकटांतहि मन अत्यंत स्थिर ठेवीत असे. एकदां तो अरण्यांत शिकारीसाठीं गेला. तेथें मृगया करतां करतां एकटाच तो पुढें गेला. बरोबरचीं सेवक माणसें व शिधासामग्री मागें राहिली. पोटांत तर भुकेनें काहूर उठविलें होतें. इतक्यांत त्याला एक मधाचें पोळें दिसलें. तें अगदीं अधाशीपणानें त्यानें खाल्लें. त्याची भूक शांत झाली. पण तेव्हांपासून त्याच्या जिभेला गोड पदार्थांची चटक लागली. राजेसाहेबांच्या रोजच्या जेवणांत गोडधोड असलेंच पाहिजे असे हुकूम बल्लवांना सुटले. राजाची जीभ

---

म. ए. सोसायटीचें हायस्कूल, ६ वी (ब) चें वार्षिक संमेलन, पुणें. दि. २३-३-४२.

पुढें पुढें त्याच्या ताब्यांत राहीनाशी झाली, आणि भोजनांत मसालेदार पदार्थ व मिष्टान्नें असल्यावांचून त्याला जेवण जाईना. याचा परिणाम व्हायचा तोच झाला.

त्याचें शरीर सुस्तावलें. मन आळशी बनलें. हळू हळू एकेका व्यसनानें त्याच्या जीवनांत प्रवेश करून कायमची वस्ती करण्यास सुरुवात केली. अखेर ज्या शत्रूंना हा राजा अजिंक्य वाटत होता त्यांनीं त्याचा पाडाव करून त्याचें राज्य बळकावलें.

**केवळ माधुर्यावर लक्ष नको**

केवळ मधुरता व सुखवाद याच्या नादानें असा सर्वनाश होतो! हें वाङ्मयाच्या अभ्यासांतहि तुम्हीं लक्षांत ठेवलें पाहिजे. शाळेंतील अथवा कॉलेजांतील पहिल्या दुसऱ्या वर्षांतील वाङ्मयप्रेमी मुलें व साहित्यिक होऊं इच्छिणारे कुमार व कुमारी माझ्याकडे येतात, तेव्हां मी प्रथम त्यांनीं काय वाचलें आहे असें विचारतों. आणि बहुधा अलीकडे ज्यांचीं नांवें लोकप्रिय झालीं आहेत अशा चार प्रसिद्ध लेखकांच्या ललित कृतींखेरीज त्यांनीं कांहीं वाचलेलें नसतें असें आढळून येतें! हे प्रसिद्ध लेखक प्रतिभासंपन्न आहेत आणि त्यांचीं पुस्तकें चित्ताकर्षक आहेत हें खरें; पण एवढीं चार पुस्तकें वाचलीं म्हणजे मराठी भाषेच्या रत्नभांडाराचें समग्र दर्शन झालें काय? मुळींच नाहीं. ललित वाङ्मय वाचूं नये असें मी कधींच सांगणार नाहीं. मन सौंदर्यवादी होण्यास व त्याला जीवनांतला रस अनुभवण्याची शक्ति येण्यास ललित वाङ्मय वाचलेंच पाहिजे. अमुक वाचा आणि तमुक वाचूं नका असें माझ्या जाणत्या बालमित्रांना मी कधींच सांगत नाहीं. हा कर्मठपणा मीं स्वतः कधीं केला नाहीं आणि दुसऱ्याला शिकविला नाहीं. नववयांत शरीराप्रमाणें मनाचीहि क्षुधा नेहमीं प्रदीप्त असल्यानें कुठल्याहि सकस निकस वाङ्मयाचें भस्म होऊन विविध रस मिळत राहातात.

पण हें लक्षांत ठेवा कीं, याहि वयांत सकस अन्न भरपूर मिळत असेल तर——नव्हे तरच तुमची वाढ होईल. आणि क्वचित् चविष्ट व निःसत्त्व पदार्थ खाण्यांत आले तरी ते बाधणार नाहींत. पण नुसत्या खुमासदार पण सत्त्वहीन गोष्टींवर तुम्हीं ताव मारला तर आंतडीं कमजोर होतील. म्हणूनच केवळ मधुर व मनोरंजक वाचण्याविरुद्ध माझा कटाक्ष आहे. लोकमान्यांचे राजकीय निबंध किंवा लोकहितवादींचीं 'शतपत्रें' असे ओजस्वी प्रबंध वाचावे आणि मग मनोरंजनासाठीं सुरस कथाहि वाचाव्या.

## जीवनाच्या दोन बाजू

काय वाचावें हें सांगतांना मला एका मोठ्या विषयाची तुम्हांला नीट ओळख करून द्यायची आहे. जीवनाला रम्य आणि भीषण अशा दोन्ही बाजू असतात. रम्य आणि ललित एवढीच बाजू तुम्हीं पाहिली तर अर्धेंच सत्य तुम्हांला कळेल. आणि अर्धसत्यासारखें भयानक दुसरें काय आहे ? केवळ ललित-मधुर असें वाचल्यानें जीवनाचें असें अपूर्ण दर्शन होतें आणि जेव्हां कांहीं गंभीर किंवा भयानक गोष्टी पुढें येतात तेव्हां तुमचा थरकांप उडतो. त्यांच्याशीं तुम्हांला समरस होतां येत नाहीं. किंवा त्यांच्यांतलें भव्य सौंदर्यहि तुम्हांला आकलन करतां येत नाहीं. मधुर व नाजुक गोष्टींत सौंदर्य असतें आणि भीषण गोष्टींत तें नसतें असें थोडेंच आहे ? आपल्या बंगल्यांतील पुष्पवाटिका जितकी रम्य तितकाच खवळलेला दर्याहि शोभायमान दिसतो. पण नेहमीं पुष्पवाटिकेंत तुम्ही हिंडत राहिला तर आकाशाला भिडणाऱ्या लाटांचें तांडव पाहून हर्षित होण्याचें सामर्थ्य तुमच्या मनाला येणार नाहीं.

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
बकुल फुलांच्या प्राजक्तींच्या दळदारी देशा ॥'

असें आपल्या महाराष्ट्राचें वर्णन कविश्रेष्ठ गोविंदाग्रजांनीं केलें आहे. पण

तुम्हांला खुसखुशीत वाटणारें आजचें बरेंच कथावाङ्मय बकुळ फुलांच्या दळदारी महाराष्ट्राचीच काय ती कल्पना तुम्हांला देते. राकट महाराष्ट्राचा परिचय तुम्हांला होत नाहीं. आपला देश व आपला देव मोहकहि आहे आणि भयंकरहि आहे. गोकुळांत मुरली वाजविणारा कन्हैय्याच कुरुक्षेत्रांत अर्जुनाला संहाराचा कठोर सदुपदेश करतो. यांतल्या फक्त मोहक रूपाचेंच तेवढें पूजन करून चालणार नाहीं. तसेंच महाराष्ट्राच्या नाजुक स्वरूपाप्रमाणेंच त्याच्या कणखर अंगाचाहि तुम्हीं शोध घेतला पाहिजे. तिरंगी वेष्टनानें मढविलेल्या आजच्या लुसलुशीत कथावाङ्मयापलीकडे तुम्हीं दृष्टि दिली पाहिजे. चिपळूणकर, टिळक, लोकहितवादी, आगरकर, राजवाडे, केळकर इ० महान् द्रष्टे साहित्यसेवक आपणांत होऊन गेले आहेत. त्यांनीं आपलें उदंड व ओजस्वी लिखाण मागें ठेविलें आहे. त्याकडे तुमची दृष्टि वळूं द्या. ललितवाङ्मयांतसुद्धां जे भीष्मद्रोणांसारखे उग्र व प्रभावशाली साहित्यिक आहेत त्यांच्याकडे तुमची दृष्टि वळत नाहीं असें मला खेदानें म्हणावें लागतें. नाट्याचार्य खाडीलकरांचीं धीरगंभीर नाटकें वाचलीं आहेत तुम्हीं ? लक्ष्मीबाई टिळकांच्या रमणीय आत्मचरित्राचा गाढ परिचय कितीकांनीं करून घेतला आहे ? कादंबरीपेक्षांहि चटकदार अशा भाग्यांच्या नेपोलियन चरित्रावर कितीकांच्या उड्या पडतात ? गोडसेशास्त्र्यांनीं प्रत्यक्ष पाहून लिहिलेल्या ५७ सालच्या बंडाचा चित्ताकर्षक वृत्तांत तुमच्यापैकीं कितीकांना माहीत आहे ? महाभारत, रामायण इ० आमच्या अमर महाकाव्यांचा मुळांतून अभ्यास कितीकांनीं केलेला असतो ? श्रीकृष्णचरित्र ( वैद्य ), रामकृष्णवाक्सुधा इ० सुरस ग्रंथरत्नांची तोंडओळख तरी आहे काय तुम्हांला ? राजस्थान व महाराष्ट्र यांच्या ज्या स्फूर्तिदायक इतिहासकथा आहेत, त्यांची दखल तरी तुम्हांस आहे काय ? या सर्व प्रश्नांचीं उत्तरें नकारात्मक, निराशाजनक येतील हें मला माहीत

आहे. म्हणूनच माझी आग्रहाची प्रार्थना ही कीं, चार उथळ कादंबऱ्यांहून सकस व सुंदर असें हें मराठी वाङ्मय तुम्ही वाचा. आणि वाङ्मयाच्या व जीवनाच्या भव्यतेकडे पाहण्यास शिका.

आपलें ललित वाङ्मय ठरीव ठशाचें असतें. त्यांत निरनिराळ्या शास्त्रांचें, कलांचें, व्यवसायांचें प्रतिबिंब पडत नाहीं. युरोपीय लेखक आपल्या वाङ्मयाला अनेक शास्त्रांचा व जीवनशाखांचा आधार घेतात. तिकडील वाचकहि बहुश्रुत असतात, म्हणून तुम्ही या वयांत ललित वाचनाबरोबर धर्म, इतिहास, समाजशास्त्र, विज्ञान इ. महत्त्वाच्या विषयांत गति मिळवली पाहिजे.

**जगाची कडक परीक्षा**

तुम्ही आतां लवकरच प्रवेश परीक्षेला बसाल. याचवेळीं जगहि एका प्रवेश परीक्षेला बसेल. ही परीक्षा फार भयंकर आहे. यांत तुम्ही आम्ही सर्वच सांपडलों आहोंत. आजपर्यंतचा इतिहास असें सांगत आला आहे कीं, ज्यांचीं शस्त्रास्त्रें जास्त सुधारलेलीं व ज्यांची संघटना अधिक प्रभावशाली असते तींच माणसें यशस्वी होतात. आज पेटलेल्या रणांगणावरील ज्वाळांत हेंच सत्य पुनः एकदां तावून सुलाखून निघणार आहे. पण याच वेळीं आणखीहि एक सत्य आपण शिकणार आहोंत. ज्यांचीं ध्येयें अधिक नवीन, ज्यांच्या ध्येयामागें राष्ट्रांतील सर्वांच्या सर्व जनता आहे, तीं माणसें आपल्याहून कांकणभर शक्तिमान् असलेल्या समूहाचा पाडाव करूं शकतात. रशियाची यंत्रसामुग्री किंवा शस्त्रास्त्रें जर्मनीहून काय अधिक सामर्थ्यवान आहेत? छेः मुळींच नाहींत. पण आपला व आपल्या राष्ट्राचा विजय होण्यांत जगाचा फायदा आहे ही रशियन जनतेची श्रद्धा आहे. म्हणूनच जर्मनीचा अजिंक्य सेनासागर अगस्ति ऋषीप्रमाणें आपण पिऊन टाकूं असा गाढ विश्वास रशियन जनतेला वाटत आहे. यांतलें रहस्य ध्यानीं घ्या.

गंभीर विचार करण्याचा काळ आहे. 'हिंदुस्थानला आज मुरली वाजवणाऱ्या कृष्णाचें पूजन अवश्य नसून गीता सांगणाऱ्या कृष्णाचें पूजन जरूर आहे.' असें श्रीमत् स्वामी विवेकानंद म्हणत. त्यांचे ते उद्गार आज कितीतरी पटींनीं आमच्या देशाला अधिक लागू आहेत. जीवनाच्या व वाङ्मयाच्या मधुर स्वरूपांत दंग न होतां नवीं शास्त्रें व नवीं ध्येयें यांचें अध्ययन करा आणि त्रिकाळ आपदांशीं धीरानें तोंड देतां येईल असें सामर्थ्य संपादन करा.

* * *

**प्रश्न**

१. सौंदर्याच्या दोन परस्परभिन्न बाजू कोणत्या त्या सोदाहरण दाखवा.

२. कणखर वाङ्मय कशास म्हणाल ?

**अधिक वाचन**

'जीवनदृष्टि' (विनोबा)

'लोकमाता' (कालेलकर)

'पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ' (श्री. म. माटे)

* * *

# "देवांच्या मदतीस चला तर!" ५

कुमार-साहित्य-संमेलनाच्या ३ ऱ्या अधिवेशनाचें अध्यक्षपद मला देऊन तुम्हीं जो माझा बहुमान केला त्याबद्दल मी सानंद आभारी आहें. या बहुमानाला वाङ्मयीन कर्तृत्वाच्या दृष्टीनें मी किती लायक ठरेन, कोण जाणे! पण या पदासाठीं दुसरी एक पात्रता मात्र मीं खास मिळविली आहे आणि ती म्हणजे दृढ ऋणानुबंधाची. कुमार-साहित्य संघटनेची कल्पना माझे बंधुतुल्य मित्र भाई वीरेंद्र अढिया यांनीं प्रथम माझेजवळ बोलून दाखविली आणि त्यांच्या दुर्दम्य उत्साहानें ते कामासहि लागले. गेल्या दोन वर्षांत या संघटनेचा केवढा तरी विस्तार झाला! या कामीं भाई अढिया आणि त्यांचे सहकारी यांच्याशीं मी हरतऱ्हेचें सहकार्य कौतुकानंदानें केलें. सल्लागार, परीक्षक, वक्ता इ. अनेक भूमिका कुमार-साहित्य-मंडळानें माझ्याकडून वठवून घेतल्या आहेत. कित्येक गांवीं शाखा स्थापण्यासाठीं मीं प्रत्यक्ष प्रोत्साहन व मार्गदर्शनहि केलें आहे. अशा रीतीनें या संघटनेशीं माझें नातें अत्यंत दृढ होत गेलें आणि आजचें अध्यक्षस्थानहि त्या नात्यानेंच मजकडे आलें. मजकडे आलेली ही मोठ्यांत मोठी भूमिका आहे. तुमच्या उत्साही कार्यकुशलतेच्या साह्यानें ती मी यशस्वी रीतीनें पार पाडूं शकेन असा मला विश्वास वाटतो.

---

कुमार-साहित्य-संमेलनाच्या तिसऱ्या अधिवेशनाचें अध्यक्षीय भाषण. दि. २४-१२-४५ मुंबई.

**येशू आणि गुरुजी**

आज २४ डिसेंबर. ही तारीख फार मंगल आहे. १९४५ वर्षांपूर्वी या दिवसाची रात्र उलटतांच मानवांना प्रेमशांतीचा संदेश देऊन त्यांच्या सुखासाठीं स्वतःचें बलिदान करणारा 'देवाचा पुत्र' येशू जन्माला आला. येशूचा उज्ज्वल संदेश विशिष्ट काळासाठीं नाहीं किंवा विशिष्ट जमातीसाठींहि नाहीं. सर्व काळीं, सर्व मानवांना या संदेशाची जरूरी आहे. ख्रिस्तजयंतीच्या पर्वकाळीं आपण त्याच्या अमर अवतार-कार्याचें स्मरण व मनन करूं या. आजच्या दिवसाचें आणखीहि एक माहात्म्य आहे. तें माझ्याहि अगोदर तुमच्या लक्षांत आलें असेल. आपल्या सत्त्वसुंदर वाङ्मयानें कुमारांना रिझविणारे व त्यागमय जीवनानें हजारों लोकांना स्फूर्ति देणारे पूज्य साने गुरुजी यांचा आज वाढदिवस आहे. साहित्य व सेवा यांचा त्यांनीं प्रज्वलित केलेला नंदादीप कधींहि न विझणारा आहे. ज्या मातृभूमीसाठीं ते चंदनासारखे झिजत आहेत ती स्वतंत्र व उन्नत झालेली पाहण्यासाठीं त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी आपण प्रार्थना करूं या.

एवढ्या मंगलाचरणानंतर आजच्या कार्याकडे वळूं या. कुमारसाहित्य संघटना ही आतां केवळ कल्पनेंतली गोष्ट राहिलेली नसून तिला मूर्त रूप आलें आहे व तें चांगलें बाळसें धरूं लागलें आहे. या वेळींच या संघटनेच्या वाढीला व सौष्ठवाला बाधक होणाऱ्या गोष्टींचा आपण दक्षतेनें विचार केला पाहिजे. थोडा संकोच बाजूला ठेवून मी सांगतों, कीं साहित्यसेवक भाषाप्रेमी लोक यांच्या वयपरत्वें वेगवेगळ्या संघटना असाव्यात या कल्पनेचा मी आद्यप्रवर्तक आहें. आणि म्हणूनच या कल्पनेला प्रत्यक्ष आकार देतांना कोणतीं वादळें लोक उठवितात व कोणते आक्षेप घेतात याची मला चांगली जाणीव आहे. यांपैकीं विघ्न-संतोषी व मत्सरी असे जे कोणी लोक असतील त्यांच्या कारस्थानाची

अनुक्रम...३८८१५ ... २५५५ [illegible]

चाहूल घेत राहणें हें आपलें कर्तव्य आहे. त्यांच्या आक्षेपांचा विचार करण्याचें कारण नाहीं. आणखीहि एक वर्ग आहे. त्याला कुठलीहि नवी गोष्ट नेहमींच भयंकर वाटत असते. या वर्गाची तर उपेक्षा करणेंच बरें. आपण आपलें नियोजित कार्य सावधानतेनें व सतत करीत राहण्यानेंच या मंडळींना चोख उत्तर दिल्यासारखें होईल.

पण याचा अर्थ जनमताविषयीं तुम्हीं बेफिकीर राहावें असा मात्र नाहीं. कांहीं प्रामाणिक आक्षेपकांची वाणी कठोर असली तरी त्यांच्या अंतःकरणांत सद्भावना असते. अशा सज्जनांचें म्हणणें जरूर ऐकलें पाहिजे. त्यांत कांहीं तथ्य असेल तर तें जरूर पत्करलें पाहिजे. पण त्यामध्यें फोलपणा असल्यास तोहि निर्भयपणें दाखविला पाहिजे.

**संघटना व जीवन**

संघटनेच्या व्यापांत कुमारवर्ग सांपडला तर तो जीवनापासून दूर जाईल व कौमार्यांतील आनंदाला पारखा होईल असा एक आक्षेप अलीकडे नव्यानेंच घेतलेला मीं ऐकला ! कौमार्यांतील जीवनानंदाविषयीं आक्षेपकांच्या काय कल्पना आहेत कोण जाणें ! पण एकत्र येऊन विचार विनिमय करणें, आपल्या लेखनावर हंसतखेळत चर्चा करणें, नाटयप्रदर्शन, संमेलनांच्या मोठाल्या योजना आंखून त्या पार पाडणें, निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रख्यात व्यक्तींचा परिचय करून घेणें, या व अशा गोष्टींत काय कमी आनंद आहे ? अशा कामांत मिळणारें सहकार्याचें शिक्षण काय कमी मोलाचें आहे ? या कामीं वाढीस लागणारी कार्यक्षमता का पुढील जीवनांत निरुपयोगी ठरेल ? या सर्व प्रश्नांचीं उत्तरें कोणीहि माणूस नकारार्थींच देईल.

संघटनेच्या उपयुक्ततेविषयीं हवें तेवढें सांगतां येईल. साहित्याची उपासना करण्यासाठीं अवश्य असलेलें वातावरण या संघटनेनें तयार

होत आहे. हा या संघटनेचा सर्वांत मोठा फायदा मी समजतों. आपणांस उपलब्ध होणाऱ्या नव्या-जुन्या पुस्तकांची तुम्ही चर्चा करतां, कुणीं नवें लेखन केलें असल्यास तें वाचून दाखवितो, भाषाप्रभूंचे व राष्ट्रीय–विभूतींचे जन्मदिन व पुण्यतिथि तुम्ही उत्साहानें पाळतां, गांवांत कुणी वाङ्मयसेवक आल्यास त्याचा कार्यक्रम करतां हें सर्व भाषाप्रेमास अत्यंत पोषक आहे. 'तिसरी आघाडी', 'उगवल्या दिशेकडे' असे गद्यपद्यात्मक संग्रह तुम्हीं प्रसिद्ध केले. हस्तलिखितें व 'प्रेरणा' तुम्ही चालवितां. कित्येक नियतकालिकांत कुमार साहित्यासाठीं स्वतंत्र दालन सुरू करण्याची तुम्हीं व्यवस्था केली आहे. "कुमारांचें अंतरंग" उकलून दाखविण्यासाठीं अवघड वाङ्मयप्रकार हाताळण्याची महत्त्वाकांक्षा तुमच्यांतले वीर बाळगीत आहेत. अशा अनेक चळवळी करून भाषाप्रेम जागृत करण्याचा तुम्हीं जो प्रयत्न चालविला आहे त्यामुळें आपल्या मायबोलीला केवढा आनंद होत असेल !

"हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं"

ही आपल्या ज्येष्ठ पुत्रांनीं केलेली प्रतिज्ञा आतां सिद्धीच्या अगदीं जवळ येऊन पोचली असा हर्ष तिच्या अंतःकरणांत भरून राहिला असेल ! म्हणूनच आक्षेपांनीं बुजून न जातां चालू कार्याचा व्याप सहस्रपटींनीं वाढवा. ज्ञान अपार आहे. त्याला अनंत शाखा आहेत. एक व्यक्ति कितीहि बुद्धिमान् असली तरी तिला स्वतःच्या शक्तीनें या अपरंपार ज्ञानाचा आपल्या जीवनांत फारच थोडा परिचय करून घेतां येतो. इतरांचें सहकार्य लाभलें तर मात्र या ज्ञानोदधींत चार हात पुढें जाणें शक्य होतें. तुमच्या संघटनेनें ही सोय होण्यासारखी आहे. कुणी इतिहासांत विहार करावा; कुणी विज्ञानांत प्रगति करून आपल्या बंधुभगिनींना नवा दृष्टिकोन द्यावा, कुणी धर्मतत्त्वांचा अभ्यास पत्करावा आणि अशा रीतीनें—

" एकमेकां साह्य करूं अवघे धरूं सुपंथ "

या श्रीद्धाप्रमाणें परस्परांचें भांडार समृद्ध करावें. हें कार्य झगझगीत नाहीं, पण भरीव आहे. याच कार्यामुळें तुमची संघटना अत्यंत प्रभावशाली ठरणार आहे.

आणखी एका दृष्टीनें मी या संघटनेची महती फार मानतों. या संघटनेमुळें तुमच्या अंगीं असलेले साहित्याचे गुण तर विकसित होतीलच, पण खास तुमच्यासाठीं साहित्य निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा मोठाले लेखक बाळगूं लागतील. पावसाळ्यांत भरपूर पाऊस पडला म्हणजे पावसाळी पिकें तर चांगलीं फोफावतातच; पण पुढेंहि जमिनींत ओलावा कायम राहून दहिंवरावर हिवाळ्यांत नवीं पिकें वाढूं शकतात. तुमच्या संघटनेचा दुहेरी फायदा होणार आहे. माझी नेहमींची तक्रार आहे कीं, बाल व कुमार यांच्याकरितां वाङ्मय लिहिण्यांत मराठींतील प्रतिभाशाली लेखकांना मोठासा पुरुषार्थ वाटत नाहीं. हें दालन अल्प कुवतीच्या लोकांकरितां आहे अशी खोटी समजूत करून घेऊन मोठे लेखक याची नेहमीं उपेक्षा करीत आले आहेत. पण सोपें लिहिणें किती अवघड आहे याची यांना कल्पना नाहीं. अर्थात् याला कांहीं नामांकित अपवाद आहेत हें मला मान्य आहे. तुमची संघटना जसजशी प्रबल होईल, तुमच्यांतलीं सामर्थ्यें एकवटून तुमच्या आवडीनिवडींना जसजसें निश्चित रूप मिळेल, विशेषतः संघटित कुमारवर्ग स्वतःच्या आवडत्या लेखकांना नवी इभ्रत देऊं शकतो हें जेव्हां श्रेष्ठ लेखकांना कळेल तेव्हां त्यांची लेखणी या बाजूला खासच वळेल अशी चिन्हें सुदैवानें आजच दिसत आहेत. अनेक लेख लिहून व भाषणें करून जें होत नव्हतें तें या संघटनेनें सहजच होणार आहे, हें पाहून मला अत्यंत हर्ष होत आहे. तुम्हां कुमार संघटकांना यासाठीं मी धन्यवाद देतों.

## कुमारांसाठीं बोलपट

बोलपटाचे क्षेत्रांतहि कुमार-वर्गाला हितकारक अशा सुधारणा घडवून आणण्याची हिंमत तुम्हीं बांधली आहे हें उत्तमच आहे. चित्रपटांनीं होणारें ज्ञान हें प्रत्यक्ष व परिणामकारक असतें. ज्ञानेंद्रियांत दृष्टि सार्वभौम आहे. म्हणून भाषा, इतिहास, भूगोल, फार काय गणित सुद्धां चित्रपटाच्या साह्यानें शिकूं लागल्यास कुमार वर्गांत ज्ञानप्रसार फार प्रचंड प्रमाणावर होईल. स्फूर्ति, ज्ञान, आणि संस्कृति हीं सर्व चित्रपटांच्या माध्यमानें हंसतखेळत व परिणामकारक रीतीनें देतां येतात. आपल्याकडे पौराणिक व ऐतिहासिक अशा कांहीं अगदीं थोड्या विल्यात कुमारांचें जीवनकार्य रुपेरी पडद्यावर आलें आहे व त्यांतलें बरेंच चित्रण सुंदर वठलें आहे. पण हें कार्य आजच्या काळापर्यंत येऊन पोंचणें जरूर नाहीं काय ? एडिसन, गॉर्की इ. आजच्या काळांतील महानुभावांचें स्फूर्तिदायक कुमारचरित्र जसें पाश्चात्यांनीं सेल्युलाईडवर अमर केलें तसें आपल्या महापुरुषांचे बाबतींत आमच्या दिग्दर्शकांना करतां येणार नाहीं काय ? जरूर येईल. मात्र या बाबतींत तुम्हीं सदैव जागृत राहून सतत प्रयत्न केले पाहिजेत. यासाठीं सिनेमा-सृष्टीशीं आपल्या संघटनेचा ऋणानुबंध कसा जोडावा हें तुम्ही स्वतः तर ठरवालच. पण जाणत्या सल्लागारांचीहि मदत घेण्यास तुम्ही विसरणार नाहीं असा विश्वास आहे.

वाङ्मय आणि संस्कृति यांत आकाशवाणीचा ( Radio ) शोध जितका आश्चर्यजनक तितकाच प्रभावी आहे. आकाशवाणीच्या कार्यक्रमांत कुमारांसाठीं कांहीं वेळ राखून ठेवण्यांत येतो. खास कुमारांसाठीं झालेल्या कार्यक्रमांत आपणांला रंजक व उद्बोधक भाग किती आहे, हें तुम्हीं निरलसपणें पाहिलें पाहिजे. आपल्या अपेक्षा, कार्यक्रमांतील उणीवा, दोष हे सर्व थेट केंद्राधिकाऱ्यांपर्यंत

३६८९५ १५४५

नेण्याची दक्षता तुम्हीं दाखविली पाहिजे. वाङ्मयाचा जसा आपण तुलनात्मक अभ्यास करतों त्याचप्रमाणें इंग्लिश, हिंदी, बंगाली इ. समृद्ध भाषांच्या केंद्रांवरून कुमारांसाठीं होणारे कार्यक्रमहि तुम्ही जरूर ऐका. त्यांत कांहीं वेगळें नावीन्य व आकर्षकपणा असल्यास तो आपल्या मराठी कार्यक्रमांत आणण्यासाठीं मूळ केंद्राकडे आग्रहपूर्वक सूचना पाठवा. या कामीं यश येण्याचे बाबतींत कांहीं प्रख्यात साहित्यिक जितके निराशावादी आहेत तितका मी नाहीं ! तुम्हीं यासाठीं अगोदरच प्रयत्न चालविले आहेत हें उत्तमच आहे.

मित्रहो ! तुमचें केवळ गुणसंकीर्तन करणें आणि तुम्हांला ' शाबासकीची टाळी ' देणें एवढाच माझ्या विवेचनाचा हेतु नाहीं. प्रथमच मीं सांगितलें आहें कीं, तुमचा एक निकटचा ऋणानुबंधी म्हणून हें अध्यक्षस्थान मजकडे आलें आहे. आपुलकीच्या नात्यांत कौतुकाइतकेंच दिग्दर्शनहि अवश्य असतें. माझी अशी खात्री आहे कीं, माझ्या सांगण्यांत किंचित् कटुता आली तरी ती मायेच्या पोटींच आली आहे हें जाणून तुम्ही माझ्या सांगण्याचा योग्य तो आदर कराल.

संघटना ही वाङ्मयप्रचाराला अवश्य असते. पण उत्तम वाङ्मय-निर्मिति मात्र संघटनेच्या जोरावर करतां येतेच असें नाहीं. " शाकुंतल ", " गीतांजलि " किंवा " ज्ञानेश्वरी " अशा श्रेष्ठ व रमणीय वाङ्मयकृति दहा माणसांनीं एकत्र सहकारी संस्था काढून कांहीं तयार करतां येत नाहींत. एकेक प्रतिभासंपन्न व्यक्तीच आपल्या तपश्चर्येनें असें अमर वाङ्मय निर्मूं शकते.

**तपस्येची महती**

तुमच्यांतील नवोदित साहित्यिकांनीं ही गोष्ट लक्षांत घ्यायला पाहिजे तितकी घेतलेली दिसत नाहीं. भाषाप्रेम, उत्साह, संघटनाचातुर्य इ. गोष्टींत तुम्ही कुणास हार जाणार नाहींत हें मी पूर्णपणें जाणतों.

वाङ्मयनिर्मितीला लागणारी स्फूर्तीहि तुमच्यापैकीं कित्येकांत चांगल्या पैकीं आहे हें मला माहीत आहे. पण उत्कृष्ट वाङ्मयकृति विरचिण्यासाठीं जी तपश्चर्या किंवा माझ्या आवडत्या शब्दांत म्हणजे जी 'साधना' करावी लागते तिची महती व स्वरूप तुम्हीं अजून समजून घेतलेलें नाहीं. या माझ्या आक्षेपानें अस्वस्थ होऊन कांहीं बंधु-भगिनी मला विचारतील कीं, " ही वैय्यक्तिक साधना करायची तरी कशी ? " तेंच मी तुम्हांला सांगणार आहें.

या साधनेचीं सूत्रें कांहीं नवीं नाहींत. श्रद्धा, तत्परता आणि निग्रह याच तीन सनातन तत्त्वांचें आचरण म्हणजे ही साधना होय. यांपैकीं पहिलें तत्त्व या साधनेचा मूलाधार आहे. साहित्यसेवेचें कंकण तुम्हीं बांधलें म्हणजे आपण साहित्यानेंच जगाचा उद्धार करूं शकूं आणि स्वतःहि महत्पदाला पोहोचूं अशी गाढ श्रद्धा तुमच्या अंगीं बाणली पाहिजे.

" पद्यपंक्तिची तरफ आमुच्या
करीं विधीनें' दिली असे
टेकुनि ती जनताशीर्षांवरि
जग उलथुनिया देऊं कसे ॥ "

हा प्रत्यय तुम्हांस आला पाहिजे. वीरांच्या प्रचंड मिरवणुका निघोत, शास्त्रज्ञांना जगविख्यात पारितोषिकें मिळोत, साधूंच्या पायीं सर्व जग लोटांगण घेवो यांपैकीं कुठल्याहि दृश्यानें विचकून न जातां आपल्या लेखणीचें सामर्थ्य अपरंपार कसें वाढेल याकडे लक्ष द्या. कारण लेखनांत शौर्य आहे, शास्त्र आहे, आणि साधुत्वहि आहे. व्यास, वाल्मीकि, ज्ञानेश्वर, रवींद्र या प्रतापी सूर्यांच्या कक्षेंत आपण फिरणार आहोंत या अभिमानानें तुम्हीं धुंद होऊन गेलें पाहिजे. या श्रद्धेच्या धुंदीची आज आपणांला फार गरज आहे. आणि तत्परता हें तर साधनेचें मुख्य स्वरूपच

होय. वाङ्मय व जीवन हीं एकरूप आहेत, असे उद्गार सध्यां चहूंकडे ऐकूं येतात. आणि तुमच्यापैकीं कित्येकजण कळत न कळत त्याच आशयाचा शब्दघोष करतात! वाङ्मय आणि जीवन हीं जर एकरूप असतील तर हें ओघानेंच येतें कीं, जीवन जसें प्रत्येक क्षणीं जगावयाचें तशीच वाङ्मयाची साधना प्रतिक्षणीं करावयाची असते.

**साधनेचीं सूत्रें**

या साधनेंत काय येतें यापेक्षां या साधनेंत काय येत नाहीं हेंच सांगणें मुष्कील आहे! नव्या जुन्या श्रेष्ठ ग्रंथांचें वाचन व मनन हा तर या साधनेचा मुख्य भाग आहे. आपणांला उत्कटपणें सुचतील ते विचार व कल्पना अधिकाधिक सुंदर व निर्दोष शब्दांत कशा मांडता येतील याचा अभ्यास हें या साधनेंतलें आन्हिकच होय. या कामीं कठोर आत्मपरीक्षण आणि गुरूचें मार्गदर्शन या दोन्ही मार्गांचा तुम्हांला अवलंब करावा लागेल.

आपलें अंतःकरण सहृदय व विशाल असेल तरच आपणाला मोठाल्या वाङ्मयाच्या कृति निर्माण करतां येतील. असें विशाल अंतःकरण बनवणारी किमया एकच आहे. ती म्हणजे आपल्या सुखदुःखाच्या बाहेर येऊन इतरांच्या जीवनाशीं समरस होण्यास शिकणें. विहीर, नदी, सरोवर, समुद्र इ. सर्व ठिकाणीं पोहण्याचें तंत्र एकच असतें. पण नेहमीं विहिरींतच पोहण्याची संवय ठेवल्यास नदी किंवा समुद्र यांमध्यें तुम्हाला घाबरल्यासारखें होईल. पोहण्याचें तंत्र बदललें असें नव्हे तर भोंवतालचें क्षितिज विस्तारलें म्हणून ही भीति वाटते. म्हणून पहिल्यापासूनच संकुचित भिंतींच्या आवाराबाहेर येऊन दूर दूर नजर टाकण्यास तुम्ही शिका. म्हणजे निर्भयता येण्यास अडचण पडणार नाहीं.

साहित्यसाधनेचीं अनेक अंगें आहेत. आपल्या लहान भावंडांशीं तन्मय होणें, एखाद्या जनसमुदायांत मिसळून विविध स्वभावांचें परीक्षण

करणें, एकाद्या व्यक्तीवर प्राणापलीकडे प्रेम करणें किंवा एकाद्या ध्येयांत रंगून जाणें, उजाड माळावर रात्रीं एकटें पडून आकाशाच्या विशाल तारकांकित घुमटाचें मनसोक्त दर्शन घेणें अशा अनंत गोष्टींत साहित्य-साधना करतां येते. या अनंतरूपी साधनेंत शक्य तेवढें प्रावीण्य मिळविणें हा आपल्या जीवनाचा मुख्य व्यवसाय करा.

**निग्रहाची जरूरी**

मला तुम्ही विचाराल कीं, "श्रद्धा आणि तत्परता या विषयींचें तुमचें म्हणणें कळलें पण या साधनेंत निग्रह कुठें येतो?" याला माझें स्पष्ट उत्तर आहे कीं, प्रत्येक कलेप्रमाणें याहि कलेला निग्रहाची जरूरी आहे. गवयाला गळा साफ ठेवण्याकरितां खाण्यापिण्यावर नियंत्रण घालावें लागतें. खेळाडूला शरीर चपल राखण्याकरितां युक्ताहार–विहाराची गरज आहे. असा स्थूल निग्रह प्रत्येक कलेच्या व विद्येच्या साधनेंत करावाच लागतो. पण यापेक्षांहि फारच सूक्ष्म पण अत्यंत व्यापक निग्रह आपल्या उपासनेंत येतो. सुखाला तुच्छ लेखून अध्ययन करणें, इतर क्षेत्रांत कीर्ति–संपत्ति सहज मिळेल असें दिसत असतां तेथून नजर मागें घेऊन आपल्या वाङ्मयोपासनेंत मग्न राहणें याला केवढा निग्रह लागतो! हें सतीचें वाण आहे! हें पत्करण्यापूर्वीं विचार करा. पण एकदां पत्करलें कीं निग्रहपूर्वक त्याची सांगता करा.

बंधुभगिनींनो! एवढी सर्व सांगता करतांना आणखी एका गोष्टीकडे मी तुमचें लक्ष वेधणार आहें. साहित्याच्या अनेक शाखा आहेत. काव्य, कथा, नाटयछटा, नाटक, चरित्र, शब्दचित्र, निबंध इ. त्या शाखा होत. यांपैकीं आपलें बळ व आपला प्रकृतिधर्म कोणत्या शाखेंत आपणांला भरपूर यश मिळवून देईल हें तुमच्यापैकीं पुष्कळांना कळत नाहीं. आणि मग उत्तम कथाकार होऊं शकेल असा कुमार नाटकाच्या रचनेंत शिरून निकृष्ट नाटककार होतो, चांगल्या कथालेखिकेचे गुण

जिच्या लेखणींत आहेत अशी कुमारी काव्याचा छंद घेऊन टाकाऊ कवयित्री होते ! असें न व्हावें यासाठीं साहित्य–साधनेच्या प्रारंभ-काळीं आपणाला कोणता वाङ्मयप्रकार जमेल याचा नीट अंदाज घ्या. आणि त्यावर आपलें सर्व लक्ष केंद्रित करा. असें केलेंत म्हणजे तुमचीं प्रतिभासामर्थ्यें वायां जाणार नाहींत. साहित्याची उग्र साधना तुम्हीं केली आणि आपल्या नियोजित कार्याचा पूर्ण अंदाज तुम्हाला आला तर तुमच्या अंगीं असलेली ज्वलंत प्रतिभा अजंठा–वेरूळ–ताजमहाल-सारख्या परमसुंदर कलाकृति कां निर्माण करूं शकणार नाहीं ? जरूर करील. हो ! ताजमहालचें नांव निघालें म्हणून कलेच्या जन्माविषयीं एक उपपत्ति सहज आठवली. तुमच्या साहित्यसाधनेशीं तिचा फार जिव्हाळ्याचा संबंध आहे. म्हणून ती येथें सांगावीशी वाटते. जग-विख्यात ताजमहालाची जन्मकथा तुम्हांला माहीत आहे. मोगल बादशहा शहाजहान यानें आपली प्रियतम सम्राज्ञी मुमताजमहाल हिच्या स्मरणार्थ ही जगन्मोहक समाधि बांधली. हिचें सौंदर्य इतकें अलौकिक आहे, कीं जगांतील अनेक कलावंतांना हिनें आजवर स्फूर्ति दिली आहे.

बंगालचे अद्वितीय चित्रकार अवनींद्रनाथ ठाकूर यांनीं ' शहाजहानचें स्वप्न ' ( Vision of Shahajahan ) या नांवाचें एकरमणीय चित्र काढलें आहे. शोकविव्हल झालेला शहाजहान मृत पत्नीच्या स्मारकासाठीं जागा शोधीत फिरत असतां यमुनातीरावर एके जागीं एक स्थळ त्याच्या मनांत भरलें ! आणि त्या स्थलावर एक गूढ शुभ्र मेघांचा तेजःपुंज प्रकट होऊन ताजमहालची आकृति त्यांत शहाजहानाला दिसली. हाच आपल्या पत्नीसाठीं बांधावयाच्या स्मृति-मंदिराचा शहाजहानाला झालेला साक्षात्कार होय. या चित्रांतल्या सूक्ष्म रम्य रंगरेषांचें सौंदर्य केवळ अवर्णनीय आहे !

**रम्य स्वप्नें कशीं दिसतील ?**

या चित्रांतल्या शहाजहानप्रमाणेंच कलावंताला आपली कलाकृति एकदम दिसते अशी माझी ठाम श्रद्धा आहे. तुम्हांलाहि अशीं रम्य स्वप्नें दिसतील आणि संगमरवरी शब्दांत तीं तुम्ही साकार करूं शकाल. पण ताजमहालचा साक्षात्कार होण्यापूर्वीं शहाजहाननें केवढें ऐश्वर्य पाहिलें होतें, किती कलाकृति निर्माण केल्या होत्या हें लक्षांत घ्या. त्याचप्रमाणें आपल्या स्वर्गस्थ पत्नीविषयीं त्याला वाटणारें प्रेम किती उत्कट होतें हेंहि ध्यानीं आणा. आपल्या प्रेमाला साजेशीच अपूर्व समाधि बांधण्याची प्रचंड महत्त्वाकांक्षा त्यानें बाळगली होती. शहाजहानप्रमाणें सत्ता-संपत्तीचें ऐश्वर्य तुम्ही मिळवा असें मला सांगावयाचें नाहीं. पण तुमची अनुभवाची तिजोरी जेवढी संपन्न असेल आणि तुमची वेदना जितकी तीव्र असेल आणि तुमचें कलाकृति निर्मिण्याचें ध्येय जितकें उच्च असेल तितकें ताजमहालासारखे साक्षात्कार होणें तुम्हांला फार सोपें जाईल. अनुभूतीचे बादशहा व्हा म्हणजे वाङ्मयाचे ताज बांधणें तुम्हांला शक्य होईल.

प्रिय बंधुभगिनींनो ! यापेक्षां मला अधिक कांहींच सांगावयाचें नाहीं. तुम्ही कुमार आहां, आणि भाषेचें भवितव्य तुमच्या हातीं आहे. तुम्हांला ठाऊक आहे कीं, आपल्या महाराष्ट्र भाषेचा पाया एका "कुमारा" नेंच घातला. तुम्हीं आपल्या संघटनेची जी कमाल वयोमर्यादा ठरविली आहे ती संपण्यापूर्वींच तो कुमार हिमालयासारखें उंच साहित्य निर्माण करून समाधिस्थ झाला. आज सहाशें वर्षें लक्षावधि महाराष्ट्रीय स्त्रीपुरुष त्याच्या वाङ्मयांत पोहून ब्रह्मानंद लुटीत आहेत. त्या साहित्यसहस्रकर कुमारचें नांव ज्ञानेश्वरमहाराज. अठराव्या वर्षीं ज्ञानेश्वरांनीं निर्माण केलेल्या साहित्याची उंची अजून अद्वितीय आहे. तुम्ही कुमारसाहित्यसेवकांनीं आपल्या आद्य स्फूर्तिदात्याचा हा प्रताप-

६५६२

शाली आदर्श डोळ्यांपुढें ठेविला पाहिजे. मूठभर लोकांनीं कृपणपणानें आपल्यासाठीं जपून ठेविलेलें ज्ञान बाहेर काढून ज्ञानेशांनीं तें बहुजन-समाजासाठीं मराठींत आणलें आणि मराठीच्या नगरींत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोडला. तुम्हां आजच्या कुमारांना हेंच महत्कार्य साधलें पाहिजे.

**देवांच्या मदतीस चला तर--**

देवाच्या सेनापतीचें नांव 'कुमार' होतें. मग तुम्हां कुमारांकडे देवांच्या सेनेचें सेनापतित्व सहजच येत नाहीं काय? तुम्ही म्हणाल, आज देव कुठें आहेत आणि दानव कुठें आहेत? बंधुभगिनींनो, आजहि देव-दानव आहेत. गाढवाच्या आकाराचे, विक्राळ दांताचे, दहा तोंडांचे असे राक्षस नसतील किंवा किरीटकुंडलधारी देव नसतील. पण साध्या माणसाच्या रूपानें देव-दानव आजहि आहेत. आजहि ते लढत आहेत! हे देवदानव कोणते? हिंसा, हुकुमशाही यांचा धुडगूस घालणारे आक्रमक लोक ते दानव; आणि अहिंसा, सत्य, समता यांचा प्रचार करणारे महात्मे ते देव. आपलें 'कुमार' हें नांव सार्थ करण्यासाठीं या महात्म्यांच्या–या देवांच्या–मदतीला चला आणि आपलें अमोघ लेखनास्त्र सोडून जगावर सत्य, अहिंसेचें देवराज्य स्थापा. शेवटीं कविवर्य केशवसुतांच्या उज्ज्वल शब्दांत सांगतों—

" पूर्वीपासुन अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती
संप्रति दानव फार माजती
देवावर झेंडा मिरविती
देवांच्या मदतीस चला तर "

——जयहिंद——

* * *

## प्रश्न

१. कुमार-साहित्य संघटनेनें कोणते फायदे झाले ?

२. वाङ्मयसेवेंत कोणता मोह टाळला पाहिजे ?

३. ताजमहाल कसा जन्मास आला ?

## अधिक वाचन

‘ साहित्य आणि संसार ’ ( ना. सी. फडके )

‘ लेखनकला आणि लेखनव्यवसाय ’ ( वा. गो. आपटे )

‘ लघुकथा कशी लिहावी ?’ ( बा. कृ. गलगली )

* * *

# उद्यांचे पत्रकार ६

सन्मान्य पत्रपंडित, सज्जनवृंद आणि चिमुकल्या भावी पत्रकारांनो, आज मोठा अपूर्व योग आहे नाहीं? ज्यांनीं आजपर्यंत आपलें सर्व जीवनस्वातंत्र्य लोकशाही, लोकशिक्षण या ध्येयासाठीं खर्च केलें असे पत्रकार येथें एकत्र झाले आहेत. त्यांत वृद्ध आले आहेत, मध्यमवयीन आहेत, आणि युवकहि आहेत, आतां त्यांत चिमुकले 'उद्यांचे पत्रकार' सामील झाले आहेत! जीवनाच्या अवस्थांचा हा मनोहर संगम आहे! येथें प्रौढ लोक मुलांचें कौतुक करायला जमले आहेत. मुलें प्रौढांचा आशीर्वाद व मार्गदर्शन इच्छीत आहेत. या सोहळ्याचें अध्यक्षपद मला मिळालें याचा मला सदैव अभिमान वाटत राहील. ही स्मृति कधींहि फिकी होणारी नाहीं. हा मान मला दिल्याबद्दल प्रौढ चालकांचा व कुमार कार्यकर्त्यांचा मी ऋणी आहें.

हस्तलिखित मासिकांचीं प्रदर्शनें भरविण्याची प्रथा आज पुष्कळ दिवस चालू आहे. आमच्या कुमार-साहित्य चळवळीचें तर तें एक प्रमुख अंग आहे. हस्तलिखित मासिकांच्या लेखकवर्गांतूनच कुमार-साहित्यांतलें

---

ता. ३१।१ व १।२ रोजीं (१९४८) मराठी पत्रकार संमेलन सातारा येथें भरणार होतें. याच अधिवेशनांत 'उद्यांचे पत्रकार' संमेलन भरणार होतें. त्या संमेलनाचें हें अध्यक्षीय भाषण आहे. दुर्दैवानें गांधी-वध झाल्यामुळें हें अधिवेशन झालेंच नाहीं!

नेतृत्व उदयाला येतें. कुमार-साहित्य-संमेलनाला जोडून हस्तलिखित मासिकांचीं सुंदर सुंदर प्रदर्शनें भरतात. याखेरीज शिक्षणसंस्थांनीं व विविध शैक्षणिक व सांस्कृतिक परिषदांनीं हस्तलिखित मासिकांचीं व नियतकालिकांचीं प्रदर्शनें व संमेलनें भरविलीं आहेत. पण मोठ्या संपादकांच्या परिषदेबरोबर 'उद्यांचे संपादक' एकत्र येण्याचा मात्र हा पहिलाच सुप्रसंग होय. विशेषतः स्वतंत्र हिंदुस्थानांत भरणाऱ्या या पहिल्या मराठी-पत्रकार-संमेलनाच्या समारंभांतच हें पहिलें 'उद्यांचे पत्रकार' संमेलनहि भरत आहे. ही विशेष संस्मरणीय व स्फूर्तिदायक गोष्ट म्हटली पाहिजे.

### वेगळी जबाबदारी

स्वातंत्र्याचा उल्लेख केवळ उपचार म्हणून मीं केलेला नाहीं. या मुद्याकडे मला प्रथम लोकांचें–विशेषतः चिमुकल्या संपादकांचें–लक्ष वेधायचें आहे. स्वातंत्र्य मिळालें. आतां फार मोठी जबाबदारी आहे. लोकांना आपणांला साक्षर करायचें आहे, त्यांचे भ्रम व अज्ञान नाहींसें करायचें आहे, आपला देश जगांत अग्रभागीं झळकला पाहिजे ही ईर्षा प्रत्येक नागरिकांत आपणांला निर्माण करायची आहे. हें सर्व कार्य पत्रकारच करूं शकतील. म्हणूनच पत्रकारांची परंपरा अखंड राहिली पाहिजे. दिव्यांतून दिवे उजळले पाहिजेत. मोठ्यांचे अनुभव व तपश्चर्या लहानांना मार्गदर्शक झाली पाहिजे. अर्थात् हें सर्व होण्यास मोठ्यांचा व लहानांचा प्रत्यक्ष संबंध आला पाहिजे. या संमेलनांत ती गोड योजना करण्यांत आली आहे. यांत मुलांनीं आपलें प्रावीण्य उत्साहानें दाखवावें आणि मोठ्यांचें कार्य अभ्यासूपणें पाहावें असा चालकांचा उद्देश आहे. यायोगें आजच्या पत्रकारांच्या मागोमाग 'उद्यांचे पत्रकार' येऊं शकतील. आजच्या पत्रकारांच्या मार्गानें ते जाऊं शकतील आणि पुनः नवे उन्नतिमार्ग शोधून काढण्याचें ज्ञानहि

त्यांना मिळेल. हें सर्व हिंदी स्वातंत्र्याला पोषकच होणार आहे. आणि म्हणूनच प्रथम स्वातंत्र्याचा उल्लेख मीं आवर्जून केला.

**लहान पत्रकार**

उद्यांचे पत्रकारहो ! आज तुम्हीं फार लहान वयांत एका मोठ्या व्यवसायाची साधना आरंभिली असें कुणी म्हणेल ! मला मात्र तसें वाटत नाहीं. शाळेंतल्या क्रीडांगणावर सतत खेळांची तालीम घ्यावी तेव्हांच ना आंतर्राष्ट्रीय कसोटीच्या सामन्यांत चमकणारे खेळाडू तयार होतात ? कविसम्राट रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या वैभवसंपन्न कुटुंबाचें कौटुंबिक क्षेत्रापुरतेंच एक मासिक होतें. लहानथोर ठाकुर मंडळी या मासिकांत लिहीत. बाल रवीद्रनाथांच्या विराट प्रतिभेचें अस्फुट रूप प्रथम यांतच प्रकट झालें. जगविख्यात संशोधक थॉमस एडिसन् याची गोष्ट तुम्हांला माहीत आहे का ? छोटा एडिसन् एक वृत्तपत्र चालवी. त्याची जुळणी–छपाई सारें कांहीं आगगाडींत चाले. या वर्तमानपत्राचा बातमीदार एडिसन, संपादक एडिसन्, इतकेंच काय पण जुळारी, विक्रेता सर्व कांहीं एडिसन्च ! मोठमोठ्या वृत्तपत्रांच्या अगोदर या पोरानें चालविलेलें हें छोटें व ताजें वर्तमानपत्र गांवोगांव पोंचे. त्यावर उड्या पडत. या वृत्तपत्रानें करून दिलेल्या कमाईवर एडिसनचा चरितार्थ चाले. इतकेंच काय, पण त्याच्या संशोधनकार्यालाहि या कमाईचा आधार मिळत असे. मिकी रूनी या प्रख्यात् बालनटानें या चिमुकल्या संपादकाची भूमिका यंग टॉम एडिसन् या बोलपटांत फार उत्कृष्ट वठविली आहे. तुम्ही तो बोलपट जरूर पहा. पूर्व व पश्चिम गोलार्धांतलीं हीं दोनच प्रख्यात उदाहरणें मीं घेतलीं. माझ्या म्हणण्याला पुरावा म्हणून पुरेशीं आहेत तीं. अभ्यास आणि शारीरिक व मानसिक प्रगति यांना बाध न आणतां एकाद्या व्यवसायाची साधना कौमार्यकालांत करायला कांहींच हरकत नाहीं असें माझें ठाम मत आहे.

**बहुश्रुतता मुख्य गुण**

आतां या साधनेचें स्वरूप काय असावें याचें मला सूत्ररूपानें दिग्दर्शन करावयाचें आहे. बहुश्रुतता ही या साधनेंतली प्रवेशपरीक्षा आहे. संपादक बहुश्रुत पाहिजे. कुठलाहि महत्त्वाचा विषय निघाला तर त्या विषयाच्या सर्व बाजू संपादकाला स्थूलमानानें माहिती असल्या पाहिजेत. या विषयाचे प्रवर्तक कोण, विरोधक कोण, यापासून देशाला फायदे-तोटे कोणते आहेत, हें सारें सारें त्याच्या ध्यानांत असलें पाहिजे. डाल्डा वनस्पती असो किंवा इराकमधील तेलाच्या खाणी असोत, क्रिकेटमधील 'बॉडी लाइन बोलिंग' असो कीं अमेरिकेचें 'मनरो' तत्त्व असो, संपादकाला या विषयांचें महत्त्व, कुळकथा, विकास सर्व कांहीं माहीत पाहिजे. तरच तो यशस्वी संपादक होईल. म्हणून तुम्हांला जर या व्यवसायांत यश मिळवायचें असेल तर आधीं बहुश्रुतता मिळवा. पहिल्यापासूनच अनेक विषयांत मन घालायला शिका. बुद्धीला एकांगी होऊं देऊं नका. मनुष्याच्या जीवनांत हजारों गोष्टी येतात. जीवनाबद्दल आस्था व उत्सुकता बाळगून त्याकडे पाहायला तुम्ही शिकलांत म्हणजे तुम्हांला अनेक विषयांत रमतां येईल. कुठलाहि प्रश्न देशांत उद्‌भवला तरी त्यांत सहज समरस होतां येईल.

शुद्ध व सुंदर भाषा हें संपादकाचें सर्वांत मोठें भांडवल आहे. वाचकांच्या अंतःकरणांत जाऊन पोचतील असे शब्द तुमच्या लेखणींतून उतरले पाहिजेत. उत्कृष्ट संपादक लेखावरील नुसत्या मथळ्यानें वाचकांना मुग्ध करून टाकतात. लोकमान्य टिळकांचें उदाहरण पाहा. "हे आमचे गुरुच नव्हत!", "पुण्यांतील पहिली चिमणी", "उजाडलें, पण सूर्य कोठें आहे?" हे व असे मथळे "केसरीं"त झळकले कीं लोकांचीं मनें खडबडून जागीं होत. चिपळूणकर-टिळकांपासून ते केळकर-खाडिलकरांपर्यंत मोठाले महाराष्ट्रीय संपादक हे महान्

भाषाप्रभु होऊन गेले आहेत. अशा तेजस्वी साहित्यिकांचे तुम्ही वारस होणार आहांत. आपल्या या थोर पूर्वजांना शोभेल असें प्रखर व अमर लेखन करा. जुन्या व नव्या उत्कृष्ट वाङ्मयाचा खोल अभ्यास, मनन, चिंतन हीं सर्व वाङ्मयोपासनेचीं व्रतें आहेत. कळकळ पाहिजे. ईर्षा पाहिजे.

"एक शब्द बोलेन जरी, सकला कुण्ठित करिन तरी"

या आत्मविश्वासानें लेखणी चालवा. मग पाहा तिचें सामर्थ्य ! "शाईचा एक थेंब हुतात्म्याच्या रक्तापेक्षां अधिक सामर्थ्यवान् आहे" असें महंमद पैगंबर म्हणे, तें उगाच नाहीं. "बुर्बोन राजांनीं कागद व शाई यांवर नियंत्रण घातलें असतें तर त्यांचा नाश टळला असता." असे उद्‌गार नेपोलियननें काढले आहेत. जुलमी बुर्बोन राजांची सत्ता प्रतिभाशाली लेखकांनीं धुळीला मिळविली. हें तेज तुमच्या लेखणींत येऊं द्या.

## इतिहासाचें ज्ञान हवें

उत्कृष्ट भाषा हें संपादकाचें मुख्य भांडवल. त्याच प्रमाणें इतिहासाचें खोल ज्ञान त्याला असलें पाहिजे. जगांत कारणावांचून कार्य घडत नाहीं. एका परंपरेंतून दुसरी परंपरा जन्म घेते. आपल्या राष्ट्राच्या उज्ज्वल परंपरा कोणत्या, जुनें कुठें बरोबर होतें, कुठें चुकलें, कोणत्या गुणांनीं आपला इतिहास उज्ज्वल झाला आणि कोणत्या दोषांनीं आपणाला अवकळा आली ह्याचा सूक्ष्म अभ्यास पाहिजे. 'रियासत' वाचा. 'ज्ञानकोशा'चे पहिले अमोल खंड अभ्यासपूर्वक पाहा. भारत-रामायणांवर हवीं तेवढीं लहान मोठीं पुस्तकें आहेत आणि मग या अभ्यासाचा उपयोग जगाच्या तुलनेनें देशहितासाठीं आपणांस करून घेतां आला पाहिजे. आपला देश म्हणजे मानवतेचाच एक भाग आहे.

नाहीं का ? नुसत्या हाताचा, नुसत्या हृदयाचा अभ्यास करून का सर्व शरीरशास्त्र अवगत होईल ? सर्व देहाची माहिती पाहिजे. म्हणून जगाच्या इतिहासाची तोंडओळख तरी असणें अवश्य आहे. सुदैवानें आपल्या देशाचे कंठमणि पं. जवाहरलाल नेहरू यांनीं जगाचा इतिहास अत्यंत सुबोध व सुंदर भाषेंत तुमच्यासाठीं लिहून ठेविला आहे. केवढें तुमच्या पिढीचें भाग्य ! तो वाचा. अभ्यासा. इतिहास या विषयांत राजकारणाचा अभ्यास आलाच. कारण आजचा 'इतिहास' म्हणजे कालचें राजकारण आणि आजचें 'राजकारण' म्हणजे उद्यांचा इतिहास.

ज्ञानाचा असा अक्षय्य भाता तुम्ही संपादन करून ठेवा. इतर बाजूहि पाहिल्या पाहिजेत. त्यांपैकीं सजावट ही पहिली गोष्ट. खरोखर कित्येक हस्तलिखित मासिकांतली चित्रकला पाहून मी आश्चर्यचकित होऊन गेलों आहें. विषयाचें यथार्थ ज्ञान करून देणारे सुंदर मथळे, रंगीत देखावे, पानांच्या महिरपी, समाप्तीची नक्षी इ. इ. कलाविलास पाहून हें मुलांचेंच काम का अशी शंका क्षणभर आल्यावांचून राहिली नाहीं. पण लगेच तिचें निरसन होऊन मन प्रफुल्लित झालें. पण हस्तलिखित मासिकांत चमकणारे कलावंत पुढें कुठें जातात ? कळत नाहीं. कारण छापून प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयांत पाहावें तो तींच दोनचार कलावंतांचीं नांवें दिसतात ! असें होतां कामां नये.

**व्यंगचित्रांचें सामर्थ्य**

हो ! – चित्रकलेवरून आठवलें ! व्यंगचित्रें हें संपादकाच्या हातांतलें अमोघ शस्त्र आहे. आपल्या वृत्तपत्रांत अजून याला जितकें महत्त्व द्यायला पाहिजे तितकें दिलें जात नाहीं. पण तुम्ही ही बाजू बळकट करा. एकादा अहंमन्य पुढारी उगीच चांगल्या लोकांना उपदेश करूं लागला तर कडक शब्दांत त्याचा निषेध करण्यापेक्षां तुम्ही 'उंटावरचा

अनुक्रम....३५८१५
क्रमांक....२५५५

शहाणा ' असें त्याचें चित्र काढलें तर तें अधिक परिणामकारक ठरेल.

जगाबरोबर, नव्हे जगाच्या थोडें पुढें राहणें हें संपादकाच्या यशस्वितेचें एक महत्त्वाचें सूत्र आहे. वाचकांना काय आवडेल तें पुरवायचें, पण त्यांना चांगलेंच आवडावें असा सतत प्रयत्न करावयाचा, हें मी उत्तम संपादकाचें ध्येय समजतों. अमुक एक घटना कानीं आली कीं, तुमच्या पत्रांत तिची सांगोपांग माहिती मिळेल असा विश्वास वाचकांना वाटला पाहिजे. संपादकाचा बलसंपन्न पण अदृश्य हात खूप दूरवर पोचला पाहिजे, यासाठीं संपादक जागरूक व कल्पक असला पाहिजे. त्याप्रमाणें त्याचे अंगीं संघटनाचातुर्यहि असलें पाहिजे. आणि मानसशास्त्र तर सर्व तयारीचा पायाच म्हणावा लागेल. उद्यांचे पत्रकारहो! संपादकीय योगमार्गांतले हे मुख्य मुख्य यमनियम तुम्हांला मीं सांगितले. आतां एक दोनच गोष्टी मी तुम्हांला सांगणार आहें. संपादक बहुश्रुत पाहिजे हें मीं प्रथम तुम्हांला सांगितलें. प्रत्येक विषयांतलें थोडें फार ज्ञान त्यानें मिळविलें पाहिजे. असें करतांना ज्ञानाच्या खोलीकडे बहुधा दुर्लक्ष होतें. दररोज निर्माण होणाऱ्या नव्या नव्या प्रश्नांचा विचार करतां करतां संपादक एकाद्या विषयाचा खोल व्यासंगी होत नाहीं. असें होऊं देऊं नका. दररोजच्या झगड्यांत व धकाधकींत कुठला तरी एक विषय गाढ अभ्यासाचा म्हणून असूं द्या. म्हणजे तुमच्या म्हणण्याला वजन येईल, तुमचा शब्द आदरला जाईल. तुमचें वृत्तपत्र ही एक शक्ति बनेल.

**रचनात्मक कार्याला शक्ति लावा**

ही शक्ति बहुत संपादन करा आणि ही विधायक कार्याला लावा हेंच शेवटचें माझें तुम्हांला सांगणें आहे. परकी सत्ता येथें होती त्यावेळीं विध्वंसक वृत्तींचा खूप भडका झाला. आतां आपण स्वतंत्र झालों आहों. आतां आपल्या सर्व शक्ति रचनात्मक कार्याला जुंपल्या पाहिजेत.

आजच्या कांहीं भयंकर घटनांनीं मनें हादरून जातात. अंतःकरणांतल्या रागद्वेषादि भावना पेट घेतात. पण आपल्या प्राचीन परंपरेनें व आधुनिक लोकनेत्यांनीं आपणाला शिकविलेलीं ध्येयें त्यांत भस्म होऊं देऊं नका. शूर व्हा, क्रूर होऊं नका. सत्यभाषी व्हा, कटुभाषी होऊं नका; बुद्धि वापरा, पण अश्रद्ध होऊं नका; सत्य, अहिंसा व समता हीं मूल्यें चिरंतनचीं आहेत. उद्यांचे पत्रकारहो! हीं मूल्यें नीट जतन करणें याहून संपादकाचें परममंगल ध्येय दुसरें कोणतें असूं शकेल बरें? फेरोजशहा, लालाजी, बेझंट, टिळक, आगरकर, रामानंद, रॉय, मोतीलाल घोष, गांधीजी इ. महान् संपादक देशभक्त व देशभक्त संपादक या भरतभूमींत झाले. या दिव्य मालिकेंत तुम्हांस स्थान मिळवावयाचें आहे एवढें सदैव ध्यानांत ठेवलेंत तरी तुमचा ध्येयमार्ग तुम्हांला नेहमीं स्वच्छ दिसत राहील. जय हिंद!

* * *

**प्रश्न**

१ संपादकीय ज्ञानांत मुख्यतः कोणती गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे?

२. वृत्तपत्रांत चित्राचें महत्त्व कोणतें?

३. स्वातंत्र्याच्या काळांत पत्रकारांचें ध्येय कोणतें?

**अभ्यास**

'केसरी–प्रबोध' (सं. भोपटकर–माटे)

'विलायतचीं बातमी–पत्रें' (न. चिं. केळकर)

टिकेकर, सहस्रबुद्धे, देशमुख, कानडे यांचीं पत्रपांडित्यावरील पुस्तकें.

* * *

# कुमार मित्रांनो

विभाग दुसरा

अनुक्रम

स्वयंसेवक संघटना
बालवीर सूत्रे
तीन मानसिक शक्ति
उद्यांचे नागरिक
जीवनांतील आनंद
जीवनांतील तयारी

★

# स्व यं से व क सं घ ट ना 

स्वयंसेवक संघटना या शब्दांत स्वयंसेवक हा शब्द महत्त्वाचा आहे. ‘स्वयंसेवक’ हा शब्द उच्चारतांच हा ना तो गणवेष आपल्या डोळ्यांपुढें उभा राहतो. परंतु स्वयंसेवक हा गणवेष नसून ती एक सात्त्विक मनोवृत्ति आहे. माणुसकींतून ती जन्माला आलेली आहे. इतिहासाचे आरंभीं ज्या दिवशीं एका माणसाचें ओझें दुसऱ्या माणसानें त्याच्या डोक्यावर दिलें किंवा नदींत गटांगळ्या खाणाऱ्या एका माणसाला दुसऱ्यानें हात दिला त्याच दिवशीं ही मनोवृत्ति जन्माला आली आणि ती अनंत काळपर्यंत अशीच राहील. ती आहे म्हणून मनुष्यजातीला कांहीं आशा आहे. या वृत्तीचा संबंध बुद्धीशीं नसून अंतःकरणाशीं आहे.

परंतु मनुष्यांत केवळ ही वृत्ति आहे एवढ्यानें समाधान मानून भागणार नाहीं; भागतच नाहीं. कारण मनुष्याच्या अंगीं कार्यक्षमता असेल व मनुष्याचे गट संघटित असतील तरच या वृत्तीचा समाजाला उपयोग होतो. पाण्यांत बुडणाऱ्या माणसाला वांचवायचें असेल तर स्वयंसेवकाला पोहतां आलें पाहिजे. तसेंच केवळ जलतरणाची कला येऊन उपयोगी नाहीं. धैर्य, अचूकपणा पाहिजेच पाहिजे. त्यानंतर

---

दि १३।१०।५० रोजीं किर्लोस्करवाडी येथें नवरात्र-व्याख्यान-मालेंत दिलेलें व्याख्यान.

बाहेर काढल्यावर माणसाच्या नाकातोंडांत पाणी गेलें असेल, तो बेशुद्ध पडला असेल तर त्याच्या पोटांतलें पाणी कसें काढायचें, त्याला शुद्धीवर कसें आणायचें याची माहिती स्वयंसेवकाला पाहिजे; म्हणजे त्याला प्रथमोपचार पद्धति ( First Aid ) ठाऊक असणें जरूर आहे. महापूर, भूकंप, अग्निप्रलय इ. आपत्तींत मदत देतांना सामुदायिक शिस्तीची व कार्यक्षमतेची आवश्यकता असते. सर्वांनीं मिळून गोंधळ न करतां, अचूक व तडफेनें काम करावें लागतें. अशा तऱ्हेचीं कामें पार पाडण्याची वैयक्तिक व सामुदायिक शक्ति उत्पन्न करणें हेंच संघटनेचें कार्य होय. पाणी केवळ इतस्ततः वहात असेल त्यावेळीं त्यांतून विद्युच्छक्ति थोडीच उत्पन्न होते ? तें पाणी योजनापूर्वक सांठवून उंच प्रदेशांत न्यावें आणि तेथून खालीं विद्युत्गृहांतील पंख्यावर सोडावें तेव्हां विद्युच्छक्ति तयार होते. समाजांत माणसाचे अंगीं असलेली स्वयंसेवककार्याबद्दलची भावना शक्तिशाली होण्यासाठीं तिची पद्धतशीर मशागत व वाढ करावी लागते.

**बौद्ध संघाची कामगिरी**

आजच्या युगांत ज्या स्वयंसेवक संघटना आपण म्हणतों, त्यांचीं बीजस्वरूपें बौद्धसंघांत आपणांला सांपडतील. बुद्धानें मोठाले संघ निर्माण केले. लोकहिताचीं कामें करीत हे संघ हिंडत. “ भिक्षूंनो, बहुजनहितासाठीं व बहुजनसुखासाठीं संचार करा. ” हें बुद्धवचन प्रसिद्ध आहे. ती प्रथा आपणांला अगदीं श्रीसमर्थ रामदासांच्या काळापर्यंत दिसते. समर्थांनीं जे रामदासी महंत निर्माण केले ते आधुनिक स्वयंसेवकांचे प्राचीन अवतारच नव्हते का ? आधुनिक भारतांतहि हिंदुस्थानी सेवादल, राष्ट्रसेवादल, कॉंग्रेसदल, हिंदुराष्ट्रदल, लोकसेना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इ. स्वयंसेवक संघटना आहेत. पण त्यांविषयीं सांगण्यापूर्वीं थोडी पाश्चात्य स्वयंसेवक संघटनांची माहिती

सांगितली पाहिजे. कारण गणवेष काय, कवाईत काय, सर्वच आधुनिक संघटनेचीं तंत्रें आपण पाश्चात्य संघटनेवरून घेतलीं आहेत.

यांपैकीं बालवीर चळवळ लौकर डोळ्यांत भरते. इंग्रज लोक कोणाकडूनहि गुण घेण्यास तयार असतात. बालवीर चळवळ हें त्याचें उत्कृष्ट प्रत्यंतर होय. बोअर युद्धामध्यें संदेशवाहन, शुश्रूषा इ. कामीं बोअर मुलांचीं पथकें झटतांना बेडन पॉवेल यांनीं पाहिलीं. वास्तविक बोअर लोक हे इंग्रजांच्या मानानें मागासलेले. बेडन पॉवेलनीं या बोअर लोकांना गुरु केलें आणि १९०८ मध्यें बालवीर चळवळीचा पाया घातला. याच्यापूर्वीं अमेरिकेंत 'वनमहोत्सवाचीं दलें' म्हणून असत. पण या दलांत कर्तव्यापेक्षां मनोरंजनावरच भर अधिक दिला जाई. केवळ शुश्रुषेसाठीं जनरल बूथ यांनीं 'रेड क्रॉस' ही स्वयंसेवकांची संस्था काढली. लढाईच्या ऐन धुमाळींतहि ही संस्था उपयुक्त कार्य करते. १८८८ सालीं 'डिटॅचमेंट सर्व्हिस' म्हणून अशी एक संस्था अमेरिकेंत होती. पण 'रेडक्रॉस्' चा व्याप सर्व जगभर वाढला. यानंतर पाश्चात्यांत जे राजकीय मतपंथ निघाले, त्यांनीं आपल्या पक्षाच्या प्रचारासाठीं स्वयंसेवक संघटना काढल्या. पण त्यांचें स्वरूप संकुचितच राहिलें आणि पक्षाभिनिवेशाच्या वालुकामय प्रदेशांत माणुसकीचा झरा आटून गेला!

**हिंदुस्थानी सेवादल**

अगदीं अलीकडील काळांत डॉ. हर्डीकर यांनीं 'हिंदुस्थानी सेवादल' ही संघटना काढली होती. ती जर पुरेशी वाढली असती तर युवक व स्वयंसेवक चळवळीला फार इष्ट व निकोप असें वळण लागलें असतें. हें दल कॉंग्रेसच्या राजकारणाला जवळ असलें तरी त्याचें कार्य फार व्यापक होतें. या दलाची प्रख्याती इतकी वाढली कीं, देशाच्या दूरदूर भागांत कुठें अस्मानी सुलतानीचा तडाखा बसला तर मदतीसाठीं

' हिंदुस्थानी सेवादला ' च्या मुख्य कचेरीकडे विनंति येई. इतकी या संस्थेला उपयुक्तता व मान्यता लाभली होती. पण दुर्दैवानें राष्ट्रनेत्यांनीं पुढें या संस्थेला म्हणावा तसा पाठिंबा दिला नाहीं. असल्या स्वयंसेवक संघटनेनें फॅसिस्ट मनोवृत्ति वाढते असा ग्रह कांहीं प्रमुख नेत्यांनीं करून घेतला ! खरें पाहतां असल्या संस्थेच्या अभावीं मात्र फॅसिस्ट वृत्तींच्या संघटनांना वाव मिळाला ! असो. एक सर्वसमावेशक व उपयुक्त संघटना अस्तंगत झाली !

**राजकीय पक्षाची कुरघोडी नको !**

स्वयंसेवक हा केवळ आडदांड माणूस होऊन उपयोगी नाहीं. त्याचें शरीर कसलेलें पाहिजे. त्याप्रमाणें त्याचें मनहि सुसंस्कृत झालेलें असलें पाहिजे. इतिहास, समाज, राजकारण या विषयांची त्याला तोंडओळख पाहिजे. थोडक्यांत म्हणजे त्याच्या मूळच्या ओबडधोबड श्रद्धेवर संस्कार व्हायला पाहिजेत आणि आज जें वादंग माजलें आहे तें नेमकें त्याच मुद्यांवर. कारण बौद्धिक अभ्यास मुलांकडून घटवून घेऊन निरनिराळे प्रमुख राजकीय पक्ष आपापल्या पक्षाचे अनुयायी तयारी करीत आहेत. इतिहास काय अथवा राजकारण काय, आपल्या दृष्टिकोनांतून आपापल्या स्वयंसेवक संघटनांपुढें सांगायचें असा प्रकार सुरू आहे. यामुळें प्रत्येक स्वयंसेवक संघटनेचा राष्ट्रवाद वेगळा, विभूति वेगळ्या, देशोन्नतीचे मार्ग वेगळे अशी स्थिति झाली आहे. एका स्वयंसेवक संघटनेच्या पूज्य विभूतींवर विरोधी संघटनेनें चिखलफेक करायची हा मुळीं धर्मच होऊन बसला आहे ! सर्वच परस्परविरोधी संघटनांना पूजनीय वाटणारीं माणसें या एकाच मातृभूमीचीं लेकरें आहेत, हा साधा विचारहि या गालिप्रदानांत कुणी मनांत आणीत नाहीं. कोवळीं मनें अकालीं निबर होतात. त्यांच्या सहानुभूतीचें आलवाल मर्यादित होऊन बसतें.

स्वयंसेवक संघटना जोंवर कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाच्या पंखाखालीं आहे आणि या पक्षाचीं पुढारी माणसेंच असल्या संघटनांचीं अभ्यासमंडळें चालवीत आहेत तोंवर असेंच चालणार. यासाठीं शिक्षणसंस्थांनीं उदार बुद्धीच्या आणि व्यापक वृत्तींच्या विद्वानांचीं व्याख्यानें ठेवून मुळांत संकुचितपणा येऊं देतां कामा नये. राजकीय पक्ष हे आपल्या सत्तेच्या राजकारणाकरितां आपापल्या स्वयंसेवकांना पक्षाभिनिवेशाचें विष टोचणारच; ही वस्तुस्थिति धरूनच चाललें पाहिजे. या विषावर उतारा काय देतां येईल याचा स्वतंत्र भारतांतल्या प्रत्येक सुबुद्ध नागरिकानें विचार केला पाहिजे.

## जनतेचें सहकार्य

स्वयंसेवक संघटनांची गरज अमुक काळांत नव्हती किंवा नाहीं असें कधींच म्हणतां येणार नाहीं. मानवजात जोंवर अपूर्ण आहे आणि संकटांचे नियम जोंवर ठरलेले नाहींत तोंवर स्वयंसेवक संघटना पाहिजेतच. सरकार सर्व कांहीं करूं शकत नाहीं. ‘जें सरकार कमींत कमी हुकमत गाजवतें तें उत्तम सरकार होय.’ असें कोणी म्हणतात. पण मला जर्मन महाकवि गटे याचें म्हणणें अधिक पटतें. तो म्हणतो, ‘जें सरकार लोकांना स्वतःचें राज्य चालविण्यास जास्तींत जास्त कार्यक्षम करतें तेंच उत्कृष्ट सरकार होय.’ पण असें होण्यासाठीं सरकारनें आपली पुष्कळशीं कामें स्वयंसेवक संस्थांवर सोपवलीं पाहिजेत. आज आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालें आहे. अशा वेळीं विधायक वृत्ती पूर्णपणें बहरल्या पाहिजेत. अनासक्त राहून लोकहिताचें काम करणारे स्वयंसेवक जितके अधिक तितकी देशांतली विधायक प्रतिभा सफल होईल.

## राजकीय पक्षांच्या स्वयंसेवक संस्था

राजकीय पक्षांनीं स्वयंसेवक संघटना काढल्या त्यांत एकच फायदा

मला दिसतो. तो हा कीं, समाजांतील वेगवेगळे गट संघटित होत आहेत. मात्र या संघटित गटांना जर समान ध्येय मिळालें नाहीं तर आपली शक्ति फुकट जाईल. असें ध्येय सरकारनें पुरवलें पाहिजे. राष्ट्राच्या राज्यघटनेशीं ज्यांचीं तत्त्वें विसंगत असतील अशा संघटना कुठलेंच सरकार चालू देणार नाहीं. तेंव्हां आजच्या भारत सरकारनें जर कांहीं अशा तऱ्हेचे निर्बंध घातले असले तर त्याबद्दल कुरकुर करणें उचित ठरणार नाहीं. मात्र विधायक बुद्धीस आवाहन करणारें काम कुणींहि हातीं घेतलें तरी सरकारनें त्यास साह्य करावें. अमेरिकेसारख्या ऐश्वर्यसंपन्न देशांतहि सर्व कामें सरकार करूं शकत नाहीं. लोकसंस्था व स्वयंसेवक संघटना यांचें साह्य घ्यावेंच लागतें. आमचा देश तर सर्वस्वीं मागासलेला आणि दरिद्री ! साक्षरताप्रसार, सफाई, शुश्रूषा, धान्यवाढ, रस्ते–बांधणी, संरक्षण, संस्कृति–शिक्षण इ. अनेक राष्ट्रीय कार्यांत स्वयंसेवक संघटना साह्यकारक होऊं शकतील. त्यासाठीं द्वेषाची जागा प्रेमभावानें घेतली पाहिजे. विशिष्ट पक्षाचा आग्रह धरणारे मार्गदर्शक असण्यापेक्षां उदारमतवादी लोक जर स्वयंसेवक संघटनांचीं अभ्यासमंडळें चालवितील तर आमची तरुण पिढी उदार व सहृदय होईल.

## बालवीर, होमगार्डस्

प्रतिगामी, जातीय, अथवा संकुचित ध्येयांच्या संघटना फोफावत आहेत असा आक्रोश ऐकूं येतो. या आक्रोशांत मला कांहीं तथ्य दिसत नाहीं. निसर्गाप्रमाणें राजकारणांत किंवा समाजकारणांतहि पोकळी राहूंच शकत नाहीं. व्यापक पायाच्या व विशाल ध्येयाच्या राष्ट्रव्यापी संघटना काढल्याशिवाय केवळ आक्रोशानें काम कसें भागेल ? बालवीर चळवळ या दृष्टीनें मला फार उत्तम वाटते. ती निधर्मी आहे. आधुनिक विचारांची आहे आणि 'अद्ययावत्' कार्यक्षमता आणण्याची

शिक्षणपद्धति तिनें विकसित केली आहे. या चळवळीच्या धुरीणांनीं तिच्यांतील किल्मिषें काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याप्रमाणें ह्या चळवळीभोंवतीं असलेलें परकीय व श्रीमंत वातावरण नाहींसें केलें पाहिजे. अशा वातावरणामुळें समाजाचा मोठा वर्ग या चळवळीकडे तिऱ्हाईताच्या नजरेनें पाहतो. 'बालकन्–जी–बारी' ही एक संघटना या दृष्टीनें मला अप्रतिम वाटते. होमगार्डस् या अत्यंत उपयुक्त संघटनेची कुमारशाखा काढण्याचा संकल्प पुणें जिल्हा होमगार्डस् संस्थेचे कमांडंट प्रो. एस्. के. कुलकर्णी यांनीं केला आहे. हा संकल्प सरकारी सहकार्यानें जर फलद्रूप झाला तर स्वयंसेवक वृत्तीचें पोषण होण्यास फार मोठी मदत होणार आहे.

### "–सुख पराविया सुखें"

स्वातंत्र्य आलें आणि आज अनेक अपूर्व संधि युवकवर्गापुढें येऊन उभ्या आहेत. त्याचप्रमाणें संकटेंहि डोंगराएवढीं येऊन पडलीं आहेत. बाह्य आणि अंतर्गत शत्रूंनीं या देशाला वेढून टाकलें आहे. केव्हां स्फोट होईल याचा नेम उरलेला नाहीं आणि असल्याच परिस्थितींत देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं आम्हांला खटपट करावयाची आहे. अशा वेळीं स्वयंसेवक संघटना फार मोठी कामगिरी करूं शकतील. शिक्षण आणि संस्कृति यांचे कलश झोपडीपर्यंत पोंचले पाहिजेत. हें काम सरकार कुठवर करूं शकणार? स्वयंसेवक संघटनांनींच पुढे आलें पाहिजे. पण मी अगदीं वेगळ्याच दृष्टीनें या स्वयंसेवक संघटनेच्या कार्याकडे पाहतों. या विचित्र जगांत मनुष्य जितका दुसऱ्याकरितां झटूं शकेल तितका त्याला अधिक आनंद असतो. सुखोपभोग स्वतः भोगण्यानें होणारा आनंद हा तामस व अल्पजीवी असतो; पण आपण दुसऱ्याच्या थोडे उपयोगी पडलों, आपद्ग्रस्तांचें दुःख अल्प प्रमाणांत का होईना हलकें केलें, एकाद्याचे अश्रु पुसले

किंवा कुणाची जखम बांधली यामुळें होणारा संतोष जितका सात्त्विक तितकाच शाश्वतजीवी आहे. हा संतोष अधिकाधिक मिळवीत राहणें हेंच जीवनाचें सार्थक. स्वयंसेवक संघटना हें सार्थक मिळविण्याचें उत्तम साधन होय. या दृष्टीनें तिची महती मी सर्वांत जास्त समजतों.

*　*　*

**प्रश्न**

१. स्वयंसेवक संस्थेचें मूळ कशांत आहे ?

२. आपल्या देशांत स्वयंसेवक संघटना कशी प्रभावी होईल ?

३. चांगलें सरकार कोणतें ?

**अधिक वाचन**

'बालवीर' (श्री. ज. बापट)

'एका शिपायाचें आत्मवृत्त' (नानासाहेब शिंदे)

'विद्यार्थ्यांशीं हितगुज' (गांधीजी)

*　*　*

# बालवीर सूत्रें ८

बालवीर संस्थेच्या ध्येयांत शील, शरीर, हस्तव्यवसाय आणि सेवा या चार गोष्टी येतात. यांत पहिल्यानें शीलाला महत्त्व दिलें हें योग्यच झालें. याविषयीं एक प्रसिद्ध गोष्ट मी तुम्हांला सांगतों. प्रल्हाद हा केवढा देशभक्त होता हें तुम्हांला ठाऊक आहेच. शीलाचें महत्त्व जाणून घेण्याची त्याची इच्छा होती. तेव्हां त्यानें गुरूला त्यासंबंधीं विचारलें. गुरूंनीं सांगितलें, "योग्य वेळीं तुला कळेल." आणि नंतर एके दिवशीं प्रल्हादाचे शरीरांतून एक तेजस्वी पुरुष बाहेर पडला. प्रल्हाद चकित होऊन त्याच्याकडे पाहूं लागला. तेव्हां त्या पुरुषानें सांगितलें, "माझें नांव शील." तो पुरुष अंतर्धान पावला, तों कांहीं वेळानें एक सुंदर व झगझगीत स्त्री बाहेर पडली. तिनें प्रल्हादाला सांगितलें, "मी लक्ष्मी. तुझ्यांतून शील गेल्यामुळें आतां मला तुझ्याजवळ राहणें योग्य वाटत नाहीं." नंतर उद्योग, उत्कर्ष इ. सर्व मूल्यवान गोष्टी अशाच तऱ्हेनें एकामागून एक जाऊं लागल्या आणि मग प्रल्हादाला कळून चुकलें कीं, एक शील नष्ट झालें कीं, सर्व गेलें. या कथेपासून फार मोठा बोध घेण्यासारखा आहे. ज्या लोकांनीं लक्षावधि माणसांच्या अंतःकरणावर प्रभुत्व मिळविलें तीं थोर माणसें शीलवान् होतीं. रामकृष्णादि प्राचीन अवतारी पुरुषांपासून आजच्या टिळक,

---

शिवाजीकुल गणेशोत्सव, पुणें. दि. १६-८-४१ रोजीं दिलेलें व्याख्यान.

गांधी इ. नेत्यांपर्यंत शीलवान् पुरुषांची परंपरा आपल्या देशांत अखंड चालत आली आहे.

बालवीरांनो, शरीर हें दुसरें तत्त्व होय. त्याची महती केवढी आहे हें तुम्हांस सांगायला पाहिजे असें नाहीं. जगांत कुठलीहि चांगली गोष्ट करायची असेल तर शरीर उत्तम पाहिजे. शंकरांनीं पार्वतीला सांगितलेलें एक तत्त्व फार लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ‘शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्’ (शरीर हें धर्माचरण करण्याचें मुख्य साधन आहे.) शरीर चांगलें असलें म्हणजे तुम्ही या जीवनांतले उपभोग पूर्णपणें घेऊं शकतां. तुम्हांला पराक्रम गाजवितां येतो. तुम्हाला सत्ता चालवितां येते आणि धर्म साधतां येतो. याच दृष्टीनें धट्टीकट्टी गरिबी बरी पण लुळी पांगळी श्रीमंती नको असें म्हणतात. अलीकडे यंत्रकला वाढल्यापासून असें भासविलें जातें कीं, आतां शरीराचें कांहीं काम नाहीं. यंत्रें सर्व कामें आटपतील; पण हें चूक आहे. यंत्रें वापरण्यासहि शक्ति पाहिजे. एखादी भारी किंमतीची बंदूक अशक्त माणसाच्या ताब्यांत दिली तर त्या बंदुकीच्या भारानेंच तो घामाघूम व्हायचा! मग ती बंदूक पेलून शत्रूवर बरोबर नेम मारणें लांबच राहिलें! विमानासारखें अति आधुनिक व वेगवान् वाहन वापरायचें झाल्यास शरीर किती भक्कम व निकोप पाहिजे याची साक्ष विमानासाठीं जी चांचणी परीक्षा घेतात तीवरून पटण्यासारखी आहे. ‘शरीर नाहीं तर कांहीं नाहीं, शरीर आहे तर सर्व आहे’ हें ध्यानांत ठेवा. चापल्य व सौंदर्य हे शरीरसंपदेचे मुख्य धर्म आहेत, ते अंगीं आणा.

### हस्तव्यवसायाची उपयुक्तता

हस्तव्यवसायांचें महत्त्व निव्वळ आर्थिक दृष्टीनें सुद्धां आहे. पण त्याला मी दुय्यम महत्त्व देतों. हस्तव्यवसायामुळें आपल्या जीवनाला सौंदर्य व व्यापकपणा येतो हें मला विशेष महत्त्वाचें वाटतें. तुम्ही

मंडईंतील भाजी घेऊन येतां, ती कितीहि चांगली व रुचकर झाली तरी तुमच्या वाफ्यांतल्या तुम्हीं लावलेल्या भाजीची सर तिला येईल का? वाफ्यांतली भाजी साधी असेल, पण ती निर्माण करतांना तुम्हीं जे श्रम घेतले त्यामुळें त्या भाजीला एक वेगळीच रुचि निर्माण होईल. बाजारांत जाऊन घेतलेल्या स्वेटरपेक्षां आपल्या प्रेमळ भगिनीनें विणलेला स्वेटर आपणांस अधिक उबदार व सुंदर वाटतो. कारण श्रमाचें व आपुलकीचें सौंदर्य त्यांत असतें. हस्तव्यवसायानें बुद्धीला मदत होते. श्रमाची किंमत व सुंदरता कळून येते. पण त्याहिपेक्षां दुसरा फायदा होतो तो म्हणजे श्रमावर जगणारे जे कोणी असतील त्यांच्या-विषयीं आपलेपणा वाटूं लागतो. आपण बुद्धिजीवी लोक शारीरिक श्रमाकडे फारशा आदरानें पाहत नाहीं. पण खरी गोष्ट अशी आहे कीं, आपल्या संस्कृतीचें मंदिर शारीरिक श्रमावरच उभारलें आहे. नाहीं का? कला, शिल्प, यंत्रें इ. सर्व श्रमाचीं फळें होत. आपण हस्तव्यवसाय करूं लागलों म्हणजेच आपणांस खरा बौद्धिक आनंद लाभेल. हातीं घेतलेलें हस्तव्यवसायाचें काम हळू हळू आकार धरूं लागलें म्हणजे आपल्या मनाला जो आनंदाचा साक्षात्कार होतो त्याची सर कशाला येईल? तुम्हीं दिवाळीचे किल्ले केले असतील तर तुम्हांस मी काय म्हणतों याचें रहस्य उमगेल.

### देवेंद्रांची गोष्ट

आतां सेवा हें तुमच्या चतुःसूत्रींतलें चौथें सूत्र घेऊं. सेवेशिवाय व्यक्ति आणि समाज यांना कधींहि पूर्णता येणार नाहीं. महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर यांची एक गोष्ट सांगतों ती ऐका. देवेंद्रनाथ लहानपणापासूनच धर्ममार्गाकडे वळले होते. ते विरक्त होऊन ऐन तारुण्यांत हिमालयांत निघून गेले. तेथें गंगेच्या कांठीं राहून ते तपश्चर्या करीत. हिमालयाच्या पवित्र अंकावरून खालीं चाललेल्या गंगामाईकडे पाहून देवेंद्रनाथांना

एका नव्या तत्त्वाची प्रचीति आली. ‘ स्वतः पूर्ण पवित्र असलेली गंगामाई खालीं का वहात जात आहे ? आपण पवित्र असलों तरी शेंकडों पाप्यांना पापमुक्त करण्याकरितां आणि खालील भूमि सुपीक करून लोकांना सुखी करण्याकरितां ही जात असावी. ’ असा विचार येऊन देवेंद्रनाथांना कळून चुकलें कीं, केवळ आपला उद्धार हें ध्येय संकुचित आहे. जनसेवा हाच मोक्ष. म्हणून तात्काळ आपला एकांतवास सोडून ते खालीं आले आणि लोककल्याणाचें व्रत त्यांनीं अंगिकारलें. वैदिक ऋषिसंघापासून रामकृष्ण मिशनपर्यंत लोकसेवेची परंपरा चालविणारे अनेक पंथ आपल्या देशांत झाले आहेत हें ध्यानांत धरा. ‘ हिंदुस्थान स्काउटस् ’ हे याचे परंपरेचे वारसदार आहेत ही गोष्ट विसरतां कामां नये. व्यक्ति ही समाजाशिवाय राहूंच शकत नाहीं. म्हणूनच समाजसेवा हा व्यक्तीच्या उत्कर्षाचाच एक भाग आहे.

पण असें करतांना अहंकाराला थारा देऊं नका. निगर्वी व निरलस अशा तुमच्या नेत्यांचीं उदाहरणें तुमच्यासमोर आहेत. ‘ प्रत्येक बालवीरानें दररोज एक सत्कृत्य केलें पाहिजे. ’ हा नियम पाळतांना आपणच ही बहादुरी करीत आहोंत असा गर्व वाहूं नका. कर्तव्य हें आनंदाकरितां केलें व तें अनहंकारपूर्वक केलें तरच त्याचें पुण्य लाभतें. आणखी एक शेवटची पण महत्त्वाची गोष्ट तुम्हांला सांगतों. बालवीरांनो, मघाशी तुम्ही ‘ जन गण मन अधिनायक ’....हें कविसम्राट् रवींद्रनाथ ठाकुरांचें गीत मोठ्या गंभीरपणें म्हटलेंत. आपण सर्वजण या विराट् भारताचीं लेकरें आहोंत. अशी विशाल राष्ट्रीय भावना अंतःकरणांत उत्पन्न करणारें असें तें स्फूर्तिदायक काव्य आहे. पण दुर्दैवानें आपल्या विराट हिंदुस्थानच्या एकराष्ट्रीयत्वाचा भंग होणार अशीं दुश्चिन्हें दिसूं लागलीं आहेत. जातिनिष्ठेचा समंध थैमान घालूं लागला आहे. त्यानें आपला सर्वनाश होईल. बालवीरांनो, हें संकट टाळण्यासाठीं झटा असें मला

कळकळीनें सांगावयाचें आहे. तुमची संस्था सुदैवानें जातिनिष्ठेपासून अलिप्त आहे ती तशीच ठेवून भारतासाठीं झटण्याची तयारी करा. कारण तुमच्या प्रयत्नांनींच ती अशुभ गोष्ट टळणार आहे.

* * *

**प्रश्न**

१. हस्तव्यवसायाचे फायदे कोणते ?
२. बालवीरानें कोणतीं चार सूत्रें लक्षांत ठेवावयाचीं ?
३. जनसेवा हाच मोक्ष-हें देवेंद्रनाथांना कसें पटलें ?

## अधिक वाचन

'आमच्या इंदूचें शिक्षण' (ना. म. पटवर्धन)
'मुलांस उपदेश' (ह. ना. आपटे)
बेडन पॉवेल, हर्डीकर इ.चीं चरित्रें.

* * *

# तीन मानसिक शक्ति



संमेलनाच्या सोहळ्यांत तुम्ही गर्क आहां. सहकार्यांत आणि कलाविलासांत तुम्ही अभ्यासाचे श्रम विसरून गेलां आहां. अशा वेळीं मी तुम्हांला कोणता संदेश देऊं ? जीवनाच्या पूर्व तयारीसाठीं शरीर व मन यांचीं सामर्थ्यें विकसित करणें जरूर असतें. यांपैकीं शरीर-सामर्थ्याविषयीं या अमरावती शहरांत कांहीं संदेश देणें हास्यास्पदच ठरेल नाहीं का ? आपल्या भारतांत उत्कृष्ट अशा ठरलेल्या व्यायाम-केंद्रांत या शहराची गणना होते. येथें व्यायामाच्या महतीवर मीं काय सांगावें ? श्री तुकाराम महाराज देशावर मीठ खरेदी करून कोंकणांत विकायला नेत, तसें माझ्या त्या प्रवचनाचें होईल. तुकाराम महाराज संत होते म्हणून त्यांच्या त्या अव्यवहारीपणाचें कौतुक झालें. माझें मात्र हंसूं होईल. म्हणून त्या तऱ्हेचा प्रयत्नच मी करणार नाहीं.

**मोकळें वातावरण**

आपल्या देशाभोंवतीं असलेल्या पारतंत्र्याच्या भिंती ढासळून पडत आहेत. आतां विशाल जगाशीं आपले संबंध येणार आहेत. अमेरिका, इंग्लंड, रशिया इ० महाचतुर व पुढारलेल्या राष्ट्रांच्या मांडीला मांडी लावून आपणांला आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या मसलती करायच्या आहेत.

---

न्यू हायस्कूलचें संमेलन, उमरावती (दि. २–१२–४६) येथें दिलेलें भाषण.

आपले वकील, नेते, प्रतिनिधी परक्या देशांत गेले तर तेथें उठून दिसले पाहिजेत. त्यांचा प्रभाव तेथें पडला पाहिजे. असे लोक आभाळांतून का पडणार आहेत? छे! तुमच्यांतूनच असे लोक उदयाला येणार आहेत. आणि म्हणूनच आपल्या मनबुद्धीचीं सामर्थ्यें विकसित करण्याची शर्थ तुम्हीं केली पाहिजे.

त्यासाठीं संकुचितपणाचे बांध फोडणें हें अत्यंत जरूर आहे. नेहमीं चार भिंतींत राहणाऱ्याला मोकळ्या पठारावरील हवा सोसत नाहीं, क्षितिजाकडे लांब दूरवर नजर देऊन पाहतां येत नाहीं. गेल्या १००–१२५ वर्षांच्या पारतंत्र्यानें आपली स्थिति नेमकी अशीच झाली आहे. आपल्या लहानशा क्षेत्रांत, आपल्या जातींत किंवा पोटजातींत गुरफटून जाण्याचें आपलें आजवरचें जीवन होतें. पण आतां दृष्टि व्यापक केली पाहिजे. आपले प्राचीन त्रिकालदर्शी मुनि आपणांस सांगतात, "जें पुष्कळ व भव्य आहे तेंच खरें सुख. अल्पपणांत व संकुचितपणांत मुळींच आनंद नाहीं." आपल्या देशाचें पारतंत्र्याचें ग्रहण हळूहळू सुटत आहे आणि सर्व जगाशीं त्याचा ऋणानुबंध जडत आहे. अशा वेळीं तर हा आपल्या मुनींचा अमृतोपदेश आपण जास्तींत जास्त आचरणांत आणला पाहिजे. खूप वाचा, खूप खेळा, दंगामस्ती करायची तीसुद्धां बिचकत-भीत करूं नका. पाण्यांत खडा टाकतांच निर्माण झालेलीं वलयें जशीं मोठमोठीं होत जातात तशी तुमची बुद्धि काय व सहानुभूति काय विस्तृत होत गेली पाहिजे.

बुद्धीचा विकास अध्ययनानें होतो. भावनांचा विस्तार स्वार्थ सोडल्यानें होतो. युरोपीय वाङ्मयांतील एक गोष्ट सांगूं का? एका जलदेवाची गोष्ट आहे ती. एक जलदेव समुद्रांत राहात होता. त्याचें वरचें अर्धें अंग माणसाचें होतें, आणि खालीं त्याला माशाप्रमाणें दोन पात्यांचें खवलेदार शेपूट होतें. जलदेव व त्याचे नातेवाईक यांना बुद्धि

होती पण हृदय नव्हतें. ते दुसऱ्याविषयीं विचारच करीत नसत. एके दिवशीं मार्गारेट नांवाची सुंदर, निष्पाप व भक्तिमान् मुलगी समुद्र-कांठीं सहज येऊन बसली. लाटांवरून जलदेव हिंडत असतां त्यानें मार्गारेटला पाहिलें आणि ही आपली राणी असावी अशी त्याला तीव्र इच्छा उत्पन्न झाली. त्यानें त्याप्रमाणें तिला तेथेंच मागणी घातली आणि तीहि कबूल झाली. जलदेव तिला आपल्या राज्यांत घेऊन गेला आणि त्यानें तिला आपली पट्टराणी केलें. मोत्यांचे व पोवळ्यांचे महाल, अष्टौ-प्रहर सेवेला दासदासी असें वैभव मार्गारेटला लाभलें. तिला गोजिर-वाणीं मुलेंहि झालीं. पण तिचें मन मात्र त्या हृदयहीन लोकांत रमत नव्हतें. आपल्या गांवांतील प्रार्थनामंदिरांत चाललेले गंभीर घंटानाद व मधुर प्रार्थना तिला ऐकूं येई आणि तिची हुरहुर वाढत जाई. अखेर एके दिवशीं जलदेवाची परवानगी घेऊन व 'परत येतें' असें सांगून मार्गारेट आपल्या गांवीं गेली. तेथें भजनपूजनांत ती रमली आणि जल-देवाच्या राज्यांत ती कांहीं परत आली नाहीं. मात्र आपला पति आणि मुलें यांना सुरक्षित व सुखी ठेवण्यासाठीं ती दररोज देवाची प्रार्थना करी. इकडे पुष्कळ दिवस जलदेवानें मार्गारेटची वाट पाहिली. त्याला तिच्या विरहानें फार दुःख झालें. मुलांना तो कळवळून सांगूं लागला, "बाळांनो, तुम्ही तरी आपल्या आईला हांक मारा. माझ्या नाहीं तरी तुमच्या हाकांनीं ती परत येईल. मुलांच्याच हाका आईला प्रिय असायच्या ! नाहीं का ?" मार्गारेट परत आली नाहीं, पण जलदेवाला हृदय आलें. दुसऱ्या व्यक्तीविषयीं आपल्या जीवनांत त्यानें इतका उत्कटतेनें प्रथमच विचार केला होता. त्याचेंच फळ त्याला प्राप्त झालें. या हृदयंगम कथेवरून कोणता बोध घ्यायचा तो तुमच्या लक्षांत येईलच.

**बुद्धीची श्रेष्ठता**

भावनेप्रमाणेंच बुद्धि ही फार मोठी शक्ति आहे. चाणक्य म्हणे,

" माझें सर्वस्व गेलें तरी चालेल, पण शंभर सैन्यदलांना भारी असलेली माझी बुद्धि मात्र माझ्याजवळ राहिली पाहिजे." अध्ययन, वाचन, मनन, लेखन इ. मार्गांनीं बुद्धीची मशागत करतां येते. मोठाले विषय बुद्धीला पेलायला शिकवा.

भावना आणि बुद्धि यांखेरीज आणखी एक फार मोठी शक्ति देवानें माणसाला दिली आहे. ती शक्ति बुद्धीच्या पलीकडची आहे. तिचें नांव अंतःप्रेरणा. एकाद्या अवघड प्रश्नाचें एकदम ज्ञान होणें, विचाराच्या गोंधळांतून अचानक नवीन कल्पना सुचणें हीं कार्यें अंतःप्रेरणा करते. याच अंतःप्रेरणेनें न्यूटनला झाडावरचें फळ खालीं पडतांना पाहून गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत सुचला; शिवाजी महाराजांना आग्र्याच्या स्थानबद्धतेंतून निसटून जाण्यास याच अंतःप्रेरणेमुळें युक्ति सांपडली. श्रीकृष्णापासून गांधीजींपर्यंत सर्व असामान्य पुरुषांना या अंतःप्रेरणेमुळें वेळोवेळीं दिव्य प्रकाश दिसला आहे. आपल्या साध्या जीवनांतसुद्धां या अंतःप्रेरणेचा थोडाफार साक्षात्कार आपणांस घेतां येईल. भावना आणि बुद्धि यांचा मेळ तुम्ही जितक्या चतुराईनें घालाल, आचारा-विचारांत जेवढी शुद्धता राखाल तेवढी तुमची अंतःप्रेरणा बलवान होईल. स्वच्छ पाण्यांतच हुबेहूब प्रतिबिंब पडतें. भावना, बुद्धि व अंतःप्रेरणा यांच्या सुंदर मिलाफानें तुमचें मन निर्मळ होईल आणि मगच त्यांत सत्याचें यथातथ्य चित्र उमटेल. यासाठीं जर्मन महाकवि गटे याचा महामंत्र तुम्हीं आचरला पाहिजे. कोणता तो मंत्र ? गटे सांगतो–" दररोज एक चांगला शब्द वाचा, एक चांगला शब्द बोला आणि एक चांगलें कार्य करा."

* * *

## प्रश्न

१. पारतंत्र्य व स्वातंत्र्य या काळांतला मोठा फरक कोणता ?

२. भावनांच्या विकासाचें साधन कोणतें ?

३. भावना व बुद्धि यांखेरीज तिसरी शक्ति कोणती ?

## अधिक वाचन

'मुलांचें स्वराज्य' (ल. नी. छापेकर)

'जपानची जीवनक्रांति' (ग. श्री. खैर)

'प्राचीन साहित्य' (रवीन्द्रनाथ)

* * *

# उद्यांचे नागरिक 

मुलांमुलींचा हा मेळावा पाहून मला अत्यंत आनंद झाला आहे. एका जादूच्या नदींत स्नान करून बाहेर येतांच मनुष्याला पुनः तारुण्य येई अशी एक अद्भुत कथा आहे. अशी एखादी खरोखरची नदी होती कीं नाहीं कुणास ठाऊक ! पण माझ्यासमोर ही जी बाल-गंगा आहे तिच्यांत उतरलें कीं थकलेलें मन ताजेंतवानें होतें. हा मात्र माझा नेहमींचा अनुभव आहे आणि तो आज पुनः घेण्याची सुसंधि मला मिळाली आहे.

या ठिकाणीं येण्यांत मला आणखी एक आनंद आहे. हें गांव साधारणपणें पुणें व सातारा या दोन जिल्ह्यांच्या सरहद्दीवर आहे. या दोन जिल्ह्यांत महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाचीं अनेक सुंदर सुंदर स्मारकें आहेत. माझी पितृभूमि सातारा आणि कर्मभूमि पुणें असल्या-मुळें महाराष्ट्राच्या या दोन जिल्ह्यांचा मला फार जिव्हाळा वाटतो, म्हणूनच दोन जिल्ह्यांच्या संगमावर असलेल्या या गांवीं येण्यामुळें उत्साहाची एक नवी लाट अंत:करणांत आली आहे.

आपल्या देशांत आलेल्या स्वातंत्र्यामुळें तुमच्या पिढीपुढें फार मोठीं क्षितिजें दिसूं लागलीं आहेत. पूर्वीं जिल्ह्याच्या मुख्य अधिकाऱ्याची

---

इंग्रजी व मराठी शाळांचें संमेलन, साखरवाडी ( दि. २०-८-४९ ) येथील भाषण.

जागा कोणा हिंदी माणसाला मिळाली तर तो एक अपूर्व योग समजला जात असे. आतां भारतांतील सर्व मोठ्या जागा आपल्या लोकांनीं भूषविल्या आहेत. म्हणजेच तुमच्या अंगीं योग्यता असेल आणि तुम्ही पुरेशी तपश्चर्या कराल तर देशांतला मोठ्यांतला मोटा मान तुम्ही मिळवूं शकाल.

**आपली भूमिका समरसतेनें करा**

तुम्हीं जीवनांत जी भूमिका आवडीनें पत्करली आहे ती यथासांग व कुणाचा मुलाहिजा न ठेवतां पार पाडणें हाच खरा धर्म होय. तुम्ही सुतार असा, शिक्षक असा कीं सेनापति असा. आपलें कर्तव्य चोख बजावणें हाच श्रेष्ठ धर्म होय. 'जग ही एक रंगभूमि आहे' असें जगविख्यात इंग्लिश नाटककार शेक्सपिअर यानें म्हटलें आहे. या रंगभूमीवर तुम्हांला जी लहान मोठी भूमिका मिळाली असेल ती तन्मयतेनें करणें हेंच जीवनाचें सार्थक होय. हो! शेक्सपिअरवरून एक गोष्ट आठवली. ती माझ्या म्हणण्याच्या पुष्टीसाठीं फार उपयुक्त ठरेल. शेक्सपिअर जसा असामान्य नाटककार होता तसा उत्तम नटहि होता. त्या वेळची इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्या बापाच्या चरित्रा-वर शेक्सपिअरनें एक नाटक लिहिलें होतें. या नाटकांत शेक्सपिअर स्वतः त्या बापाची भूमिका करीत असे. एलिझाबेथ एकदां हें नाटक पाहण्यास आली. त्या दिवशीं अर्थात् शेक्सपिअर विशेष दक्षतेनें व उत्कटतेनें काम करीत होता. एलिझाबेथ राणी फार रसिक व गुण-ग्राही होती. आपल्या पित्याचें चित्र शेक्सपिअरनें आपल्या भूमिकेंत वठविलें आहे हें पाहून ती फारच संतुष्ट झाली आणि तिनें आपला हातरुमाल रंगभूमीवर शेक्सपिअरकडे टाकला. तिची आणि सर्वच प्रेक्षकांची अपेक्षा अशी होती कीं, तो उचलून घेऊन शेक्सपिअर राणीला कृतज्ञतापूर्वक मुजरा करील. पण शेक्सपिअरनें तसें कांहीं न

करतां पायानें तो रुमाल बाजूला केला आणि जणू कांहीं झालेंच नाहीं अशा थाटांत काम चालू ठेविलें! सर्वांना अचंबा वाटला. "काय उद्दाम माणूस हा!" लोक म्हणाले, "आतां शेक्सपिअरचीं शंभर वर्षें भरलीं. हा अपमान राणी कधींच सहन करणार नाहीं." नाटक संपलें. राणी अर्थात् संतापलेलीच होती. शेक्सपिअर वेष बदलून तिच्याकडे आला आणि त्यानें तिचे पाय धरले. तो म्हणाला, "राणी-सरकार, मघाशीं आपला अपमान करण्याचा माझा हेतु नव्हता. पण मी आपल्या पित्याचें काम करीत होतों. त्याच वेळीं आपली बक्षिसी दासाच्या लाचारीनें घेतली असती तर त्या कामाची शोभा गेली असती. प्रेक्षकांच्या समाधीचा भंग झाला असता. आतां तो आपला हातरुमाल मी मस्तकीं आदरपूर्वक घेत आहें." शेक्सपिअरच्या खुलाशानें राणीचा राग मावळला. या आख्यायिकेवरून आपली भूमिका करतांना माणसानें किती समरस झालें पाहिजे आणि कुणाचाहि दिमाख कसा चालू देतां कामां नये हें तुमच्या लक्षांत येईल. रंगभूमीवर जो न्याय तोच प्रत्यक्ष व्यवहारांत पाळला पाहिजे.

## साधनांवांचून अडून बसूं नका

आपण साधनें कमी पडलीं याचा बडेजाव फार माजवितों. परंतु आहेत त्या साधनांचा पुरेपूर उपयोग करून घेतला कीं नाहीं हें कधींच पाहत नाहीं. या साखरवाडीला शहरांतल्याप्रमाणें नाट्यगृहें, चित्रपटमंदिरें, ग्रंथालयें वगैरे नाहींत म्हणून तेवढी तुमच्या ज्ञानांत कमताई येईल. पण येथें जीं यंत्रें आहेत, जें सृष्टिसौंदर्य आहे, जें आरोग्यदायक वातावरण आहे त्याचा तुम्हीं कितीसा फायदा करून घेतला आहे? मी हें हेटाळणीच्या स्वरांत म्हणत नाहीं. मला असें म्हणावयाचें आहे कीं, आपल्याजवळ जें सहजसिद्ध आहे त्याचा माणसानें पुरेपूर उपयोग करून घ्यावा. साधनाची कमतरता ही

सबब सांगून स्वस्थ बसूं नये. नेपोलियनला एक सैनिक सांगायला गेला कीं, "सरकार, मला मिळालेली तलवार इतरांच्या तलवारीहून अर्धा फूट आखूड आहे." नेपोलियन म्हणाला, "अरे, मग बिघडलें कुठें? शत्रूशीं लढतांना तूं अर्धा फूट पुढें पाय टाक म्हणजे झालें!"

**शरीरश्रमाची महती**

आपण जो व्यवसाय करतों त्यांत जास्तींत जास्त प्रावीण्य मिळविणें यांत स्वतःचा उत्कर्ष आहे तशीच राष्ट्रसेवाहि आहे. धंदा लहान कीं मोठा, हलका कीं पवित्र हा प्रश्नच उद्भवत नाहीं. प्रामाणिकपणें कुठलाहि धंदा केला आणि त्यांत जास्तींत जास्त कौशल्य दाखविलें म्हणजे तुम्हीं साधली. लोकमान्य टिळक म्हणत, "माझ्या मुलांनीं जोडे शिवले तरी चालतील, पण ते जोडे असे नामांकित ठरावेत कीं सर्व देशांत त्यांला तोड नसावी." गांधीजी भंगीकाम हें अध्यापन-ग्रंथलेखनाइतकेंच पवित्र समजत हें प्रसिद्ध आहे. आपण शरीर श्रमाचीं कामें उगीच हलकीं समजतों. त्यामुळें आपल्या देशाची दुर्दशा झाली आहे. बुद्धिमान् माणसें शरीरश्रमांचा तिटकारा करतात. त्यायोगें कष्टकरी माणसांना नेहमींच मागासलेलें राहावें लागतें. या वाईट अवस्था आहेत. हातापायाला योग्य गति व कार्य मिळाल्यानें बुद्धीचीहि वाढ होते हें आतां सिद्ध झालें आहे. म्हणून शरीरश्रमांचा कंटाळा करूं नका. शरीरश्रमामुळें तुमचा आत्मविश्वास वाढेल. तुमची बुद्धि तल्लख होईल, तुमच्या अंगीं कार्यक्षमता येईल; आणि विशेष म्हणजे कष्ट करणारी जनता आणि तुम्ही यांच्यांत जें एक कृत्रिम अंतर पडलें आहे तें नाहींसें होईल.

मित्रहो, शेवटीं एकच गोष्ट मला सांगावयाची आहे. "अखंड सावधान असावें" असा बहुमोल उपदेश आपणांस श्रीसमर्थ रामदासांनीं केला आहे. व्यक्तीच्या काय किंवा राष्ट्राच्या काय जीवनांत सावधानता

अनुक्रम. ३५८९५
क्रमांक ........१५५८
नों० दि० ........

पाहिजे. इंग्लंडचा कट्टा शत्रु प्रतापशाली नेपोलियन् इंग्लंडवर स्वारी करण्यासाठीं आरमाराची तयारी सतत करीत होता. त्याची तयारी पूर्ण झाली असती तर इंग्लंडला फार जड गेलें असतें. पण इंग्लंडचा खंदा दर्यासारंग नेल्सन यानें नेपोलियनची तयारी पूर्ण होऊंच दिली नाहीं. जेथें हें आरमार बनविलें जात होतें तेथें जीव धोक्यांत घालून हल्ला करावयाचा आणि झालेलें काम मोडतोड करून नष्ट करायचें असा उद्योग नेल्सननें केला. ही सावधानता आम्हांला अत्यंत आवश्यकच आहे. आपल्या प्रगतीच्या आड येतील अशा दुष्ट शक्तींना प्रबल होऊं द्यायचें नाहीं; हें एक सूत्र तुम्ही अंमलांत आणा म्हणजे जीवनाची लढाई तुम्हीं जिंकलीत असें समजा. नेल्सननेंच रणांगणावर प्राण सोडतांना आपल्या देशबांधवांना संदेश दिला, " इंग्लंड आपल्या प्रत्येक नागरिकाकडून कर्तव्यपालनाची अपेक्षा करीत आहे. " या संदेशांत इंग्लंड 'च्या जागीं ' भारत ' हा शब्द घातला कीं मला काय म्हणायचें तें सर्व त्यांत आलें.

* * *

**प्रश्न**

१. जीवन ही रंगभूमि आहे म्हणजे काय ?

२. शरीरश्रमाचें महत्त्व कोणतें ?

३. अखंड सावधानता म्हणजे काय ?

**अधिक वाचन**

' नेपोलियन बोनापार्ट ' ( वि. ल. भावे )

' लेनिन ' ( भुस्कुटे )

' सुमन सप्तक ' ( द. वा. पोतदार )

* * *

# जीवनातील आनंद

११

तुम्हांला चार शब्द सांगायचे ठरविलें पण काय बोलावें याविषयीं नुसता गोंधळ उडाला आहे मनांत ! हा गोंधळ सांगायचें काय तें सुचत नाहीं म्हणून नाहीं, तर इतकें सांगावेसें वाटतें कीं, नेमलेल्या वेळांत त्यांतलें नेमकें काय बोलावें हें कळत नाहीं म्हणून आहे. पण या गोंधळांतून वर निघून मला कांहींतरी निर्णय घेतला पाहिजे. म्हणून ज्या नांवाशीं माझा कायमचा संबंध जोडला जातो तो 'आनंदा'चाच विषय मी घेत आहें. तुम्ही लहान आहां. तुमच्या जीवनाचा अरुणोदय होत आहे. प्रतिक्षणीं नवनवीन कल्पनांची किलबिल तुम्हांला ऐकूं येत आहे. आज तुमच्या जीवनांत आनंदाची लयलूट होत आहे.

बालवयाला हें सर्व योग्य असेंच आहे. पण ही आनंदी वृत्ति पुढें पुढें कमी होत जाते. मनुष्य बऱ्यावाईट अनुभवांनीं कडवट बनत जातो आणि जीवनांतील आनंद गमावून बसतो. असें होऊं नये यासाठीं आजपासूनच तुम्हीं तयारी केली पाहिजे. या शैशवाच्या आनंदसरोवराकडे तुम्हांला पुढें परततां येणार नाहीं. जहाज जसें शेवटच्या मुक्कामापर्यंत पुरेल एवढें गोडें पाणी प्रवासाला निघतांना भरून घेतें तसा जन्मभर पुरेल एवढा आनंद आजच मनांत साठवून

---

विवेकवर्धिनी पाठशाळा, हैद्राबाद (द.) (दि. १-१०-४१) येथील भाषण.

ठेवा. आमच्या उपनिषदांत असें सांगितलें आहे कीं, " सारें ज्ञान विसरून बालवृत्तीनें रहात जा. " बालवृत्ति हाच जीवनांतला परमानंद होय. ज्ञानी व्हा, पण आनंदी रहा. म्हणजेच बालवृत्तीची जोपासना करा.

## देण्यांत आनंद, घेण्यांत नव्हे

जीवनांतील खरा आनंद कशावर असतो याचा तुम्हीं कधीं विचार केला आहे काय ? नसेल केला तर जरूर करा. याविषयीं एकच सूत्र तुम्हांला सांगतों. आपण आपल्या सुखाविषयीं जितका कमी विचार करूं तितकें आपण आनंदाजवळ जाऊं शकूं. एक सेनापति घायाळ होऊन रणांगणांत पडला आणि ' पाणी पाणी ' असें ओरडूं लागला. शिपायांनीं त्याच्यापुढें पाण्याचा पेला केला. इतक्यांत सेनापतीची नजर जवळच पडलेल्या एका जखमी शिपायाकडे गेली. त्याची घटका भरत आली होती. सेनापतीनें आपल्या सेवकांना सांगितलें, " त्याला हा पेला द्या. त्याला याची गरज अधिक आहे. " त्या मरणोन्मुख शिपायाला पाणी दिल्यानें सेनापतीला जो आनंद झाला तो किती सात्त्विक असेल बरें ! हाच धर्माचा गाभा होय. भोगापेक्षां त्यागावर भर दिल्यानेंच जास्त आनंद मिळतो.

## जीवनांतले पेचप्रसंग

पण कित्येकदां असे पेचप्रसंग येतात कीं, कुठलाहि निर्णय घेतला तरी त्याग हा करावाच लागतो. अशा वेळीं निश्चयपूर्वक इतरांच्या सुखाविषयींची आस्था हीच एक कसोटी ठरविली पाहिजे. याविषयीं सहज आठविली म्हणून एक गोष्ट सांगतों. एका रानटी राजाची आहे ती गोष्ट. एका रानटी राजाच्या राज्यांत एक असा नियम असे कीं, कोणतेंहि दुष्कृत्य कोणीं केलें कीं त्याला हिंस्र पशूच्या तोंडीं द्यावयाचें त्या राज्यांतील एका गुलामाची राजाच्या मुलीवर भक्ति जडली. मुलगीहि

त्याला चाहूं लागली. राजाला हें कळलें. राजकन्येवर गुलामानें प्रेम करावयाचें हा भयंकर गुन्हा ! गुलामाला हिंस्र पशूच्या तोंडीं द्यावयाची शिक्षा सुनविण्यांत आली ! राजकन्येनें पुष्कळ रदबदली करण्याचा प्रयत्न केला. पण राजा शिक्षा रद्द करीना. मात्र मुलीच्या प्रेमाखातर राजानें एक विकल्प सांगितला. राजाची योजना काय होती ? राजा व त्याचे मानकरी यांच्यासमोर असलेल्या दोन बंद खोल्यांपैकीं त्या दोषी ठरलेल्या गुलामानें कोणतीहि उघडावी. एका खोलींत वाघ आणि एका खोलींत एक लावण्यवती स्त्री अशीं राजा ठेवणार. अर्थात् कोणत्या खोलींत कोण याचा सुगावा मात्र कुणालाच नसणार. स्त्रीची खोली गुलामानें उघडली तर त्या स्त्रीशीं गुलामाचें लग्न लावून द्यायचें आणि वाघाची खोली उघडली तर वाघाकडून त्या गुलामाला खाऊन टाकायचें. राजकन्येनें कोणत्या खोलींत कोण ठेविलें आहे याचा तपास युक्तीनें केला आणि गुलामाला गुप्त निरोप पाठविला कीं, ' मी ज्या खोलीकडे बोट करीन ती खोली उघड. ' ही गोष्ट येथेंच सोडून देऊं. मी मघाशीं सांगितलें त्याकडे तुम्ही बारकाईनें पाहावें, असें मला सांगावयाचें आहे. वाघाच्या खोलीकडे राजकन्येनें बोट केलें तर आपला प्रियकर मारला जाणार, आणि सुंदर स्त्रीच्या खोलीकडे बोट केलें तर तो जगणार हें खरें असलें तरी दुसऱ्या स्त्रीचा पति होऊन आपणाला तो अंतरणार. असला विलक्षण पेंच राजकन्येपुढें नव्हता का ? कुठलाहि त्याग आपणास फायदेशीर नाहीं आणि त्याग तर करावाच लागतो. राजकन्ये-सारखी स्थिति जगांत पुष्कळांची होते. अशा वेळीं आपलें सुख संपलें असलें तरी ज्या त्यागानें दुसऱ्याला आनंद होईल तोच श्रेष्ठतर त्याग पत्करणें आपलें कर्तव्य नाहीं कां ?

आज बुद्धिवादाबद्दल फार हाकाटी करण्यांत येते. आजचें युग बुद्धिवादाचें आहे अशा कल्पनेंत आपण दंग असतों. पण बुद्धिवादानें

अनु. 30815 ... 1558 ... दि. 2.51.1159

मार्ग दिसला तरी खरें कर्तृत्व श्रद्धेच्या स्फूर्तीनेंच झालें आहे, हें विसरूं नका.

## श्रद्धेची महती

एडनसाहेबांनीं आकाशवाणीवरून देशसंरक्षणासाठीं पांच लक्ष नागरिक पाहिजेत अशी घोषणा करण्यास सुरुवात केली आणि त्यांचें ४५ मिनिटांचें भाषण संपण्याचे सुमारास ५ लक्ष नागरिकांची भरती होऊनहि गेली ! तें भाषण चालू असतां सर्व ग्रेटब्रिटनमध्यें शेजारच्या सरकारी कचेरींत जाऊन नांवें नोंदण्याची गर्दी सुरू होती. अशीं कार्यें विवेचकबुद्धीच्या बळावर होत नाहींत. तेथें श्रद्धाच लागते. ४०० वर्षें जगावर प्रभुत्व टिकविणाऱ्या राष्ट्रांतले असे अमोलिक गुण आपण आपल्या अंगीं आणण्यास शिकलों नाहीं तर पारतंत्र्याची आपत्ति येऊन आणि इंग्रजांचें साहचर्य घडून आपण आपला कांहींच फायदा करून घेतला नाहीं असें होईल.

मित्रहो ! जीवनांतील आनंद हा बाल्यवृत्तीवर अवलंबून आहे आणि ही बाल्यवृत्ति अहंकारविरहित त्याग करण्यास शिकल्याशिवाय साधणार नाहीं, एवढीं सूत्रें लक्षांत ठेवा.

* * *

## प्रश्न

१. जीवनाचा आनंद कशावर अवलंबून आहे ?

२. बुद्धीहून मोठी शक्ति कोणती ?

## अधिक वाचन

‘ सुख आणि शांति ’ ( म. ह. मोडक )

‘ गीताहृदय ’ ( साने गुरुजी )

‘ स्मृतिचित्रें ’ ( लक्ष्मीबाई टिळक )

* * *

## जीवनाची तयारी १२

बालमित्रहो, तुम्ही आज जीवनाच्या उषःकालांत आहांत. उत्साहाची मंदसुगंधित वायुलहरी क्षणोक्षणीं तुम्हांला चैतन्य देत आहे, तुमच्या कल्पनेला नवेनवे अंकुर फोडीत आहे. आपल्या देशांतील व परदेशांतील थोर माणसांचे जीवनवृत्तांत वाचून किंवा त्यांचा गौरव पाहून थोर होण्याची महत्त्वाकांक्षा तुमच्या मनांत निर्माण होते, ती योग्यच आहे. पण नुसत्या मनोरथानें का जीवन सफल होतें ? नाहीं. त्यासाठीं तयारी करावी लागते. फार मोठी तपश्चर्या करण्याची आवश्यकता असते. जीवनाच्या आरंभापासूनच ती करणें जरूर आहे. मॉंटेसरीबाईसारख्या जगविख्यात शिक्षणशास्त्रज्ञ तर म्हणतात कीं, माणूस वयाच्या २॥ ते ४ वर्षांपर्यंत जे संस्कार ग्रहण करतो त्यावर त्याचें पुढील सर्व जीवन अवलंबून राहतें. पण या वयांत आपण परावलंबी असतों. यावेळीं आपल्यावर सुसंस्कार करण्याचें कर्तव्य पालकांनीं व शिक्षकांनीं केलें पाहिजे. पण तो निराळाच विषय होईल. आज मला तुम्हांला समजूं लागल्यापासून जीवनाच्या साधनेसाठीं तुम्हीं काय करायला पाहिजे एवढेंच थोडक्यांत सांगावयाचें आहे.

---

१. शिवाजी हायस्कूल, कऱ्हाड (दि. २४-९-४७). २. हायस्कूल, उस्मानाबाद, (दि. १-९-४९) येथील भाषणांचें संकलन.

**संकटकाळासाठीं तयारी**

जीवन सुरळीत चाललें आहे तोंवर आपण आनंदी, निरोगी व उदार राहूं यांत आश्चर्य नाहीं. पण परिस्थिति बिघडली, रोजच्या कार्यक्रमांत खंड पडण्याचे प्रसंग आले, आणि प्रतिकूल घटनांच्या फासांत अडकण्याची वेळ आली तरीहि आपलें मानसिक व शारीरिक आरोग्य टिकलें पाहिजे. हेंच खरें यश होय. पहिल्या महायुद्धांत इंग्लंडमध्यें शस्त्रास्त्रांचे नवे नवे नमुने तयार करण्यासाठीं तज्ज्ञांची एक समिति नेमली होती. नवें पिस्तुल किंवा नवी बंदूक जर पसंतीसाठीं आली तर सुमारें दोनशें फुटांवरून ती खालीं टाकण्यांत येई. आणि एवढा धक्का बसूनहि ती सुरळीत काम देते आहे असें दिसलें तर तो नमुना पसंत करण्यांत येई. याच कसोटीवर जीवनाची यशस्विता आपण ठरविली पाहिजे. कित्येक नित्याच्या गोष्टींचा अभाव झाला, पाहिजे तसें साजूक तूप मिळालें नाहीं, पलंगाऐवजीं खडबडीत जमिनीवर निजावें लागलें, यंत्रांत बिघाड झाल्यामुळें मोटर नादुरुस्त होऊन दहा मैल रखडत जावें लागलें, उन्हांत किंवा पावसांत कंटाळा येईपर्यंत उभें राहावें लागलें तरीहि तुमचें शरीरयंत्र काम देईल अशी शक्ति तुम्हीं मिळविली पाहिजे. त्याचप्रमाणें मनाच्या विरुद्ध अनेक गोष्टी झाल्या तरी प्रक्षुब्ध न होतां नीट मार्ग काढण्याची वृत्ति आपण टिकविली पाहिजे. अतिरेकानेंसुद्धां शरीर-मनाचा तोल ढासळतो. पराच्या गादीवर लोळायला मिळालें किंवा चोहीकडून कौतुकाचा सारखा मारा झाला तरी आपलें शरीर-मन विचलित होतें. तसें न होऊं देणें हाच सर्वांत श्रेष्ठ जीवनयोग होय. तो एका दिवसांत साध्य होणार नाहीं. त्यासाठीं सतत अभ्यास पाहिजे. देहाची व मनबुद्धीचीं सामर्थ्यें आपण पद्धतशीर रीतीनें वाढविलीं पाहिजेत.

**‘आनंद-यज्ञ’**

जीवन हा एक यज्ञ आहे. पण आपले रवीन्द्रनाथ म्हणतात त्या-

प्रमाणें तो एक ' आनंदयज्ञ ' आहे. या आनंदयज्ञांत समरस होऊन भाग कसा घेतां येईल हें ज्ञान तुम्हीं पहिल्यापासून मिळविलें पाहिजे. झणझणीत पदार्थ खाण्यांत आनंद आहे, तसाच दुसऱ्याला उपद्रव देऊन फजित करण्यांतहि आनंद आहे. पण दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यांत जो आनंद आहे तो या पहिल्या दोन गोष्टींनीं मिळेल का? कधींच नाहीं. तामस आणि सात्त्विक या दोन प्रकारच्या या आनंदांत सात्त्विक आनंद हा अधिक श्रेष्ठ व अधिक काल टिकणारा आहे. एकादी उत्तम वस्तु तयार केली, एकादें सुंदर गीत ऐकिलें, किंवा स्वार्थ बाजूला ठेवून कुणाला मदत केली म्हणजे जी प्रसन्नता येते तिला सात्त्विक सुख किंवा आनंद म्हणतात. नवनिर्मिति, कलासेवन आणि त्याग हीं त्या सुखाचीं साधनें होत. हें सुख आपणांस भरपूर मिळावें यासाठीं झटा.

तुमच्या अंगीं निसर्गानें जी कला ठेविली आहे ती वाढवणें व तिच्या-योगें आपलें व राष्ट्राचें जीवन संपन्न करणें हें तुमचें ध्येय असलें पाहिजे. या ध्येयांत स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही तुम्हांला साधतां येतील. परमार्थ मी राष्ट्रीय अर्थानें म्हणतों, आपण एका राष्ट्राचे म्हणजेच त्या राष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतिनिधि आहोंत. म्हणून आपली कला जितकी विकसित होईल तितकी आपली वैयक्तिक योग्यता वाढेल, त्याप्रमाणें आपल्या राष्ट्राची कीर्तीहि वाढणार आहे. ध्यानचंद आणि उदयशंकर, रामन् आणि राधाकृष्णन् अशा कला-विद्यांच्या उपासकांनीं केवळ स्वतःचा गौरव साधला काय? नाहीं. आपल्या राष्ट्राचाहि लौकिक त्यांनीं आपल्या कर्तृत्त्वानें वाढविला. हीं फार मोठीं उदाहरणें झालीं. पण अगदीं लहान प्रमाणांत का होईना तुम्हांला हें दुहेरी कार्य करून दाखवितां येईल. तुम्हीं दृष्टि ती ठेविली पाहिजे.

साधी फोटोग्राफीसारखी कला घ्या. आपला व राष्ट्राचा लौकिक वाढविण्यासाठीं ही कला तुम्ही कशी राबवाल? आपल्या देशांतल्या हिडीस प्रकारांचीं चित्रें बाहेरचे कलावंत काढून जगांत प्रसिद्ध करतात. कांटयांवर पडलेले वैरागी, गारुडी, भिकारी, वस्त्रहीन आदिवासी यांचे फोटोग्राफ्स् प्रसिद्ध होतात. जणूं भारत म्हणजे एक कुरूप, भिकाऱ्यांचाच देश आहे! भारताची ही पद्धतशीर बदनामी थांबवावयाची असेल तर भारतांतल्या रम्य दृश्यांचे, उत्सवांचे, वनश्रींचे विपुल फोटो जगांत गेले पाहिजेत. तुम्ही हें करूं शकाल. माझे गुरुवर्य माधव ज्यूलियन् यांनीं हेंच एका सुंदर सूत्रांत सांगितलें आहे.' **स्वार्थही राष्ट्रीय दृष्टीनें पहा जी नेहमीं । उन्नतीची घे हमी ।।**"

शेवटीं तुम्हांला एकच सांगायचें.

मनुष्य केवळ शरीरसुखाच्या मागें लागला तर तो पशु होईल. शरीराचे कोड थोडे फार पुरविले पाहिजेत. पैसा व सत्ता हींहि कामापुरती मिळविलीं पाहिजेत. कारण त्यायोगें आपण जीवन स्वावलंबी व समृद्ध करूं शकूं. परंतु तेवढयानें संपलें नाहीं. नव्हे, खऱ्या सुखाचा व कृतार्थतेचा मार्ग त्या पुढेंच आहे. अंतःकरणाला सदैव प्रसन्नता मिळेल अशा कार्याकडे तुम्हीं आपल्या शक्ति लावल्या पाहिजेत.

शरीर आणि आत्मा दोन्हींचें पोषण होईल अशी जीवनसाधना करा. कुराणांत एक सुंदर सूक्ति आहे. ती अशी—"तुमच्यापाशीं दोन पैसे असले तर एका पैशाची रोटी विकत घ्या आणि एका पैशाचीं फुलें खरीद करा. कारण रोटी हें जसें शरीराचें अन्न आहे तसें फुलें हें आत्म्याचें अन्न आहे."

* * *

## प्रश्न

१. शरीर–मनाच्या निरोगीपणाची कसोटी कोणती ?

२. सात्त्विक आनंद कशानें मिळेल ?

## अधिक वाचन

'जीवन-दर्शन' ( जिब्रान )

'पै. महंमदाचीं वचनें' ( अनु. कुंदर दिवाण )

★ ★ ★

# कु मा र मि त्रां नो

## वि भा ग ति स रा

## अनुक्रम


संगीत साधना

वक्तृत्व

छंद

वनमहोत्सव

अर्थव्यापार

अनन्त हस्ते कमलावराने

तुम्ही या विद्यालयांत संगीताचें शिक्षण घेत आहां. सर्व ललितकलांत ही अग्रगण्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मनुष्य चित्रें काढतो, काव्यें करतो किंवा नृत्याभिनय दाखवितो. या सर्व कालांत त्याच्या अंतरंगांमध्यें चाललेलें इच्छाशक्तीचें तांडव प्रकट होत असतें. जर्मन तत्त्वज्ञ शौपेनहार म्हणतो कीं, "इतर कला हें माणसाच्या इच्छाशक्तीचें प्रखर रूप असेल. पण संगीत म्हणजे माणसाची प्रत्यक्ष इच्छाशक्तीच होय." हेंच तुम्हांला अधिक स्पष्ट करून सांगायचें तर एका दृष्टांतानें सांगतां येईल. राष्ट्राचा अध्यक्ष किंवा राजा निरनिराळ्या राष्ट्रीय समारंभांत आपले लहानमोठे प्रतिनिधी पाठवितो. समारंभाचें स्वरूप ज्या मानानें असेल त्या मानानें प्रतिनिधींची निवड तो करतो. पण एखादा समारंभ असा असतो कीं, तेथें प्रत्यक्ष राष्ट्राध्यक्षाला किंवा राजालाच हजर राहावें लागतें. इतर ललितकला या मानवी इच्छा-शक्तीच्या प्रतिनिधी आहेत, पण संगीत मात्र खाशी स्वारी आहे !

**'सतारीचे बोल'**

संगीत मनुष्याला मोह पाडतें. त्याच्या मनांतल्या भावनाकल्लोळांना कह्यांत आणून एका अलौकिक सुखाचा साक्षात्कार त्याला घडवून

---

श्री गंधर्व विद्यालय (नागेश पेठ, पुणें) या संस्थेच्या वार्षिकोत्सवाचे वेळीं (दि. ७।९।५०) केलेलें अध्यक्षीय भाषण.

देतें. संगीत व पराक्रम यांचें मुळींच वैर नाहीं. अत्यंत पराक्रमी जर्मन माणूस हा पराकाष्ठेचा गानलुब्ध आहे. कविवर्य केशवसुत यांची ‘ सतारीचे बोल ’ ही कविता वाचली आहे का तुम्हीं? नसली वाचली तर जरूर वाचा. कवितेची भूमिका अशी आहे–एका काळोख्या रात्रीं अत्यंत विषण्ण व दुःखी मनानें कवि बाहेर पडतो, तों त्याला सतारीचे ‘ दिडदा दिडदा ’ असे स्वर ऐकूं येतात. तो चिडतो, संतापतो. आपल्या मनांत भेसूर विचारांचें काहूर माजलें असतां या मृदु व हळुवार सुरांचें प्रयोजन काय? असें त्याला वाटतें. पण हळूहळू ते सूर त्याच्या मनाची पकड घेतात. जणूं कोणी आपल्या खांद्यावर हात ठेवून प्रेमळ शब्दांनीं आपली समजूत घालीत आहे असा त्याला भास होतो आणि वैयक्तिक सुखदुःखाच्या संकुचित क्षेत्रांतून त्याचें अंतःकरण मुक्त होऊन तें पाण्याच्या पृष्ठभागावर तेलाचा थेंब पसरावा त्याप्रमाणें जगावर पसरूं लागतें. संगीताच्या सामर्थ्याचें इतकें रम्य आणि उदात्त शब्दचित्र कुणी क्वचित् रेखाटलें असेल !

**संगीत आणि सात्त्विकता**

आणि मौज अशी, कीं संगीताच्या या अपूर्व साक्षात्काराचा प्रत्यय लाखांतून एकाद्यालाच येतो असें मुळींच नाहीं. कुणीहि सहृदय माणूस हा साक्षात्कार घेऊं शकेल. आईचें अंगाई गीत ऐकून पाळण्यांतील बाळाला तें सुख मिळेल किंवा मोटेवरील गाणें ऐकून शेतांत काम करणाऱ्या कृषिवलाची तशीच समाधि लागेल. संगीत ज्याला आकर्षित करूं शकत नाहीं तो माणूसच नव्हे. जगविख्यात नाटककार शेक्सपिअर यानें जूलियस् सीझर या आपल्या नाटकांत संगीताचा महिमा मोठ्या चतुराईनें सीझरच्या तोंडून वदविला आहे. सीझर आपल्या मित्राला म्हणतो, “ तो शेजारीं उभा असलेला कॅशस पाहिलास? त्याची ती बुभुक्षित आणि हाडाळ मुद्रा बघ. तो संगीताचा द्वेष

करतो. अशीं माणसें भयंकर असतात!" किती सुंदर स्वभावचित्रण आहे पाहा! संगीताची आवड नसेल तर माणसाची वृत्ति सात्त्विक असूंच शकत नाहीं असें शेक्सपिअरला सांगावयाचें आहे. अशीं माणसें पशूहूनहि क्रूर म्हटलीं पाहिजेत. कारण पशूंनासुद्धां संगीताचा मोह पडतो. श्रीकृष्णाची मुरली ऐकून गाई धावून येत असें आपण पुराणांत वाचतों. अलीकडील एका प्रसिद्ध उस्तादाची गोष्ट मीं ऐकली आहे. हा गायनसम्राट् मोठा लहरी व हट्टी होता. नियमानें किंवा लोकांच्या सांगण्यावरून गाईलच असें नसे. त्याचें गाणें ऐकण्यासाठीं लोक त्याच्या मागेंमागें राहात. एकदां स्वारी मध्यरात्रीं उठून गांवाशेजारील नदीकांठीं गात बसली. रसिक श्रोतेहि या अप्रतिम कलावंताचा स्वर-विलास ऐकण्यासाठीं तेथें जमले. इतक्यांत गहिऱ्या डोळ्याचें एक हरिण तेथें येऊन श्रवणानंद लुटण्यांत तल्लीन झालें. श्रोत्यांपैकीं एकानें आपल्या जवळील मौक्तिकमाला त्या हरिणाच्या गळ्यांत घातली. स्वरभास्करांचें गाणें संपलें, तों तें हरिण चार टांगांत जवळील जंगलांत केव्हांच अदृश्य झालें! ४–६ दिवसांनीं पुनः त्याच ठिकाणीं तो गायक गायला बसला. तेव्हां तेंच हरिण तेथें आलें. त्याच्या गळ्यांत ती मौक्तिकमालाहि होती. त्यावरून त्या गायकाच्या सुरानें वेडावून तेंच हरिण आलें आहे हें कळून आलें! चतुष्पादसुद्धां अशी अव्वल दर्जाची रसिकता दाखवितात.

### क्रूर यमधर्म विरघळला

मनुष्यजात जन्माला आली तेव्हांपासून संगीत हें माणसाचें सर्वांत प्रभावी आकर्षण आहे. म्हणूनच मानव जातीच्या इतिहासाचे आरंभीं ज्या कथा व पुराणें रचिलीं गेलीं त्यांत संगीताच्या महात्म्यावर अनेक गोष्टी आल्या आहेत. आपल्या इकडील अशा गोष्टी तुम्हांला माहीत असतील. पण माणसाचें मन सर्वत्र कसें सारखें असतें हें

कळण्यासाठीं ग्रीक पुराणांतील एक गोष्ट सांगतों ती ऐका. एका सारंगीवाल्या प्रेमिकाची गोष्ट आहे ती. हा सारंगी वाजवून गाऊं लागला कीं गाई, म्हशी, हरिणें, सिंह, वाघ हे तर तन्मय होतच, पण वारासुद्धां आपला उद्दामपणा सोडून मंद पावलें टाकी. आकाशांतले मेघहि क्षणभर थबकून उभे राहत! म्हणजे चराचर सृष्टीच या प्रेमिकाच्या स्वरांनीं मोहून जाई. पुढें याची प्रेयसी एकाएकीं मृत झाली. हा विलक्षण उदास झाला. उदासवाणे राग आळवूं लागला. त्या स्वरांतल्या कारुण्यानें प्रत्यक्ष यमधर्म सुद्धां विरघळला ! या कलावंत प्रेमिकाला त्यानें सांगितलें, "तूं पाताळांत जाऊन आपली प्रेयसी घेऊन ये. मात्र येतांना येथें येईपर्यंत मागें वळून तिच्याकडे पाहूं नकोस." प्रेमिक उल्हसित होऊन पाताळांत गेला. पाताळाच्या महाद्वाराशीं सिंहासारखे अक्राळविक्राळ कुत्रे भों भों करीत त्याच्या अंगावर आले. प्रेमिकानें आपली सारंगी काढून गाण्यास सुरुवात केली. त्याबरोबर ते कुत्रे आपले उग्र रूप टाकून सौम्य झाले आणि प्रेमिकाला आपल्या प्रेयसीपाशीं जातां आलें. पुढें तिला आणतांना आनंदामुळें त्या प्रेमिक कलावंताला भान राहिलें नाहीं. आणि त्यानें मागें वळून पाहिलें. यमधर्माची आज्ञा त्यानें मोडली, यामुळें तिला पुनः पाताळांत जावें लागलें, हा पुढील कथाभाग वेगळा ! पण क्रौर्याची देवता म्हणून ज्या यमधर्माची आपण उपमा देतों त्याच्यावरहि संगीताची भुरळ कशी पडते हें दाखवून संगीताचें सुंदर माहात्म्य या कथेंत वर्णिलें आहे.

**संगीत शुद्ध राखा**

संगीताच्या माहात्म्याबद्दल असें सांगूं लागलों तर वेळ संपेल, पण बोलणें संपणार नाहीं. तुम्ही ज्या कलेचा अभ्यास करीत आहां त्या कलेला मानवी संस्कृतींत केवढें उच्च स्थान आहे एवढेंच मला

७५६२

पटवावयाचें आहे. या कलेचा अभ्यास अखेरपर्यंत करा आणि आपल्या स्वराच्या साधनेंत कमालीची शुद्धता राखा. आज सिनेमा, ध्वनि-मुद्रिका आणि रेडिओ यांच्या सहस्रमुखांनीं सतत, अहोरात्र, कर्कश व विकृत सुरांचीं भेंडोळीं कानांत शिरत असतां शुद्ध स्वराची अभिरुचि कायम ठेवणें कठीण आहे हें मी जाणतों. आपल्या भारतीय संगीतांतला अद्वैताचा गाभाच नाहींसा होत आहे असें मला वाटतें! अनेक वाद्यांचा व गायकांच्या सुराचा मेळ हें आपलें वैशिष्ट्य आहे. पण नवीन प्रयोग व पाश्चात्यांचें उथळ अनुकरण करण्याच्या भरांत, भिन्न पातळीवरील विविध, तीव्र, कोमल सुरांची खिचडी तयार करण्याकडे आमचे संगीतज्ञ आपली प्रतिभा वेंचतात! तुम्ही नवीन गायकगायिकांनीं हा गोंधळ व हें अराजक नाहींसें केलें पाहिजे.

### अनुचित प्रकार टाळा

मी प्रयोगशीलतेचा द्वेष्टा मुळींच नाहीं. तसेंच ख्यालाच्या संगीता-खेरीज लावणी, ठुंबरी, पवाडे, लोकगीत, भजनें इ. सर्व प्रकारांत वेगवेगळें माधुर्य आहे, हें मला मान्य आहे. बोलपट, रेडिओ, इ० साधनांनीं संगीतगंगेच्या कावडी घरोघर जातात हें उत्तमच आहे. पण प्रत्येक प्रकारच्या संगीताला त्याचें तंत्र आहे, त्याप्रमाणें त्याचें विशिष्ट वातावरण आहे हें विसरूं नका. भजनी पदांना लावणीचे सूर लावणें आणि पोवाड्यांना स्त्रीगीताचा साज चढविणें असंस्कृतपणाचें आहे! ती कला नव्हे. तो शुद्ध मूर्खपणा आहे! स्वरसंहतीलाहि रस असतात. म्हणून शृंगारांत भक्ति किंवा वीरांत करुण असली कालवाकालव करूं नये. त्याप्रमाणें कोणतीं पदें कुठें म्हणावयाचीं यालाहि औचित्याचे नियम असतात. औचित्य हें कलेचें एकमेव रहस्य आहे. नुकतीच ठाण्याला एक गोष्ट घडली. एका देवळांत चाललेल्या व्रतोत्सवांत मोठमोठे कर्णे लावून ध्वनिमुद्रिकांची करमणूक सुरू होती. शेजारीं

न्यायालय होतें. न्यायाधीश स्थानापन्न झाले तों देवळांतून ' पतलि कमर है ', ' राधे तुझा अंबाडा ' इ० पदांच्या ध्वनिमुद्रिका त्यांना ऐकूं येऊं लागल्या. न्यायाधीश महाराजांना हा प्रकार असह्य झाला. त्यांनीं देवळांत जाऊन उत्सवाच्या व्यवस्थापकांची चांगली हजेरी घेतली. " धार्मिक उत्सवांत भक्तिगीतांच्या ऐवजीं हीं काय गाणीं लावतां आहांत ? " असें विचारून तो प्रकार त्यांनीं बंद केला. या न्यायाधीशां- सारखा अनुभव आपणास पदोपदीं येतो. पण तसले प्रकार बंद करण्याची सत्ता मात्र त्या न्यायाधीशाप्रमाणें आपणांस नसते ! मंगळागौरीच्या रात्रीं ' निरांजन पडलें तबकांत ' हें गीत आणि सार्वजनिक सत्यनारायणाच्या मंडपांत ' सुंदरा मनामधिं भरली ' ही लावणी ऐकूं येणें हा नित्याचा प्रकार आहे ! जाऊं द्या ! भगवान् बुद्ध म्हणे, " जगांतले कांटे व खडे वेंचून काढून टाकणें आपल्या शक्तीबाहेरचें आहे, पण आपल्या शरीराचा जो भाग जमिनीला लागतो तेवढा कांटेखड्यांनीं दुखावूं नये म्हणून आपण कातड्याचें आवरण चढवितों. तसेंच जगांतले मोह- विषय नष्ट करणें आपणांस अशक्य आहे, म्हणून मनावर तेवढें संयमाचें कवच चढवा. " तसेंच मला तुम्हांला सांगायचें आहे कीं, सर्वत्र वातावरणांत उमटणारे भेसूर सूर व भेसळ गाणीं यांनीं तुमचे कान बिघडूं नयेत यासाठीं शुद्ध संगीताची अभिरुचि कायम ठेवा.

**सवंग प्रसिद्धि कलेला बाधक**

त्यासाठीं तुम्हांस शुद्ध संगीताची साधना मोठ्या तत्परतेनें करावी लागेल. भेसळ व उथळ संगीत ही आपत्ति जशी तुम्हीं टाळली पाहिजे त्याप्रमाणें आणखीहि एक आपत्ति टाळायला हवी. थोडेंसें स्वरज्ञान झालें, एकादी चीज थोडी ढंगदार पद्धतीनें म्हणतां येऊं लागली कीं विद्यार्थ्याला कृतार्थता वाटूं लागते. आजकाल प्रसिद्धीचीं साधनें फार सवंग झालीं आहेत. थोडें बरें गाणें म्हणूं लागलेल्या कुमार-

गायकाला रेडिओवर बोलावणें येतें किंवा गणेशोत्सवाच्या व्यासपीठावरून त्यानें दाखविलेल्या थोड्याफार कौशल्याचें अमाप कौतुक होऊं लागतें. त्याबरोबर त्याची संगीतसाधना थंडावते. असें होऊं देऊं नका. "नादसागर अपार आहे. संगीतदेवता सरस्वतीसुद्धां या नादसागरांत आपण बुडूं या भीतीनें अद्यापि भोपळा (वीणा) घेऊन बसते." असें एक संस्कृत सुभाषित आहे. (अद्यापि मज्जनभयात् तुम्बुं वहति वक्षसि). या नादसागरांत जातां येईल तेवढें आंत जा. आतां जगांतील प्रत्येक क्षेत्रांत भारताचें असें खास वैशिष्ट्य कोणतें याची परीक्षा होणार आहे. कारण ह्या देशाला आतां स्वतंत्र राष्ट्राची प्रतिष्ठा मिळाली आहे. अशा वेळीं शुद्ध व श्रेष्ठ असें भारतीय संगीत हें आहे असें तुम्हांला दाखवितां आलें पाहिजे. भारतीय संगीताची थोर परंपरा जतन करणें तुमचें थोर कर्तव्य आहे. तुम्ही ज्या पंडित विष्णु दिगंबरांच्या सांप्रदायांतले आहांत त्या महान् गायनाचार्यानें ती परंपरा कायम ठेवली, इतकेंच नव्हे तर अधिक उज्ज्वल केली. तोच वारसा तुम्ही चालवाल अशी मला खात्री आहे.

* * *

**प्रश्न**

१. भारतीय संगीताचें वैशिष्ट्य कोणतें ?
२. संगीतसाधनेला कोणत्या गोष्टी मारक होतात ?
३. भारतीय पुराणांत संगीताची महती दर्शविणारी कोणती प्रसिद्ध कथा आहे ?

**अधिक वाचन**

'माझा संगीत व्यासंग' (गो. स. टेंबे)
'संगीताचे मानकरी' (एकलव्य)
'कलावंतांच्या सहवासांत –' (धनंजय)

* * *

# व क्तृ त्व

१४

उत्तम वक्ता दहा हजारांत एकादाच असतो असें म्हणतात. वक्तृत्व ही कला कुठल्याहि व्यवसायांत माणसाला पुढें आणायला उपयोगी पडते. पुढारी, तत्त्वज्ञानी किंवा कलावंत यांनाच तेवढा या कलेचा उपयोग आहे असें समजणारांना या कलेचें महत्त्व कळलें नाहीं म्हटलें तरी चालेल. वकिली किंवा अध्यापन याच क्षेत्रांत या कलेचें तेज पडलेलें दिसतें हें खरें, पण इतरहि धंद्यांत या कलेचा माणसाला फार उपयोग होतो असें तुम्हांला दिसेल. बाजारांत तुम्ही गेला तर आपल्या रसवंतीनें आपल्या मालाचें चटकदार वर्णन करणाऱ्या दुकानदाराकडे तुम्ही चटकन् वळाल. विमा एजंटाजवळ वक्तृत्व असेल तर आपल्या धंद्यांत तो वरकत मिळवील. गिरणींत काम करणारा मजूरसुद्धां वक्ता असला तर आपल्या सहकाऱ्यांचीं गाऱ्हाणीं वरिष्ठांपुढें चांगलीं मांडील आणि पुढारी म्हणून गाजूं लागेल. वाणी हें माणसाचें उत्कृष्ट भूषण आहे असें संस्कृत कवि म्हणतात तें खोटें नाहीं.

### वक्तृत्वाची तयारी

इंग्रजीमध्यें अशी एक म्हण आहे कीं, ' कवि जन्मावा लागतो, पण

गोगटे–ढाल वक्तृत्व सामन्याच्या बक्षीस सभारंभाचे वेळीं केलेलें अध्यक्षीय भाषण. बेळगांव दि. ३–१२–४५.

अनु... 38815
... 1555 ... दि. ...

वक्ता मेहनतीनें होऊं शकतो.' पण ही म्हण सर्वस्वीं खरी नाहीं. कारण हजारों लोकांना मंत्रमुग्ध करून टाकणारा वक्ता हा कविच असतो. कवीप्रमाणें आपली सुंदर शब्दसृष्टि तो निर्माण करीत असतो. अशा असामान्य कलावान् वक्त्यासंबंधीं मी आज तुम्हांला सांगणार नाहीं. असे जे कोणी वक्ते असतील त्यांच्या वक्तृत्वकलेचे नियम ते स्वतःच तयार करतात, आणि त्यांच्याशिवाय ते नियम इतरांना पाळतांहि येत नाहींत.

पण अगदीं थोडा असा अद्वितीय वक्त्यांचा हा वर्ग सोडून दिला तरी तुम्हांला प्रयत्नें करून ही कला पुष्कळ अंशीं साध्य करून घेतां येईल. यांत तपश्चर्येचा फार मोठा भाग आहे. सिसेरो हा प्रसिद्ध वक्ता तोतरा होता. पण तोंडांत गारगोट्या धरून, समुद्रतीरावर लाटांच्या गर्जनेशीं सूर मिसळून मोठमोठ्यानें अखंड बोलण्याची संवय त्यानें केली आणि तोतरेपणा घालविला. नामदार गोखले 'टाईम्स' पत्रांतले लेखचे लेख पाठ करीत. ते पाठ झाल्यावर आवृत्ति करतांना एक शब्द चुकला तर दंड म्हणून एक आणा बाजूला काढून ठेवायचा; आणि असा आठ वेळा दंड पडला तर त्या दिवशीं जेवणाला रजा द्यायची! अशी मेहनतपूर्वक इंग्रजी भाषा त्यांनीं कमावली. उगाच का पार्लमेंटमध्यें त्यांचें चमकदार इंग्रजी वक्तृत्व ऐकून सारे सभासद थक्क होऊन गेले! अशा उदाहरणांपासून स्फूर्ति घेऊन वक्तृत्वाची साधना तुम्हीं पद्धतशीर रीतीनें करायला शिकलें पाहिजे.

भाषण कुठें करायचें आहे हें वक्त्यानें अगोदर ध्यानांत घेतलें पाहिजे. एखाद्या देवळाच्या सभामंडपांत तुमचें व्याख्यान असलें आणि तेथें 'धर्म ही अफू आहे' असें तुम्ही सांगूं लागलांत तर तुमची 'हुर्यो' लोकांनीं न केली तरच आश्चर्य! श्रोतृवृंदांत शेतकरी लोक पुष्कळ आहेत आणि तुम्ही जमीनदारीचीं रसभरीत वर्णनें करूं

लागला तर तुमच्या भाषणाचें स्वागत कसें होणार? पण म्हणजे श्रोत्यांची तुम्ही नेहमीं खुशामत करीत जा असें मला सांगायचें नाहीं. मनाला पटलेलें असेल तें सत्य सांगावें, हा सुवर्ण नियम तर अबाधितच आहे. पण तें सांगतांना समोरच्या श्रोत्यांना तें कशा पद्धतीनें सांगितलें असतां रुचेल याचा विचार केला पाहिजे. उच्च पातळी न सोडतां, एकादा विषय मुद्देसूदपणें सुबोध भाषेंत तुम्हीं पटवून दिलांत तर श्रोतृसमाज सहसा वक्त्याच्या विरुद्ध जात नाहीं. ग्रंथाच्या निरूपणाला आरंभ करतांना आपले महान् संतकवि ‘आतां वंदूं श्रोतेजन’ असा प्रस्ताव करीत. आपल्या प्रतिपादनाला उत्तम वातावरण तयार करण्याच्या दृष्टीनें ही पद्धति चांगली होती.

## कांहीं पथ्यें व सूचना

जुन्या किंवा नव्या कलावंत वक्त्यांचा आदर्श तुम्ही डोळ्यांपुढें अनुकरणाच्या दृष्टीनें ठेवूं नका असें मी आग्रहानें सांगतों. हा उपदेश प्रथम तुम्हांला विलक्षण वाटेल. पण थोड्या विचारानें त्यांतलें मर्म तुम्हांला पटेल. प्रतिभाशाली वक्ते आपलीं कांहीं वैशिष्ट्यें तयार करतात. तीं त्यांचीं त्यांना शोभून दिसतात; त्यांमुळें त्यांच्या भाषणांना लज्जत येते हें सर्व खरें आहे. पण त्यांचें अनुकरण करणारांना तीं वैशिष्ट्यें मारक होतात. नव्हे, त्यांमुळें नवशिक्या अनुकरणप्रिय वक्त्यांची वक्तृत्वशक्ति पार गोठून जाते !

म्हणूनच मी तुम्हांला कांहीं पथ्यें सांगणार आहें. त्यांतलें अगदीं पहिलें पथ्य म्हणजे आपल्या स्वतःवरून विनोद करण्याचें टाळा. आपला रंग, आपलें वजन, आपली उंची अथवा आपलें नांव यावर कोट्या करून हंशा पिकविणें किंवा टाळ्या मिळविणें ही बहादुरी फारशी उपयोगी पडत नाहीं. तुमच्याकडे आदरानें पाहण्याची लोकांची दृष्टि साफ बदलते. लोक तुम्हांला विदूषक समजतात आणि

मग एकादें चांगलें तत्त्व जरी तुम्हीं सांगायचें ठरविलें असलें तरी तें कोणी ऐकून घेत नाहीं. एकादा विख्यात 'वजनदार' वक्ता असे विनोद करतो, पण त्याच्याविषयीं लोकांना गाढ आदर असल्यानें लोकांचा गैरसमज होत नाहीं. परंतु प्रख्यात वक्त्यांनासुद्धां ही विदूषकगिरी एका ठराविक मर्यादेपुढें मारक होते. मग नवीन विद्यार्थ्यांना ती हानिकारक होईल हें सांगणें नकोच !

विनोदाइतकाच आज्ञार्थाचा उपयोगहि टाळावा. पुष्कळांना असें वाटतें, कीं आज्ञार्थांत बोललें कीं आपला प्रभाव पडेल. 'उठा, भविष्यासाठीं तयार व्हा.' अशा स्वरूपाच्या गर्जना ते आपल्या भाषणांत करतात. जसें कांहीं संदेश देणें हें उत्तम वक्तृत्त्वाचें एकमेव रहस्य आहे ! अशा रणगर्जना ऐकून लोक हंसतात इतकेंच ! आपल्या मागें मोठी तपश्चर्या किंवा व्यक्तित्व नसेल तर असलीं वीरवचनें बुडबुड्यांसारखीं ठरतील !

कठीण शब्दांचे प्रयोग तर अजीबात टाळले पाहिजेत. विदुषकगिरी म्हणजे परिणामकारक भाषण नव्हे; तसेंच दुर्बोध शब्दांच्या फैरी करण्याचा मोह फार वाईट. दुर्बोध शब्द अथवा शाब्दिक कोट्या किंवा गैरलागू अवतरणें यांमुळें श्रोत्यांवर विपरीत परिणाम होतो. हा माणूस विद्वत्ता किंवा बौद्धिक कसरत दाखवून 'इंप्रेशन्' मारण्याचा मुद्दाम प्रयत्न करीत आहे हें श्रोत्यांना कळतें. असल्या युक्त्यांनीं श्रोते फार वेळ फसत नाहींत हें लक्षांत असूं द्या.

सध्यां समाजांत विशेषतः वृत्तपत्रांत जे वाद रंगले आहेत, त्यांना स्पर्श करून टाळ्या मिळविणें ही वक्तृत्वाची उथळ पद्धति मी समजतों. समजा, एक व्यक्ति अश्लीलतेस आळा घालण्यास झटत आहे. तेव्हां आपल्या भाषणांत कांहीं उत्तान भाग येतांच, 'मीं असें म्हटलें तर

×× हे गरम होतील.' असा त्या व्यक्तीचा उपहासात्मक उल्लेख करणें मला विशेष उत्तेजनार्ह वाटत नाहीं. कित्येक सार्वजनिक व्यक्तीचीं शारीरिक व्यंगें किंवा गबाळ पोशाख प्रख्यात असतात. त्यांचाहि भरमसाट उपयोग करून श्रोत्यांत खसखस पिकविणें असंस्कृतपणाचें आहे.

हीं पथ्यें सांगितलीं याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, वक्त्यानें विनोद करूं नये, चालू वादांचे उल्लेख आणून आपलें व्याख्यान चविष्ट बनवूं नये, किंवा आवेशपूर्ण भाषेनें श्रोत्यांवर छाप पाडूं नये. व्याख्यान नीरस करावें असें मी कसें सांगेन? सरसता हा तर, लेखनाचा काय किंवा भाषणाचा काय प्रधान गुण आहे. पण सरसता आणण्यासाठीं जें करायचें तें आत्मविश्वासानें, औचित्य न सोडतां आणि आपल्या अधिकाराची मर्यादा न ओलांडतां केलें पाहिजे इतकेंच मला सांगायचें आहे.

कलावंत वक्त्यांचें अनुकरण करूं नका असें मीं तुम्हांला आग्रहानें सांगितलें. पण जे कलावान् वक्ते नाहींत, पण लक्षावधि लोकांचीं हृदयें खेचून घेण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत आहे त्या व्याख्यात्यांच्या वक्तृत्वाचें रहस्य कोणतें तें ध्यानीं घ्या आणि तें अंगीं आणण्याचा यत्न करा. टिळक, गांधी आणि नेहरू हीं तीन नांवें मी तुम्हांला सांगतों. या तिघांच्याहि भाषणांत ओघ, अलंकारप्राचुर्य, विद्वत्ता, अभिनय इ. कुठलेच ढंग नसायचे. तरीहि श्रोते त्यांचीं भाषणें कानांत पंचप्राण गोळा करून ऐकतात. या महानुभावांना इतकी उदंड लोकप्रियता कशी लाभली?

### महान् विभूतींचें उदाहरण

हें हुडकून काढल्यास तुम्हांला यशस्वी वक्तृत्वाची गुरुकिल्ली नेमकी सांपडेल. सांगणाराच्या अंगीं पराकाष्ठेची कळकळ पाहिजे. जें

सांगायचें तें त्याला पूर्ण पटलें असलें पाहिजे आणि दुसरें म्हणजे ज्यांना तें सांगायचें त्यांच्याविषयीं नितांत प्रेम त्याला वाटलें पाहिजे. ' मला जें पटलें आहे तें माझ्या बांधवांना सांगण्यांतच त्यांचा उत्कर्ष आहे ' ही श्रद्धा ज्या प्रमाणांत तुमच्या अंगीं असेल त्या प्रमाणांत तुमचीं भाषणें परिणामकारक होतील. तुम्हांला सोपे दृष्टांत आढळतील. तुमची भाषा सुबोध होईल, तुमच्या विवेचनांत सुसंगति येईल. टिळक, गांधी, जवाहरलाल इ० नेत्यांचीं भाषणें यशस्वी कां होतात हें आतां तुम्हांला कळेल.

शब्दांचें सामर्थ्य अमोघ आहे. पण केव्हां? तो नीट कळला पाहिजे. ' एक शब्द नीट कळला आणि नीट योजतां आला तर स्वर्गलोकांत तो कामधेनु होतो, असें आपले महर्षि सांगत. केवढा शब्दांचा महिमा आहे हा! ' **साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे–'** ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, खरें असून मृदु, मोजके पण रसाळ असे शब्द अमृताच्या लाटांसारखे होत. शब्दांचें याहून रम्य वर्णन कोण करूं शकेल?

अशा शब्दांची झिमझिम तुमच्या भाषणांत सारखी सुरू झाली कीं, कुठल्याहि प्रयत्नाशिवाय तुमचें भाषण श्रोत्यांच्या हृदयांचा ठाव घेईल. हो शेवटीं एकच गोष्ट सांगायची राहिली. एका प्रसिद्ध कायदे-पंडितानें, वकिलांनीं कसें यशस्वी व्हावें, हें सांगतांना म्हटलें, " आपला आरोपी निर्दोषी आहे असें वकिलानें पुनः पुनः न्यायाधिशाला पटवीत बसूं नये. आपलें म्हणणें असें आर्जवानें आणि खुबीनें मांडावें कीं न्यायाधिशाला तुमचा आरोपी निर्दोषी आहे हें सर्व विचार केल्यावर पटेल आणि पुनः आपण हें शोधून काढलें असा अभिमान त्याला वाटेल हा संशोधनाचा आनंद न्यायाधिशाला जो देतो तोच यशस्वी वकील होय. " नेमकें हेंच व्याख्यात्याच्या बाबतींत मला सांगायचें आहे.

तुम्हांला जें श्रोत्यांना पटवायचें आहे तें तात्पर्यासारखें त्यांच्या माथीं मारूं नका, तर असें विवेचन करा कीं, श्रोते आपल्या बुद्धीनें तुमच्या व्याख्यानांतून तें शोधून काढतील.

* * *

**प्रश्न**

१. वक्तृत्व अंगीं बाणण्यास कोणते दोष टाळले पाहिजेत ?

२. वक्तृत्व परिणामकारक केव्हां होतें ?

३. तुमचा आवडता वक्ता कोणता व तोच आवडता कां ?

**अधिक वाचन**

‘स्वराज्याची मोहीम’ ( टिळक )

गोखले, दास, डी व्हॅलेरा इ०चीं चरित्रें.

* * *

# छंद



छंद ( Hobby ) म्हणजे कांहीं तरी नाद. रिकामपण मनोरंजकपणें घालविण्यासाठीं विद्या, कला, हस्तव्यवसाय यांपैकीं आपण जें कांहीं करतों त्याला छंद म्हणतात. बागकाम, गायन, चित्रें, फोटोग्राफी, तसेच नाणीं, शंख, शिंपलें, तिकिटें, स्वाक्षऱ्या इ० गोळा करणें; जुन्या वस्तूंचा संग्रह करणें असे अगणित छंद आहेत. ही एक नादिष्टपणाची गोष्ट म्हणून मी समजत नाहीं. खेळ किंवा व्यायाम यांना शरीराच्या मशागतींत जेवढें महत्त्व किंवा पुस्तकी शिक्षणाला मनाच्या विकासांत जेवढें महत्त्व तेवढें महत्त्व संस्काराच्या दृष्टीनें छंदांस आहे. अभ्यास व खेळ यांतला छंद हा दुवा आहे. खेळांत थोडा अभ्यास टाकला म्हणजे छंद होतो, अभ्यासांत थोडा खेळ घातला तरीहि छंद होतो. हें कसें तें सांगतों.

## अभ्यास व खेळ यांचा संगम

मनुष्य हा आपापल्या परीनें आपलें जीवन सुखी व सुंदर करायचा प्रयत्न करीत असतो. तसें करण्याचा प्रत्येक मनुष्याला हक्क आहे. पण मनुष्य या आपल्या हक्काची जपणूक यशस्वी रीतीनें केव्हां करील, तर जेव्हां तो तशी कला साध्य करून घेईल तेव्हां. ही कला छंदांनीं आपणाला फार सुलभ रीतीनें साध्य होते. रिकामा वेळ हा मनुष्याचा

---

कु. सा. संमेलनांतील प्रदर्शनांत व इतरत्र सांगितलेले विचार.

फार मोठा शत्रु आहे. 'रिकामें मन म्हणजे सैतानाचें घर' अशा अर्थाचें एक इंग्रजी वाक्य आहे. किती सत्य आहे तें! रिकाम्या मनांत भलभलते विचार येऊं लागतात आणि मग त्या विचारांचें रूपांतर आचारांत होऊन आपलें जीवन कडू किंवा क्रूर होण्याचा संभव असतो. पण अशा रिकाम्या वेळीं तुम्हांला चित्रें काढतां येत असतील, एकादें वाद्य वाजवितां येत असेल, नाणीं गोळा करून त्यांवरून इतिहासाचा कानोसा घ्यावा हें जुळत असेल तर तुम्ही आपलें रिकामें मन यांपैकीं एकाद्या छंदात गुंतवूं शकाल. आणि मग भलभलते विचार तुमच्या मनांत काहूरच करणार नाहीत; तुमचें मन तुमच्या आवडत्या छंदांत गुंतलें जाईल. नेहमींच्या रूक्ष सृष्टींतून तुम्ही आपल्या आवडत्या कल्पनासृष्टींत जाल आणि तुमचें मन व शरीर ताजेतवानें होईल. तुम्हांला क्रिकेट किंवा पत्ते यांत जसा अनंद होतो तसा होईल. आणि पुनः कांहींतरी अभ्यास केल्याचा संतोषहि लाभेल. म्हणून मी वर म्हटलें आहे कीं, छंदांत अभ्यास आणि खेळ दोहोंचा संगम आहे.

**छंदाचें लक्षण**

छंदाचें मुख्य लक्षण कोणतें असें मला विचाराल तर मी सांगेन कीं, जी कला किंवा जो व्यवसाय तुम्हीं जीवनार्थाचा मुख्य धंदा किंवा साधन म्हणून पत्करलेला नाहीं तर केवळ रिकाम्या वेळांतल्या करमणुकीचें जें तुमचें साधन आहे तो छंद. रविवर्मा, दलाल, मुळगांवकर ह्या चित्रकारांचा चित्रकला हा व्यवसाय ठरतो. पण रवींद्रांचा तो छंद ठरतो. प्रसिद्ध सतारीये विलायत हुसेन यांचें सतार हें जीवनध्येय आहे. पण आपले ने. ना. बाबासाहेब जयकर सायंकाळीं एकादें तंतुवाद्य वाजवितात तो त्यांचा छंद असतो. लाकूडतोड्या पोटाला पैसे मिळविण्याकरितां लाकडें फोडतो, पण आपले रियासतकार सरदेसाई करमणुकीकरता लाकडें फोडतात. म्हणून तो त्यांचा छंद आहे.

पण छंद म्हणून पत्करून त्यांतून विद्याकलांचीं शिखरें गांठणारे लोक आहेत बरें का! इंग्लिश लोकांच्या अनेक सद्गुणांपैकीं छंद हा सद्गुण अनुकरण करण्यासारखा आहे. ते लोक छंद हे सुसंस्कृतीचें लक्षण मानतात. एकेका छंदासाठीं त्यांच्याकडे अनेक मासिकें आहेत. 'छांदिष्टां'चीं संमेलनें भरतात. प्रत्येक प्रतिष्ठित इंग्रज गृहस्थास कांहीं-तरी छंद असतोच. आणि अगणित इंग्रज स्त्री-पुरुषांनीं आपल्या छंदांची नीट जोपासना करून जगाच्या ज्ञानांत व सौंदर्यांत भर घातली आहे. एक दोनच उदाहरणें सांगतों. मध्यप्रांतांत बेकर नांवाचा एक गोरा अधिकारी पोलिस खात्यांत आला होता. त्याला हिंदी पक्ष्यांचा अभ्यास करण्याचा छंद होता. पक्ष्यांचीं चित्रें काढणें, त्यांच्या जीवनाची माहिती जमविणें या नादांत त्याचीं अनेक वर्षें गेलीं. नोकरी सांभाळून तो हें सर्व करीत असे. पुढें 'हिंदी पक्षी!' या विषयावर त्यानें सहा मोठे ग्रंथ प्रसिद्ध केले! एका इंग्रजी कलेक्टरची गोष्ट सांगतों. बिहारमध्ये फिरतीवर असतां त्यानें सम्राट अशोकाचे शिलालेख पाहिले. त्यावेळेपर्यंत या शिलालेखांची लिपी कुणास येत नसे. त्यानें पुष्कळ विचार करून ही लिपी वाचण्याचा शोध लाविला आणि अशोकाच्या शिलालेखाचें ज्ञान जगास करून दिलें. रॉथफील्ड नांवाचे एक अधिकारी आपल्या मुंबई इलाख्यांत होऊन गेले. मीं पाहिलें आहे त्यांना. आमच्या शाळेला म्हणजे न्यू इंग्लिश स्कूलला भेट द्यायला आले होते ते. त्यांनीं आपल्या कारकीर्दींत हिंदी स्त्रियांच्या जीवनाचा अभ्यास केला. त्यावर एक सुंदर पुस्तक रचिलें. हे सर्व लोक जीवनाचा व्यवसाय वेगळा करीत होते. त्यांचें ध्येय वेगळें होतें. पण एकेका उपयुक्त छंदाचा ध्यास घेऊन त्यांनीं केवढी मोठी कामगिरी केली आहे पाहा बरें! असे अगणित स्त्री-पुरुष त्यांचेकडे आहेत. सर्व जगभर ते संचार करतात. ज्ञान मिळवितात. जगाला देतात.

**भारतीय ‘छांदिष्ट’**

आपल्या इकडे कांहीं उदाहरणें आहेत. विशेषतः बंगाल प्रांतांत श्रीमंत व सुविद्य लोक चांगल्या अर्थानें छांदिष्ट आहेत. टागोर घराणें असें होतें. मुकर्जी, बानर्जी हीं नांवें प्रसिद्ध आहेत. ‘आनंदा’चे जनक कै. वासुदेवराव आपटे यांनीं मला एका बंगाली जमीनदाराचें उदाहरण सांगितलें होतें. या बंगाली जमीनदारानें जगांतील, विशेषतः हिंदुस्थानांतील, एकूण एक पक्षी आपल्या बागेंत संभाळले होते. संस्कृत वाङ्मयाचा त्याला फार नाद होता. वाङ्मयांतील चकोर, सारस, राजहंस चक्रवाक, चातक इ. प्रख्यात पक्षी-मंडळी आपल्या बागेंत असावी असें त्याला वाटे. छंदाच्या नादानें मनुष्य संशोधन कसा करतो पाहा ! चातक हा पक्षी मेघांतून होणाऱ्या जलवृष्टीवर आपली तहान भागवितो, असा संस्कृत वाङ्मयांत संकेत आहे. या छांदिष्ट जमीनदाराला चातकासारखा पक्षी कांहीं सांपडेना. अखेर एक पक्षी सांपडला. या पक्षाला जमिनीवर चोंच टेकवून कांहीं पाणी पितां येत नसे. बागेंत जें कारंजें उडे त्यांतून वर उंचावरून जे थेंब पडत ते आकाशाकडे चोंच करून हा पक्षी तोंडांत घेई आणि अशा तऱ्हेनें तहान भागवी. रानांत जेथें कारंजें नाहीं तेथें वरून पाणी कोठलें पडणार ! अर्थात् मेघांचें. तेव्हां हा पक्षी चातक असें त्या जमीनदारानें ठरविलें. अशीं पुस्तकांतलीं चिन्हें पारखून त्यानें पक्ष्यांची वर्गवारी केली होती. त्याची ती विहंगसृष्टि म्हणजे साहित्यिक व प्राणिशास्त्रज्ञ यांना एक विद्यापीठच होऊन बसलें. आतां आपल्या महाराष्ट्रांतील एका छांदिष्टाची माहिती तुम्हांला देतों. हे कुशल कवि आहेत. ‘अज्ञातवासी’ केळकर हें त्यांचें नांव. यांना इतिहास व संस्कृति यांची फार आवड आहे. २४ वर्षांत केवढा संग्रह त्यांनीं पुण्याच्या आपल्या घरांत जमविला आहे ! अनेक धातूंच्या सुंदर सुंदर मूर्ति; ऐतिहासिक वस्त्रें; कांग्रा, मोंगल, रजपूत पद्धतीचीं

चित्रें; तऱ्हतऱ्हेच्या नक्षीदार समया; गंजीफा, बुद्धिबळें या व अशा अनेक वस्तू आहेत. अहो, नुसते अडकित्तेच १७५ आहेत! निरनिराळ्या प्राण्यांची, जादूगारांचीं, राजपुरुषांचीं चित्रें असलेले अडकित्ते पाहिले कीं मन थक्क होऊन जातें! इतिहासांतलें सौंदर्य जतन करून ठेवणाऱ्या केळकरांना आपण धन्यवाद देऊं या. इतिहास संशोधकांना केळकरांचें घर म्हणजे एक ज्ञानाची बाजारपेठच वाटेल. आपल्या अंगची कल्पकता वाढविण्यास छंदाची मदत होते. घोकंपट्टी-नेंच मेंदूच्या शक्ति वाढतात असा आजवरचा समज होता. पण आतां हात, कान, डोळे, पाय इ. अवयवांना त्यांच्या आवडीचें काम मिळालें तर मेंदू आपोआपच विकसित होतो, असें सिद्ध झालें आहे. आणि त्याप्रमाणें आधुनिक शिक्षणांत सुधारणा होत आहे. छंदांमुळें या सर्व अवयवांना काम पडत असल्यामुळें तुमचा मेंदू वाढण्यास छंदाची मदत होईल. तुमच्यांत चौकसपणा येईल. आपला संग्रह अगदीं परिपूर्ण व आकर्षक व्हावा; यासाठीं शक्य तेवढ्या वस्तु जमविण्यास एक छंद जडला म्हणजे त्या कशा जमवायच्या त्याच्या युक्त्या तुम्हांला सुचतील. अमुक एक दूर देशाचें तिकीट किंवा चित्ताकर्षक लेबल अमुक माणसापाशीं आहे असें तुम्हांला कळलें कीं, त्यांच्याकडून गोडीगुलाबीनें तें कसें काढून घेतां येईल याचा तुम्ही विचार कराल—म्हणजेच लोकांच्या पोटांत शिरण्याची कला तुम्हांला साध्य होईल. आपला आवडता छंद वाढीला लावण्यासाठीं आईवडिलांनीं दिलेले खाऊचे पैसे खर्च करावे असें तुम्हांला नेहमींच वाटत राहील. म्हणजे मग शरीर-मनाचा ऱ्हास करणाऱ्या चैनींत तो पैसा घालण्याचा मोह तुम्ही सहजच टाळूं शकाल. सारांश, छंदाच्या नादानें तुमच्या अनेक शक्ति विकसित होतील. तुम्हांला संयमासाठीं खटाटोप करावा लागणार नाहीं, आणि

तुमचें जीवन सौंदर्यपूर्ण होईल. यांतून राष्ट्राला उपयुक्त असे ज्ञानकण सांठत जातील.

* * *

**प्रश्न**

१. छंद व अभ्यास यांतला फरक कोणता ?

२. तुम्हीं प्रयत्नपूर्वक कोणता छंद वाढविला !

३. छंदाच्या योगें कोणत्या शक्ति विकसित होतात ?

**अधिक वाचन**

'कला आणि कलावंत' ( वागल )

पी. विठ्ठल यांचें आत्मचरित्र.

* * *

## वनमहोत्सव १६

आजपासून तुम्ही वनमहोत्सव साजरा करणार आहां. वनमहोत्सव म्हटल्यानंतर पुष्कळांना तिटकारा येतो. कुणी छद्मीपणानें हसतात. या गोष्टीवर टीका होत आहे, ती तुमच्या कानांवर आली नसेल असें मुळींच नाहीं. पण मी तुम्हांला सांगतों, कीं तुम्ही कुठल्याहि गोष्टीचा स्वतःच्या बुद्धीनें विचार करायला शिकलें पाहिजे. तसेंच एकादी योजना खरोखर राष्ट्रहिताची तुम्हाला वाटली तर तिला तुम्ही हातभारहि लावला पाहिजे. तसें पाहिलें तर या उत्सवांत गैर असें काय आहे? आपली मातृभूमि फलपुष्पांनीं समृद्ध करणें आणि तिला अधिक सौंदर्य आणणें हें वाईट काम कोण म्हणेल?

**दुसऱ्याकरितां काम करणें**

झाडें लावण्यासंबंधीं लहानपणीं आमच्या इंग्रजी पुस्तकांत वाचलेली एक गोष्ट मला नेहमीं आठवते. एक राजा आपल्या लवाजम्यासह एका खेड्यांतून जात होता. तेथें एक जख्ख म्हातारा खड्डा खणतांना त्याला दिसला. जवळच रोपें पडलीं होतीं. राजानें तें पाहिलें तेव्हां त्याला कुतूहल वाटलें. तो त्या वृद्धाला म्हणाला, "काय आजोबा, काय

---

ज. ए. सो. चें गर्ल्स हायस्कूल ( दादर ) या संस्थेंत दि. २।८।५१ रोजीं केलेलें भाषण.

चाललं आहे ?" "कांहीं नाहीं महाराज, झाडें लावतों आहें." त्या वृद्धानें उत्तर दिलें. राजा हसूं लागला आणि म्हणाला, "वा, तुम्ही तर पिकलें पान झाला आहां. तुम्हांला काय उपयोग या झाडांचा ? हीं झाडें वाढतील तेव्हां तुम्ही या जगांत असाल का तरी ? कशाला हा व्यर्थ खटाटोप ?" यावर म्हाताऱ्यानें उत्तर दिलें, "महाराज, माझीं मुलंबाळं आहेत ना ? त्यांच्यासाठीं हीं झाडं लावतों आहें. माझ्या वाडवडिलांनीं झाडं लावलीं त्याचीं फळं मला मिळालीं. आतां मी झाडं लावीन तीं माझ्या वारसांना उपयोगी पडतील. जगांत सर्वच गोष्टी आपण स्वतःकरितां करतों असें थोडेंच आहे !" राजा या उत्तरानें प्रसन्न झाला आणि त्यानें म्हाताऱ्याला शंभर रुपये इनाम दिले. साधीच आहे ही गोष्ट. पण केवढें तात्पर्य आहे त्यांत ! ज्या गोष्टीचा फायदा आपणास मिळणार नाहीं पण आपल्या बांधवांस मिळेल, अशा गोष्टी कर्तव्यबुद्धीनें करणारीं माणसें ज्या देशांत पुष्कळ दिसतात तो देश सुखी व संपन्न होतो. पण हा मोठा विचार झाला. तुम्ही तर वयानें लहान आहां. तुम्ही जीं झाडें लावाल तीं मोठीं झालेलीं तुम्ही सहज पाहूं शकाल. त्यांचा तुम्हांलाहि फायदा मिळूं शिळेल, पुढल्या लोकांनाहि तीं उपयुक्त होतील.

**वृक्ष म्हणजे आप्त !**

आपल्या देशांत आपण झाडांचें महत्त्व फार मानतों. एक झाड लावणें म्हणजे दहा पुत्रांना जन्म देण्याचें पुण्य आहे असें आपले धर्मग्रंथ सांगतात. आपले ऋषिमुनि घनदाट अरण्यांत झाडांच्या आश्रयानें राहात. त्यांनीं वृक्षांच्या सान्निध्यांतच तेजस्वी सूक्तें रचलीं आणि तींच आपल्या धर्मसंस्कृतीला आधार झालीं आहेत. म्हणून रवींद्रांसारखे महाकवि आपल्या संस्कृतीला 'अरण्य-संस्कृति' ( Civilization of jungle ) असें म्हणतात. वृक्ष हा सचेतन आहे, इतकेंच नव्हे, तर तो आपल्या

कुटुंबीयांपैकीं एक आहे असें आपण मानतों. ' रघुवंशां 'तली दिलीपराजाची कथा माहिती आहे का तुम्हांला ? दिलीपराजा गायीला घेऊन एका रानांत जात असतां देवदारू वृक्षाखालीं बसलेल्या एका सिंहानें त्या गाईवर झडप घातली. त्या सिंहावर सरसावून दिलीप बाण सोडूं लागला; तों त्याचा हातच आखडला ! तो पुढेंमागें होईना ! तेव्हां मनुष्याच्या भाषेंत तो सिंह त्याच्याशीं बोलूं लागला. तो म्हणाला, " या वृक्षाचा संभाळ करण्याकरितां मी बसलों आहें. हा देवदारु वृक्ष जो तूं पाहात आहेस त्याला भगवान् शंकरांनीं दत्तक घेतला असून पार्वतीमातेनें आपल्या स्तनांतून दूध शिंपून तो वाढविला आहे. तो मी रक्षण करीत आहें. फार दिवसांत मला खायला मिळालें नाहीं, तेव्हां आयतीच सांपडलेली गाय मी खाणार. " गाईऐवजीं पुढें दिलीपनें स्वतःचें शरीर देऊं केलें. पण सत्त्वपरीक्षेंत उतरलेल्या दिलीपला कांहीं प्राणत्याग करावा लागला नाहीं. तो कथाभाग वेगळा. मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, शंकरासारखे देव वृक्षाला आपला पुत्र मानीत, एवढी वृक्षाची महती आपल्यांत प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. फार काय सांगावें, पिंपळ—वड यासारखें झाड हें माझेंच रूप आहे, " अश्वत्थः सर्ववृक्षाणाम् " असें भगवद्गीतेंत श्रीकृष्ण सांगतात. वृक्षपूजन व वृक्षसंवर्धन ही आपली राष्ट्रीय परंपराच होती. सम्राट् अशोक तुम्हांला माहीत आहे. त्यानें वृक्षारोपण हा एक राष्ट्रीय कार्यक्रमच केला होता. श्री बुद्धदेवाला ज्या वृक्षाखालीं साक्षात्कार झाला त्या बोधिवृक्षाच्या फांद्या काढून त्यानें अनेक देशांत पाठविल्या आणि तेथें बोधिवृक्ष लावून धर्मप्रचार केला. विजयनगरच्या साम्राज्यांत वृक्षांची फार काळजी घेतली जाई. दिल्ली येथें थोडाच काळ सिंहासनावर राहिलेला कल्पक बादशहा शेरशहा सूर यानें रस्त्यांच्या दुतर्फा झाडें लावण्याची राष्ट्रव्यापी मोहीमच केली. इतरहि लहानथोर अनेक राजांनीं

या कामांत हातभार लावला आहे. धर्म आणि इतिहास यांनीं घालून दिलेल्या या परंपरेचेंच आज आपण पुनरुज्जीवन करीत आहों.

आपल्या देशांत झाडांची समृद्धि होती, पण अलीकडे ती कमी झाली. लोकसंख्या वाढूं लागली व सुधारणा आली तसतशीं जास्त शहरें वसूं लागलीं आणि वसाहतीसाठीं मोकळी जागा पुष्कळ लागूं लागली. शहर झालें कीं शहराभोंवतींच्या बऱ्याच भागांत जंगल तोडून साफ करण्याची वहिवाट पडली. सर्पणासाठीं तर झाडांचा संहार फार मोठ्या प्रमाणावर होऊं लागला वृक्षांची संख्या कमी झाली कीं पावसाचें मानहि कमी होतें. पाऊस कमी झाला कीं दुष्काळ व भूकबळी आलेच ! जर्मनींत एक झाड तोडण्यापूर्वीं दुसरें लावावें लागतें, असा कडक कायदाच आहे. पण येथें आपल्या राष्ट्रीय संपत्तीची अशी जपणूक कशी व्हावी ? कारण गेलीं १००–१२५ वर्षें परकीय राज्यच होतें इथें. आतां चारच वर्षें झालीं आपण स्वतंत्र होऊन. असो. झालें तें झालें. आज आपण राष्ट्रीय धन वाढविण्याची पराकाष्ठा केली पाहिजे.

## वृक्षांची थोरवी

वृक्षांचें महत्त्व काय वर्णावें ! भोंवतालीं नजर टाका. या सर्व देखाव्यांतलें बहुतेक सौंदर्य हिरव्यागार झाडांनींच दिलें आहे. कल्पना करा, सर्व झाडें या पृथ्वींतून काढून टाकलीं तर पृथ्वी किती भकास आणि कुरूप दिसेल ! झाडानें आपल्या जीवनाची प्रत्येक शाखा व्यापली आहे. इमारती, आगबोटी, शेतीचीं अवजारें झाडाच्या लाकडांचींच असतात. फळें व विविध खाद्यवस्तु झाडेंच आपणांला देतात. झाडांपासून रंग तयार करतात. आभाळांतून जाणाऱ्या चुकार ढगांना झाडें बरोबर आकर्षित करून पाऊस पाडतात. नारळासारख्या कित्येक झाडांचा तर प्रत्येक अवयव मनुष्याच्या जीवनांत साह्यकारी होतो. पंथ,

वय, जात न पाहतां प्राणिमात्रांना झाड आश्रय देतें. जो खतपाणी घालील त्याला आणि जो कुऱ्हाडीनें घाव घालील त्याला, दोघांनाहि सारख्याच प्रेमानें जवळ घेणारा वृक्ष हा महान् संत होय. म्हणूनच महात्म्याचें वर्णन करतांना ज्ञानेश्वर महाराजांनीं म्हटलें आहे,

**"जो खांडाविया घाव घाली । कीं लावणी जयें केली ।**
**दोघां एकचि साउली । वृक्ष दे जैसा ॥"**

**पेरणी आणि जपणूक**

अशा या थोर निसर्गशक्तीची तुम्ही उपासना करा. वनमहोत्सवाच्या सप्ताहाचा एक विशेष गुण मला वाटतो तो हा कीं, सामुदायिक प्रमाणावर राष्ट्रासाठीं कांहीं तरी करावयाचें आहे ही जाणीव त्यायोगें उत्पन्न होते. सर्वांनीं मिळून एकादें सार्वजनिक काम करण्यानें कार्यक्षमता व बंधुभाव वाढीला लागतो. त्याप्रमाणें राष्ट्रीयत्वाचाहि विकास होतो. मात्र हा सप्ताह साजरा केला कीं आपलें काम संपलें असें तुम्ही समजतां काय ? छे; अगदीं उलट समजलें पाहिजे. वृक्षारोपण केल्यावर तर तुमचें काम खरें सुरू झालें. झाडें लावल्यानंतर त्यांची निगा तुम्हीं ठेवली पाहिजे. त्यांना खतपाणी घालणें, सूर्यप्रकाश मिळण्याची तजवीज करणें हें केलें पाहिजे. आपल्या देशांत लक्षावधि झाडें मागील वनमहोत्सवांत लावलीं. त्यांपैकीं कुठें १० टक्के तर कुठें २० टक्के एवढींच जगल्याचें आपण ऐकतों. जगलेल्या झाडांपैकीं पुनः शेवटपर्यंत किती टिकतात हा प्रश्नच आहे ! असें कां व्हावें ? असें होण्याचें कारण आपली अनास्था. झाडें लावलीं कीं आपलें काम संपलें ! पुढें कांहीं का होईना ! कित्येक ठिकाणीं उपद्व्यापी लोक काल लावलेलीं झाडें आज उपटून देतात. काय करतों त्याचा बंदोबस्त आपण ? कांहीं नाहीं. लोकांत शिस्त व राष्ट्रीय भावना नसली तर ती त्यांना आपण शिकविली पाहिजे.

## नवनिर्मितीचा आनंद

शेवटीं एका अगदीं नव्या दृष्टीनें या उत्सवाचें महत्त्व तुम्हांला मी सांगणार आहें. आपणा प्रत्येकाला जीवनांत आनंद पाहिजे असतो; आनंद जितका अधिक टिकाऊ असेल तितका चांगलाच नाहीं कां ? टिकाऊ आनंदाला सात्त्विक आनंद म्हणतात. कशानें मिळतो हा आनंद, ठाऊक आहे तुम्हांला ? नवनिर्मितीनें मिळतो. एकादें नवें चित्र काढलें, अगदीं अपूर्व असा भरतकामाचा नमुना तयार केला, किंवा सुंदर सुरावट गळ्यांतून काढली तर केवढी प्रसन्नता मनाला वाटते ! पण अशी कला निर्माण करतां येण्याची शक्ति प्रत्येकांत नसते. सर्वच चित्रकार किंवा संगीततज्ञ कुठून असणार ? पण निसर्गांत मात्र प्रत्येकाच्या निर्माणशक्तीला वाव आहे. तुम्ही कलाभिज्ञ असा अथवा नसा; तुम्ही लावलेलें झाड तितकेंच सुंदर यायचें, पानें तितकींच हिरवीं असायचीं, फांद्या तशाच वळणदार निघायच्या असा चमत्कार आहे. तुम्हीं झाड लाविलें कीं वेळोवेळीं हा चमत्कार अधिकाधिक उत्कट होत चाललेला तुम्हांला दिसून येईल; तो पाहून होणाऱ्या आनंदाचें मोल कशानें करतां येणार आहे ? कशानेंच नाहीं. अशा ह्या आनंदाचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं तर वृक्षारोपण ही मोठीच पर्वणी ठरेल.

* * *

## प्रश्न

१. झाडें कमी होण्याचीं कारणें कोणतीं ?

२. वृक्षारोपणाचें कार्य हें राष्ट्रीय म्हणून कोणीं केलें ?

३. वृक्षारोपणांतला श्रेष्ठ आनंद कोणता ?

## अधिक वाचन

'तीर्थरूप महाराष्ट्र' (महादेवशास्त्री जोशी)

शेती व बागाईत यांवरील पुस्तकें.

* * *

३०८१५
१५५९

# अर्थ आणि व्यापार १७

आज मी अर्थ आणि व्यापार यांतल्या तांत्रिक बाजूवर मुळींच बोलणार नाहीं. कारण तें त्यांतल्या तज्ञ प्राध्यापकांचें काम आहे, आणि तें काम तुमचे गुरुजन उत्तम तऱ्हेनें बजावीत आहेत. पण अर्थ आणि व्यापार यांना एक नैतिक व सांस्कृतिक बाजू आहे, नव्हे ती बाजू म्हणजेच या विषयाचा महत्त्वाचा पाया आहे, आणि त्याचेंच विवेचन मला करावयाचें आहे. व्यापार हा एक लबाडीचा धंदा आहे, किंबहुना लबाडीशिवाय व्यापाराला बरकत येत नाहीं असा ठाम ग्रह आपल्या देशांत प्रचलित आहे! हा कां व कसा झाला याचा मला आज तुमच्यापुढें ऊहापोह करावयाचा नाहीं. पण हा ग्रह साफ चूक आहे. आणि अर्थ–व्यापारांत सत्याला इतर सर्व व्यवसायांइतकेंच महत्त्व आहे हें मी तुम्हांला आग्रहपूर्वक सांगणार आहें.

## सत्याचें स्थान

सत्याला अर्थ–व्यापारांत स्थान नाहीं असें कुणीं केव्हां ठरविलें कळत नाहीं! योग्य नफा घेऊन व्यापार करावा, गिऱ्हाइकांना आपलेसें करण्याचें कसब साध्य करावें, बाजारपेठ व मागणी पुरवठा

---

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स आणि पूना कमर्शिअल हायस्कूल या संस्थांच्या गणपत्युत्सवांत ता. २।९।४९ रोजीं दिलेलें व्याख्यान.

यांचा अंदाज हुशारीनें घेऊन तेजीचा धंदा करावा, यांत सत्याची पायमल्ली कांहींच होत नाहीं. पण आपण असत्याची कास धरून जिंदगी करूं पाहतों हें घातक आहे. या विषयीं तुम्हांला मी एक दोन उदाहरणें सांगतों. एखाद्या हिंदी गिरणीचीं धोतरें फार उत्तम म्हणून गाजूं लागलीं कीं, त्या धोतरांचा गिऱ्हाईकवर्ग वाढत जातो. या मालाची लोकप्रियता निश्चित झाली कीं, त्या गिरणीचा मालक लगेच असत्याचें तंत्र सुरू करतो. अर्धवट जळका कापूस स्वस्त भावांत घेऊन त्याचें सूत त्या लोकप्रिय झालेल्या धोतरांचे विणींत दडपणें किंवा कमी दर्जाचे पिळाचें सूत वापरणें हा प्रकार सुरू होतो! हींच धोतरें पूर्वीं सुंदर निघत असत, तीं आतां कमी प्रतीचीं कां निघूं लागलीं, हें गिऱ्हाइकांना कळेनासें होतें. लौकरच तो माल त्यांच्या मनांतून उतरतो. कापडाच्याच नव्हे तर अनेक पक्क्या मालाच्या बाबतींत ही लबाडी चालू आहे आणि आमच्या वैश्यनीतिविषयींचा लोकांचा तिरस्कार वाढत चालला आहे. नुकत्याच येथल्या कांहीं व्यापाऱ्यांनीं परदेशीं धान्याचा व्यापार केला त्यांत धान्याच्या पोत्यांतून वाळू, खडे, माती यांचें भयंकर मिश्रण होतें. किंमत मात्र निर्भेळ धान्याच्या पोत्यांची लावली! यामुळें हिंदुस्थानची आंतरराष्ट्रीय बाजारांत पत कमी झाली अशी कडक टीका भारताच्या एका उच्च अधिकाऱ्यानें केली आहे. उच्च दर्जाच्या मालाचा भाव घेऊन हलका व अशुद्ध माल भारतीय लोक लोकांच्या गळ्यांत बांधतात हा परदेशीं दुर्लौकिक होणें ही किती वाईट गोष्ट आहे! बरें, या असत्याचरणानें लोक फार तर एक दोनदां फसतील. अखेर तुमची लबाडी अंगाशींच येणार. अमेरिकेचा राष्ट्रपुरुष लिंकन याचें प्रख्यात वाक्य ठाऊक आहे ना तुम्हांला? तो म्हणे—“सर्व लोकांना तुम्ही कांहीं काळ फसवूं शकाल, कांहीं लोकांना तुम्ही सर्व काळ फसवूं शकाल. पण सर्व लोकांना सर्व काळ फसविणें तुम्हांला शक्य नाहीं.”

**इंग्रजांची सचोटी**

पुढारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांच्या वैश्यनीतीची तुलना या दृष्टीनें करून पाहण्यासारखी आहे. अमुक एक छापाचा अमुक इंग्लिश माल वीस वर्षांपूर्वीं होता तसाच आजहि तो मिळेल. कालमानानें किंमत वाढेल पण त्याच्या घडणींत फरक होणार नाहीं. इंग्लिश गिरण्यांत हवेंतील दमटपणा कांहीं एका प्रमाणांत ठेवण्याची शिकस्त करतात. त्यांत अंशमात्र कमी जास्त झालें तर त्यावेळीं तयार होत असलेलें सर्व सूत रद्द करण्यांत येतें. वास्तविक एक दोन अंशांचा फरक सुताच्या पिळांत फारसा बदल करतो असें नाहीं आणि तसा बदल पडलाच तर तो इतका सूक्ष्म असतो कीं तो गिऱ्हाइकाच्या लक्षांतहि येणार नाहीं. पण इंग्लिश व्यापारी व तंत्रविशारद् यांची व्यावसायिक सचोटी इतकी असते कीं गिऱ्हाइकाच्या विश्वासाचा अगदीं एवढासुद्धां गैरफायदा ते घेत नाहींत. उत्पादनांतल्या या सच्चेपणाप्रमाणें मालाचे करार विनचूक पार पाडणें, देवघेवींत शब्दाची किंमत ठेवणें, गिऱ्हाइकांकडे मित्रत्वाच्या नात्यानें पाहणें ही व्यावसायिक उच्च नीति ते पाळतात. मित्रहो ! व्यापाराच्या क्षेत्रांत पडलांत तर हा आदर्श तुम्हीं पुढें ठेवला पाहिजे आणि आपल्या देशाच्या व्यावसायिक नीतीचा दर्जा वाढविला पाहिजे. ज्ञानाचा उपयोग नैतिक उंची वाढविण्याचे कामीं झाला नाहीं तर तें ज्ञान कसलें ? तुमचें ज्ञान वांझोटें व विकृत होऊं देऊं नका. तें क्रियाशील व सत्याधिष्ठित होऊं द्या.

**संशोधन व स्वदेश**

दुसरें असें कीं, अर्थ किंवा व्यापार यांचे सिद्धान्त तुम्ही शिकलां, पाश्चात्यांच्या पुढारलेल्या अर्थशास्त्राचें तुम्हीं अध्ययन केलें तरी तुम्ही येथील परिस्थतींत काय करतां, तें ज्ञान देशाच्या उद्योगधंद्यांना कितपत लावूं शकतां, यावर तुमचें व तुमच्या देशाचें यश अवलंबून राहील. न्यायमूर्ति

महादेव गोविंद रानडे यांनीं अर्थशास्त्राचें उदंड अध्ययन केलें, पण आपल्या देशांतल्या परिस्थितीला पाश्चात्य अर्थशास्त्राचीं तत्त्वें जशींच्या तशीं लावून फायदा होणार नाहीं असें त्यांनीं स्पष्ट केलें, आणि हिंदी अर्थशास्त्राचा पाया घातला. आधुनिक भारताच्या जनकाचें हें उदाहरण तुम्हांला सदैव स्फूर्ति देईल असें आहे. आपण जगांतील ग्रंथसंपत्ति अभ्यासतों, पण आपल्या गांवांतल्या गरजा व समस्या यांचें आपणांला ज्ञान नसतें ! मला एवढेंच सांगायचें कीं परकीयांचें संशोधन जसेंच्या तसें घेऊन रूढ समजुती सिद्ध करीत बसण्याचा उपद्व्याप करणें घातक आहे. हा ज्ञानाचा दुरुपयोग आहे. मिळालेलें ज्ञान आपल्या देशस्थितीचें, समाजाचें, वातावरणाचें प्रत्यक्ष संशोधन करून वापरणें हें तुम्हीं केलें पाहिजे. पुस्तकी ज्ञान अवश्य पाहिजे. पण पाश्चात्य संशोधकांनीं मोठ्या परिश्रमानें मिळविलेलें ज्ञान जसेंच्या तसें वापरणें इष्ट नाहीं. येथील अनुभवाच्या भट्टींत तें तावून सुलाखून घेतलें पाहिजे. रानडे, गोखले, जोशी, मुकर्जी, गांधीजी, नेहरू, विश्वेश्वरअय्या, कुमाराप्पा इ. नेत्यांची व विद्वानांची या पद्धतीची महनीय कामगिरी तुम्हांला खचित मार्गदर्शक होईल.

**कला व व्यापार**

शेवटीं मला एक सांगायचें आहे. सत्य आणि विज्ञाननिष्ठा याप्रमाणें कला हीहि अर्थ व व्यापार यांत आणली पाहिजे. सत्याप्रमाणें कलेचाहि अर्थ–व्यापारांत कांहीं संबंध नाहीं असें आपणांकडे समजण्यांत येतें ! आपल्याकडे दुकानाच्या भिंतींवर कलाशून्य चित्रें लावतात, दुकानांना भडक रंग देतात; वेडेवांकडे आरसे बसविणें ही मोठी आरास समजतात ! दुकानाच्या सुंदर सजावटीपासून मालाच्या रम्य बाह्यांगापर्यंत व्यापाऱ्यांनीं कलादृष्टि ठेविली पाहिजे. जाहिरातसुद्धां कलात्मक पाहिजे. ‘ नारकुंडा ’ नांवाच्या बोटीवर मीं एक खोली पाहिली

होती. तिच्या भिंतीवर लिहिलें होतें:– Smoking strictly prohibited, not even Abdulla ( धूम्रपान करण्याची सक्त मनाई आहे, 'अबदुल्ला' सिगारेटसुद्धां येथें ओढतां येणार नाहीं. ) 'अबदुल्ला' सिगारेटच्या चालकांनीं पहा कशी कलात्मक जाहिरात केली आहे ती ! अमेरिकेंत रेडिओवर सुंदर सुंदर गाण्यांचे, नाटिकांचे व व्याख्यानांचे कार्यक्रम व्यापारी कंपन्या पैसे देऊन ठेवतात. उत्कृष्ट कलावंतांना व वक्त्यांना खूप मोबदला देऊन रेडिओवर आणलें जातें. कार्यक्रमाचे आधीं व नंतर 'अमुक व्यापारी कंपनीनें हा कार्यक्रम योजलेला आहे,' एवढेंच सांगितलें जातें. लक्षावधि रसिक श्रोत्यांच्या कानांवर आपलें नांव घालण्याची कशी नामी युक्ति आहे पहा ! मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, कला आणि अर्थ–व्यापारांची फारकत न करतां जाहिरातीपासून मालाच्या अंतर्बाह्य सौंदर्यापर्यंत कलेची दृष्टि ठेवा.

**त्रिवेणी संगम झाला पाहिजे**

मित्रहो ! आपला देश आतां स्वतंत्र होऊन जगाच्या आखाड्यांत उतरला आहे. विज्ञानांत फार श्रेष्ठ असलेल्या, शिस्तबद्ध व कल्पक अशा लोकांशीं आपण चढाओढ करणार आहोंत. हे सर्व गुण जसे त्या लोकांत आहेत त्याप्रमाणें सत्य, प्रयोगनिष्ठा, कला याहि गुणांची जोड त्यांनीं मिळविली आहे. अशा वेळीं जुन्या चाकोरींतून जाऊन, जुनीं साधनें वापरून जसें भागणार नाहीं, तशी जुनाट अर्थ–नीतिहि आज कुचकामाची ठरणार आहे. अर्थ हें राष्ट्रदेहांतलें रक्त आहे, तें जितकें शुद्ध व निकोप असेल तितकें राष्ट्राचें सामर्थ्य वाढणार आहे. आपल्या देशांत मीं वर सांगितलेलीं थोर मूल्यें मागें केव्हां तरी होतीं. 'हिंदुस्थानांतले लोक घरांस कुलुपें न लावतां बाहेर जातात.' असें आमच्या नैतिक उच्चतेचें वर्णन मेगॅस्थॅनीस या हजार वर्षांपूर्वी या देशांत आलेल्या परकीय प्रवाशानें केलें आहे. त्याचा योग्य अभि-

मान वाळगावा; पण एके काळीं आपण आर्थिक व नैतिक दृष्ट्या उन्नत होतों याला आज काय अर्थ आहे? मित्रहो! राष्ट्राला अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या विषयांचें शिक्षण तुम्ही घेत आहांत. भौतिक वैभव, सत्यप्रीति आणि कलाप्रेम यांचा त्रिवेणी संगम या आपल्या प्रिय मातृभूमींत तुम्ही घडवून आणाल अशी मी आशा करतों.

* * *

**प्रश्न**

१. सत्य आणि व्यापार यांचे संबंध कसे असावेत?

२. कलेला व्यापारांत स्थान आहे कीं नाहीं?

३. इतरांचें संशोधन आपल्या देशाला लावण्यांत कोणता धोका आहे?

**अधिक वाचन**

'जगांत वागावें कसें?' (वेलणकर)

'विक्रीचीं बारा सूत्रें' (किर्लोस्कर)

'व्यवसाय–पत्रें' (आपटे)

* * *

# अनन्त हस्तें कमलावरानें— १८

**माझ्या बालमैत्रिणींनो,**

तुमच्या शाळेचे व माझे ऋणानुबंध फार घनिष्ठ व जुने असल्यामुळेंच मला आपल्या स्नेहसम्मेलनाचें निमंत्रण नाकारणें शक्य नव्हतें. तुम्हीं आत्तांच कांहीं रंजनाचे कार्यक्रम करून दाखविलेत. त्यांत तुम्ही व मी अगदीं रममाण होऊन गेलों. ते बघत असतां तुमच्यापैकीं कांहींना आपणच राजकन्या आहोंत, इतरांना भांगडा नृत्यांतील कलाकार आहोंत किंवा इतर पात्रांपैकीं आहोंत असें वाटून तुम्ही सर्वजणी त्या त्या पात्रांची सुखदुःखें अनुभवीत असाव्यात असें तुमच्या चेहऱ्यावरून दिसत होतें. आत्तां झालेल्या रंजनाच्या कार्यक्रमांत भाग घेतलेल्या या छोट्या कलावन्त विद्यार्थिनींनीं खरोखरीच आपल्या भूमिका अत्यंत परिणामकारक वठविल्या ह्याचीच प्रचिती तुमच्या तल्लीनतेंत दिसून आली आणि आज मला हेंच प्रामुख्यानें तुम्हांला सांगावयाचें आहे.

उद्यां तुम्ही मोठ्या झाल्यावर, शालेय जगांतून बाहेर पडल्यानन्तर तुम्हांला कोणती तरी भूमिका घ्यावी लागणार आहे. ती अत्यंत यशस्वी-रीतीनें वठविण्यांत तुमची कर्तबगारी, कौशल्य दिसून येणार आहे. ह्याच्या अनुषंगानें मी तुम्हांला एक गोष्ट सांगतों. आपल्याकडे जसा

---

दादर येथें ज. ए. सोसायटीच्या गर्ल्सहायस्कूलचे वार्षिक संमेलनांत अध्यक्ष या नात्यानें ता. २३–१–६० रोजीं केलेलें भाषण.

कालिदास तसा इंग्लंडमध्यें शेक्सपिअर नांवाचा कवि आणि नाटककार होऊन गेला. तो उत्तम नटहि होता. एकदां एका नाटकांत त्यानें राणी एलिझावेथच्या वडिलांची भूमिका केली. सध्यां भारतांत आलेल्या इंग्लंडच्या राणीचें–एलिझावेथचें नांव तुम्हीं ऐकलेंच असेल नाहीं ? तिच्याच घराण्यांतील ही राणी. नांवहि तेंच. शेक्सपिअरनें आपली भूमिका इतकी उत्कृष्ट वठवली कीं प्रत्यक्ष राणी तें नाटक बघत असतां, क्षणभर तें नाटक असल्याचें ती विसरली. साक्षात् आपले वडील आपल्यासमोर उभे आहेत कीं काय असें वाटून तिचें भान हरपलें. ती अगदीं समरस झाली. इतकी कीं तिनें आपल्याजवळचा सुंदर सुगंधित नाजुक रुमाल काढून शेक्सपिअरच्या बाजूला भिरकावला. त्याच्या कामाची जणूं ती बक्षिसी होती. सारे प्रेक्षक थक्क झाले. साऱ्यांना शेक्सपिअरला मिळालेल्या मानाचा हेवा वाटला. सरदारांना वाटलें कीं, शेक्सपिअर आतां तो रुमाल आपल्या मस्तकाला लावून नंतर तो त्याचें चुंबन घेईल. पण यांपैकीं कांहीं प्रकार घडला नाहीं. घडलें तें उलटेंच. शेक्सपिअरनें तो राणीचा रुमाल बुटानें दूर भिरकावून दिला. झालें ! साऱ्या प्रेक्षागृहांत शेक्सपिअरबद्दल अत्यंत तिरस्कार निर्माण झाला. राणीचा अपमान म्हणजे काय ? सरदार मंडळी तर विलक्षण चिडली. राणी आतां शेक्सपिअरला काय शासन करते याकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें. नाटक संपलें. पडदा पडला. शेक्सपिअरनें तोंडाची रंगसफेती पुसली, पोशाख उतरला व नेहमींच्या पोशाखांत तो राणीला भेटण्यासाठीं तिच्या महालांत गेला. राणी घुस्स्यांतच होती. त्याच्याकडे तोंडसुद्धां न वळवतां तिनें आपल्या रुमालाची अशी संभावना करण्याबद्दल जाब विचारला. शेक्सपिअर हात जोडून अत्यंत नम्रतेनें म्हणाला, "माफी असावी राणी सरकार ! त्यावेळीं मी आपल्या पित्याच्या ठिकाणीं होतों ह्याचा सरकारनं विचार करावा. कोणताहि बाप आपल्या मुलीनं फेकलेल्या रुमालाचं चुंबन घेणार

नाहीं हें खरं ना ! सरकार, त्यावेळीं मी आपल्या पित्याच्या भूमिकेंत असल्यानं माझा अधिकार आपल्याहून अधिक होता हें लक्षांत घ्यावं राणी सरकारनं. रंगभूमीवरून खालीं उतरल्यानन्तर जर माझ्या हातून केसभरहि अपमानास्पद वर्तन घडलं असलं तर माझा शिरच्छेद झाला तरीहि त्याला माझी आनन्दानं तयारी असेल."

मुलींनो, या गोष्टीवरून तुमच्या लक्षांत आलेंच असेल कीं शेक्सपिअरनं अतिशय समरसतेनें आपली भूमिका वठवली म्हणूनच खुद्द राणीला सुद्धां भास निर्माण झाला. ही समरसता प्रत्येक व्यक्तींत यावयास हवी. याच शेक्सपिअरनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, जग ही एक रंगभूमि आहे आणि प्रत्येक मानव हा त्यावरील नट आहे. असो. आपल्याला अधिक खोलांत शिरण्याची गरज नाहीं. फक्त मला पुन्हा एकदां तुम्हांला तुमची भूमिका अत्यंत यशस्वीरीतीनें पार पाडण्यास शिका असें सांगावेसें वाटतें.

तथापि आपल्याला कोणती भूमिका घ्यावयाची आहे हें तुम्हीं अगोदर नक्की करा. तुम्ही वैजयन्तीमाला होणार, कां विजयालक्ष्मी पंडित, का लता मंगेशकर होणार आहांत हें आजच निश्चित ठरवा. या साऱ्याजणी आपण एकट्या एकदम होऊं अशा संभ्रमांत तिष्ठत राहूं नका. आजच्या युगांत विशेषतः शहरीं जीवनांत तुमच्यापुढें अनेक आकर्षणें आहेत. प्रसिद्धीचा मोह तुम्हांला क्षणाक्षणाला खेंचत राहील. जागतिक कीर्तीच्या महिला तुमच्या डोळ्यापुढें दिसूं लागल्या कीं लागलीच तुम्हांला त्यांच्यासारखें व्हावें असें वाटूं लागेल. वैजयन्तीमाला होण्यांत जितका मान आहे तितकाच विजयालक्ष्मी होण्यांत आहे. तुम्ही यांपैकीं कोणीहि व्हा पण एकच व्हा. झटपट प्रसिद्धीचा मोह टाळा. ज्या क्षेत्रांत तुम्हांला मोठें व्हावेसें वाटत असेल त्या क्षेत्रांत निष्ठा निर्माण करून तिला चिकटून रहा. निष्ठेशिवाय जीवन निष्प्रभ ठरेल हें मी तुम्हांस

मुद्दाम सांगतों. निष्ठेशिवाय माणूस जगूंच शकत नाहीं. पण ती निष्ठा कशी असावी ? प्रामाणिक आणि निग्रही हवी. मी तुम्हांला आतां पुराणांत नेणार आहें. आपल्यांत दमयंती नांवाची एक आदर्श स्त्री होऊन गेली. तुम्हीं तिचें नांव कदाचित् ऐकलें असेल. तिनें नलराजाला मनानें वरलें होतें, ही गोष्ट सर्व देवांना ठाऊक होती. ती अत्यंत लावण्यवती असल्यामुळें प्रत्येक राजपुत्राला ती आपल्याला मिळावी अशी इच्छा होती. तिच्या स्वयंवराच्या वेळीं इंद्रादि पांच देवांनीं नलाचें रूप घेऊन ते स्वयंवरमंडपांत येऊन दाखल झाले. दमयंती जेव्हां हातांत विवाहमाला घेऊन नलराजाला मंडपांत शोधूं लागली तेव्हां अगदीं नलासारखे दिसणारे हे पांच देव तिच्या दृष्टीस पडले. ती लागलीच बावचळली. काय करावें हें तिला सुचेना. यांतून खऱ्या नलराजाला ओळखून काढणें अशक्य होतें. त्यावेळीं तिनें काय केलें ? साऱ्या देवांची प्रार्थना केली, " तुम्ही तुमचीं खरीं रूपें प्रकट करा. " असें तिनें त्यांना कळवळून विनविलें. त्याबरोबर देवांचीं अंतःकरणें द्रवलीं व त्यांनीं आपापलीं सत्य रूपें प्रकट केलीं. दमयंतीनें पुढें नलराजास वरलें हें सांगावयास नकोच. मी या ठिकाणीं ही गोष्ट कां सांगतों आहें कीं जसे दमयंतीच्या प्रार्थनेनें साक्षात् देव विरघळले तसे तुमच्या निष्ठेनें तुम्हांला खेचणारे मोह वितळून गेले पाहिजेत. तुमची भूमिका तुम्हांला स्पष्ट दिसली पाहिजे. अशी निष्ठा जीवनांत निर्माण करा.

आणखी एक मुद्दा मला तुम्हांला सांगावयाचा आहे. पुराणांतल्या एका गोष्टीकडे मी वळणार आहें. सावित्रीची गोष्ट आहे ती. दमयंतीपेक्षां सावित्रीचें नांव तुम्हांला निश्चित अधिक परिचयाचें असेल. वटसावित्रीच्या निमित्तानें घरीं तुमची आई उपास करत असेल आणि मग रुचिपालट म्हणून तुम्हांलाहि चार पदार्थ खायला मिळत असतील नाहीं का ? तेव्हां या सावित्रीची कथा तुम्हीं मुलींनीं श्रवण आणि मनन करावी

इतकी महत्त्वाची आहे. सावित्री आपल्या पतीबरोबर अरण्यांत जाते. तो लांकडें तोडत असतां त्याला मृत्यु येतो. यमराज जेव्हां सत्यवानाचे प्राण घेऊन जातात तेव्हां सावित्री त्यांच्या मागोमाग जाते. पतीचे प्राण परत मागते. अर्थात् ते परत करणें शक्य नसल्यामुळें यमराज सावित्रीनें परत फिरावें म्हणून वर देतात. आपल्या सासुसासऱ्यांची गेलेली दृष्टि परत मिळावी, तसेंच गेलेलें राज्य मिळावें असे वर सावित्रीनें मागितले. यमानें ते दिल्यानंतरहि सावित्री मागें फिरण्याचें चिन्ह दिसेना. "आणखी एखादा वर पाहिजे तर मागून घे पण बाई ग आतां यापुढें माझ्या मागें येऊं नकोस" असें यमानें सांगितलें. तेव्हां सावित्रीनें त्याची खूप स्तुति केली आणि शेवटीं "मला शंभर सुपुत्र व्हावेत" असा वर मागितला. स्तुतीनें भांबावलेल्या यमानें एकदम 'तथास्तु' म्हटलें. अर्थात सावित्रीला तिचा पति सत्यवान् तिला परत करण्यावांचून यमाला गत्यंतरच नव्हतें. मोठ्या अक्कलहुशारीनें सावित्रीनें आपला पति परत मिळविला होता. हें सावित्रीचें आख्यान कविश्रेष्ठ मोरोपंतांनीं अत्यंत बहारदार शैलीनें सांगितलें आहे. त्यांतील अत्यंत महत्त्वाची ओळ मला तुम्हांला सांगावयाची आहे. मोरोपंत लिहितात,

"भुलला धर्म द्युतिला, धृतिला मतिला तथा तिच्या स्तुतिला!"

मुलींनो, यमासारख्या पाषाणहृदयी पुरुषावर सावित्रीचा प्रभाव पडला तो कशामुळें? तर पहिला गुण म्हणजे भुलला धर्म—धर्म म्हणजे यम 'द्युतिला.' सावित्रीची द्युति म्हणजे तेज यमाच्या अंतःकरणाला पाझर फोडण्यास उद्युक्त झालें. तेज म्हणजे काय? आजकालच्या तुम्ही मुली जीं सौंदर्यप्रसाधनें वापरून तजेलदार चेहरा करतां तसलें तेज नव्हे बरें तें! हें तुमचें तेज उन्हातान्हांतून एखादा फेरफटका मारून आलांत किंवा पावसाचें पाणी तोंडावर पडलें कीं ओघळून जातें. काळें ठिक्कर पडतें. हें असलें नटवें तेज नव्हतें बरें कां सावित्रीच्या तोंडा-

वरचें ! तिचें तेज होतें तिच्या चारित्र्याचें. तिच्या पावित्र्याचें आणि निष्ठेचें ! मनुष्याच्या चारित्र्याचें तेज नेहमीं त्याच्या डोळ्यांत, चेहऱ्यावर दिसत असतें. कित्येक वेळां आपल्या पाहण्यांत अशी मंडळी येतात ती रंगानें काळी सावळी, अवयवांचा रेखीवपणा तर नसतोहि त्यांच्या ठिकाणीं. पण त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे मन प्रसन्न होतें. ज्ञानेश्वर महाराजांनीं स्फटिकाच्या दिव्यांतील वातीच्या तेजाचें वर्णन केलें आहे ना ! तसें चारित्र्यसंपन्न माणसाच्या चेहऱ्यावरील तेज दिसतें. सावित्रीचें तेज या प्रकारचें होतें. तेव्हां यमाला या तेजानें भुरळ पाडली. दुसऱ्या कशानें यम विरघळला ? तर धृतीनें. धृति म्हणजे धैर्य. सावित्रीच्या ठिकाणीं किती विलक्षण मनोधैर्य होतें याची तुम्ही कल्पना करा. अरण्यामध्यें एकटी सांपडलेली आणि तीहि पतिनिधनाच्या संकटानें ग्रासलेली, अशी सावित्री यमराजाला तोंड देते. किती भयंकर कृत्य होतें हें ! पण क्षणभरसुद्धां न डगमगतां तिनें ज्या प्रकारें यमाची आर्जवें केलीं तेंच तें तिचें धैर्य ! आजच्या प्रत्येक मुलीनें या धैर्याची उपासना केली पाहिजे. सावित्रीच्या अंगीं असलेला तिसरा गुण मति म्हणजे बुद्धि. ती तुमच्या ठिकाणीं आहेच. सध्यां तुम्हांस मिळत असलेल्या सवलतीचा पुरता फायदा करून घेऊन तुम्ही तुमची बुद्धि अधिक विकसित करा. तेव्हां सावित्रीप्रमाणें तुम्हीसुद्धां द्युति, धृति आणि मति अंगीं बाणविण्याचा प्रयत्न करा.

आतां आणखी एक दोन गोष्टी सांगून मी माझें भाषण आटोपतें घेणार आहें. आज सकाळींच तुमच्याकडे येण्यासाठीं मी पुण्याहून निघालों. खंडाळ्याच्या घाटांत गाडी शिरतांच त्या निसर्गरम्य सौंदर्यानें मन भारावून गेलें, तुमचे प्रसन्न चेहरे दृष्टीस पडणार म्हणून सुरुवातीपासूनच मन आनंदानें वेडें झालें होतें. पण या आनंदाला एका विचारानें मागें खेचलें. आज २३ जानेवारी ! महाराष्ट्रांतील एक थोर

कवि गोविंदाग्रज यांचा निर्वाणदिन. क्षणभर त्यांच्या स्मृतीनें मनाची चलबिचल झाली. त्याचक्षणीं मनाशीं ठरविलें कीं, आज तुमच्यासमोर त्यांचा दिव्य संदेश सांगून त्यांना श्रद्धांजलि वाहवयाची! आणि म्हणून या कवींच्या कांहीं ओळी तुम्हांला सांगण्याचा मोह मला अनावर होत आहे. गोविंदग्रजांनीं एका कवितेंत एक दिव्य संदेश दिलेला आहे. मनुष्य आपल्या आयुष्यांत ज्या वाईट, अशिष्ट गोष्टी करतो त्या काळाच्या उदरांत गडप होतात. निरंतर स्वरूप प्राप्त होतें तें सात्त्विक कृत्यांना. काळपुरुष आपल्या मुखानें साऱ्या जगताला सत्कृत्यें सदैव सांगत राहातो. शहाजहान बादशहाच्या अनेक अप्रिय गोष्टी लोक विसरूनहि गेले आहेत. त्यांच्या स्मरणांत राहिला तो ताजमहाल! त्याच्या दिव्यप्रेमाचें प्रतीक! तसेंच वाल्या कोळ्यानें वाटसरूंची हत्या करून त्यांच्या नांवें खड्यांनीं भरलेल्या रांजणांचें आज कुठें नांवहि ऐकायला येत नाहीं, वाल्मीकीचें रामायण मात्र अजरामर झालें. कवीच्याच शब्दांत सांगावयाचें झालें तर—

शहाजहानाआधीं मेली ख्यालिखुशाली ती त्याची।
खडा तेवढा ताजमहालच भूषा जी या जगताची॥
खुनी खड्यांनीं भरले रांजण वाल्याचे फुटले सारे।
उरलें रामायण तें नटवी श्रीरामा निज आधारें॥

मुलींनो, गोविंदाग्रजांनीं या ओळींत दिलेला संदेश लक्षांत ठेवा. जीवनांत अशी कांहींतरी दिव्य कामगिरी करा, कीं काळपुरुष तिचे पोवाडे अखंड गात राहील. " Victoria & Edward have passed away but kind deeds pass away never " ह्याचा अर्थ ह्याहून कांहीं निराळा नाहीं हें लक्षांत ठेवा.

यापेक्षां मला अधिक कांहीं सांगावयाचें नाहीं. इतका वेळपर्यंत मीं पण एक छोटीशी भूमिका केली. अद्यापहि रंजनाचा कार्यक्रम होणार

असल्याचें माहीत असूनहि तुम्हीं सर्वांनीं शांतपणें बसून माझी भूमिका पार पाडण्यास सहकार्य दिलेंत याबद्दल मी तुमचा सर्वांचा आभारी आहें.

एका महान् भारतीयाचा आज जन्मदिन आहे. ब्रिटिश साम्राज्य-सत्तेला शेवटचा रामटोला मारला ते नेताजी सुभाषचंद्र आज जन्मले. त्यांचें ज्ञान, निर्भयत्त्व, चातुर्य, देशप्रेम तुम्हांला मार्गदर्शक होवो. भावी काळांत तुम्ही खूप मोठ्या व्हा, तुमच्या कर्तृत्वानें तुम्ही तुमच्या देशाची कीर्ति वाढवा इतकीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

* * *

**प्रश्न**

१. सावित्रीचीं तीन वैशिष्ट्यें कोणतीं ?

२. खऱ्या यशासाठीं कोणत्या गोष्टी टाळाव्यांत

**अधिक वाचन**

शंख आणि शिंपले ( ना. ग. गोरे )

ऊर्मि ( एस. एम्. जोशी )

प्राचीन साहित्य ( रवींन्द्रनाथ )

REFBK-0007562

संग्रहालय ... संग्रह शाखा ... क्र. ७५६२

अनुक्रम ३७८.१५
क्रमांक १४४९
निबंध